विज्ञान निर्भयता नीती

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका






सप्टेंबर २०२१
वर्ष पहिले | अंक तिसरा

विज्ञान निर्भयता नीती

# महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती

संस्थापक : शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर

स्थापना : ९ ऑगस्ट १९८९

माणसांना विवेकी बनविणारे सशक्त संघटन

## पंचसूत्री

- **शोषण करणाऱ्या अंधश्रद्धांना विरोध**
- **वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार, प्रसार, अंगिकार**
- **धर्माची विधायक कृतिशील चिकित्सा**
- **संत-समाजसुधारकांचा वारसा पुढे नेण्याचा प्रयत्न**
- **व्यापक समाज परिवर्तनवादी चळवळीबरोबर सहयोग**



**डॉ. नरेंद्र दाभोलकर**
संस्थापक कार्याध्यक्ष
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती

**अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका**

**संपादक**
नितीन शिंदे

**कार्यकारी संपादक**
उत्तम जोगदंड

**सह संपादक**
एकनाथ पाटील

**सदस्य**
दीपक बाविस्कर
श्यामसुंदर मिरजकर
मांतेश हिरेमठ

**व्यवस्थापक मंडळ**
**व्यवस्थापकीय संपादक**
अवधुत कांबळे

**सदस्य**
तुकाराम शिंदे
राजेंद्र फेगडे
विशाल विमल

**सल्लागार मंडळ**
प्रदीप पाटकर
संध्या नरे-पवार
**कायदेशीर सल्लागार**
ॲड. गोविंद पाटील

विवेकी विचार हेच खरे माणूसपणाचे लक्षण

विज्ञान निर्भयता नीती

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

(मराठी मासिक)

सप्टेंबर २०२१
वर्ष पहिले | अंक तिसरा

सदरचे मासिक संपादक नितीन शिवाजीराव शिंदे यांनी संपादित केले आहे आणि प्रकाशक अविनाश रमेश पाटील यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, भास्कर-६८, कालिकादेवीनगर, संघमा चौक, गोळीबार टेकडी रस्ता, धुळे, ४२४००१ येथून प्रकाशित केले आहे. महा. अंनिससाठी विवेक जागर ट्रस्टच्यावतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, महा. अंनिस आणि विवेक जागर ट्रस्ट सहमत असेलच असे नाही. कायदेशीर बाबींसाठी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसाहेब, इस्लामपूर ता. वाळवा जि. सांगली यांचे कार्यक्षेत्र असेल.

**मुखपृष्ठ**
गणेश पोतदार
इस्लामपूर

**संपादकीय पत्ता**
संपादक, अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका, 'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर, जि. सांगली, ४१५४०९

## अनुक्रमणिका


☯ **संपादकीय** |एकनाथ पाटील | ३

☯ **विचार विश्व**

⌘ अनुभवप्रामाण्य व अंधश्रद्धा निर्मूलनाचे आद्य प्रवर्तक : चार्वाक | अरुण शिंदे | ५

☯ **प्रबोधन**

⌘ सण उत्सव आणि अंधश्रद्धा | दीपक बाविस्कर | १२

☯ **संताचिये द्वारी**

⌘ संत सेना महाराज आणि अंधश्रद्धा निर्मूलन | महेश गायकवाड | १५

☯ **चिकित्सा**

⌘ पितृपक्ष पंधरवड्याचे लाभार्थी कोण? | नितीन शिंदे | १९

☯ **प्रासंगिक**

⌘ कर्मवीर भाऊराव पाटील यांची पुरोगामी विचारसरणी | सुधीर कुंभार | २२

☯ **मनापासून**

⌘ श्रावणसरी | प्रदीप पाटकर | २५

☯ **विज्ञान जगत**

⌘ वैज्ञानिक दृष्टीकोन आणि चमत्कार | संदेश बालगुडे | २७

⌘ वेध खगोलीय आविष्कारांचा | शंकर शेलार | ३०

☯ **कार्याध्यक्ष संवाद**

⌘ स्वातंत्र्यासाठी 'वैज्ञानिक दृष्टिकोन' आणि वैज्ञानिक दृष्टिकोनासाठी 'स्वातंत्र्य' | अविनाश पाटील | ३४

☯ **चमत्कार मीमांसा**

⌘ अल्लाची अदृश्य दिव्यशक्ती, बिना अग्नी कागदा जाळती | मच्छिंद्रनाथ मुंडे | ३६

☯ **जडणघडण**

⌘ मी असा घडलो.... | बाबा हलकुडे | ३७

☯ **पुस्तक परिचय**

⌘ 'अंधश्रद्धांच्या मुळांना आग लावणारे विधायक चिंतन' | यशवंत मनोहर | ३९

☯ **कविता**

⌘ कानगोष्टी | अरूण घोडेराव | ४१

☯ **महा. अंनिसची खबरबात** | विशाल विमल | ४२

संपादकीय

# बुद्ध आणि गांधी यांचे बोट पकडण्याशिवाय दुसरा मार्ग नाही...

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेचा हा अंक आपल्या हाती सोपवताना जगभरात एक प्रकारचं अस्थिरतेचं, संभ्रमाचं आणि अस्वस्थेतचं वातावरण आहे. कमालीच्या धर्मांध शक्ती सामान्य माणसांच्या जगण्यावर आक्रमण करतात, वैयक्तिक जीवनात धर्म मानणाऱ्या माणसांचं जगणंही संकुचित करून टाकतात तेव्हा जगणं किती क्षणभंगुर बनून जातं, याचा अनुभव अफगाणिस्तानच्या निमित्ताने आपण घेत आहोत. प्रसारमाध्यमातून अफगाणिस्तानमधील परिस्थिती अनुभवल्यावर हजारो किलोमीटर दूर असलेल्या आपणासारख्यांचे मन विषण्ण होत असेल, तर प्रत्यक्ष तिथल्या अराजक परिस्थितीला तोंड देणाऱ्या निष्पाप नागरिकांची नेमकी अवस्था काय असेल, याची कल्पनाही करवत नाही. तालीबानी कुठे नसतात? जगाच्या पाठीवर कुठल्याही देशात आणि कुठल्याही धर्मात ते असू शकतात. तालीबानी ही धर्माच्या, जातीच्या, वर्णाच्या आणि लिंगाच्या आधारावर दुबळ्यांचे शोषण करणारी प्रवृत्ती आहे. भेदावर उभारलेली आणि तणकटासारखी अतिशय वेगाने फोफावत जाणारी ही विध्वंसक प्रवृत्ती आहे. फरक इतकाच कुठे ती उजळ माथ्यानं वावरते, तर कुठे वेगवेगळे बुरखे पांघरुन वेगवेगळ्या नावांनी छुप्या पद्धतीने आपला अजेंडा राबवित असते. आपल्या आजूबाजूलाच संधीच्या शोधात वावरणारी आणि तरीही ओळखू न येणारी ही विषवल्ली अधिक धोकादायक असते. वेळीच तिला पायबंद घालणे आवश्यक असते.

वेगवेगळ्या प्रदेशात समूहानं राहणाऱ्या माणसाचं जगणं सुसह्य व्हावं, त्याच्या जगण्याला एक सामुदायिक शिस्त असावी या हेतूने कधी काळी जगाच्या पाठीवर धर्म अस्तित्वात आले असावेत. पण ते धर्मच जेव्हा माणसांच्या जगण्यात प्रमाणाबाहेर हस्तक्षेप करतात, त्यांचं जगणं नियंत्रित करतात तेव्हा मानवी स्वातंत्र्याचा प्रश्न निर्माण होतो. आज तोच प्रश्न अफगाणिस्तानमध्ये निर्माण झाला आहे. आपल्या भूमीवर जिवापाड प्रेम करणारी माणसं आपल्याच भूमीत कमालीची भयभीत झाली आहेत. वर्षानुवर्षांची मुळं उपटून, घरंदारं, शेतीबाडी, उद्योग व्यवसाय आणि देश सोडून जिकडे वाट मिळेल तिकडे जीव मुठीत घेऊन सैरावैरा धावत निघाली आहेत. जिकडे आपण निघालो आहोत, तिथं आपली ओळख नेमकी काय असेल? तिथं तरी आपलं जगणं सुरक्षित असेल काय? जिथं निघालो आहोत, ती भूमी आपल्याला सर्वार्थाने स्वीकारेल काय? हे प्रश्न आजघडीला त्यांच्या दृष्टीने बिनमहत्त्वाचे आहेत. जिथं आपलं जगणं धोक्यात आहे, तो आपलाच देश सोडून आपला आणि आपल्या जिवलगांचा जीव वाचवणं हा त्यांच्या समोरचा प्राध्यान्यक्रम आहे. ज्यांना शक्य आहे, असे लोक याही परिस्थितीत देशांतर करतील. तिथंही त्यांच्यासमोर अनेक प्रश्न वाढून ठेवलेले असतील. मात्र ज्यांना देश सोडणं शक्य होणार नाही त्यांना एकतर धर्मांध बंदुकीतून आलेल्या गोळीला बळी पडावं लागेल अन्यथा आपण माणूस आहोत हे विसरून गुलामीचं जिणं जगावं लागेल.

देश कसा असू नये, याचे उदाहरण म्हणून आज धर्म केंद्रस्थानी ठेऊन विनाशाकडे वाटचाल करणाऱ्या देशांकडे पाहावे लागेल. कमालीच्या धर्मांध असलेल्या आणि त्यांच्या धर्मांधतेचा जागतिक सत्तासंघर्षात उपयोग करून घेणाऱ्या बलवान देशांनी सगळे जगच अस्थिर करून टाकलेले आहे. माणसामाणसांत भेद करणारी विद्वेषाची धर्मभावना लोकांमध्ये वाढत निघाली आहे. परिणामी प्रत्येक देशात कुठे उघड तर कुठे सुप्तावस्थेत असे छोटे मोठे धर्मांध गट कार्यरत झालेले आहेत. संधी मिळताच

दहशतीच्या जोरावर मान वर काढण्याच्या ते सतत प्रयत्नात आहेत. व्यवस्थेचा गैरवापर करून दडपशाहीच्या बळावर जगभर अनेक देशात हेच लोक सत्तेत आहेत. यामुळे लोकांचे जगणे कमालीचे असुरक्षित बनले आहे. आपला देशही त्याला अपवाद नाही. अशा शक्तींच्या विरोधात उभा राहाणाऱ्यांना चोहोबाजुंनी घेरण्याची रणनीती ते आखतात. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्वर्यु डॉ. नरेंद्र दाभोलकर, ज्येष्ठ पुरोगामी नेते कॉ. गोविंद पानसरे, ज्येष्ठ विचारवंत एम. एम. कलबुर्गी, धडाडीच्या पत्रकार गौरी लंकेश या लढाईचे बळी ठरले आहेत. प्रश्न विचारणारे लोक या व्यवस्थेला नको आहेत आणि दिवसेंदिवस ही व्यवस्था मुजोर होत निघाली आहे.

मित्रहो, सारे जगच आज कडेलोटाच्या टोकावर उभे आहे. अशावेळी प्रत्येकाला शांततेची गरज आहे. बंदुकीची गोळी ही कुठल्याही प्रश्नावरचे कधीही उत्तर नव्हे. अहिंसा आणि शांतताच माणसाला विकासाकडे नव्हे, तर समृद्धीकडे घेऊन जाईल. जागतिक विकासाचे गाजर दाखवून महासत्तेच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या शक्तींनी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की लोकांना नुस्ता कोरडा विकास नको आहे, तर सर्वार्थाने समृद्धीकडे नेणारा विवेकी विकास हवा आहे आणि अशा व्यापक समृद्धीच्या विकासाचा मार्ग आपल्याला गौतम बुद्ध आणि महात्मा गांधीच दाखवू शकतात. बहुधर्मीय असलेल्या आपल्या देशात घटनेनेच प्रत्येकाला आपापल्या धर्माप्रमाणे वागण्याचं स्वातंत्र्य दिलेलं आहे. त्या धर्मस्वातंत्र्याच्या अवकाशात शांततेने जगायचे असेल, तर बुद्ध आणि गांधी या महामानवांचे बोट पकडण्याशिवाय आपल्यासमोर दुसरा कोणताही मार्ग नाही. माणूस म्हणून असलेली ओळख पुसून धर्माच्या आधारावर जगभरातले लोक एकमेकांच्या विरोधात उभे राहावेत अशी सर्वत्र व्युहरचना सुरु आहे. अशावेळी इतरांच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच न करता दुसऱ्यांच्या धर्माचा आदर करीत धर्माने जगता येते हे बुद्ध आणि गांधींनी सांगितले आहे. आपल्याला ते ऐकावेच लागेल अन्यथा आज अफगाणिस्तानमध्ये लागलेली आग जगभरात पसरायला फारसा वेळ लागणार नाही आणि मग मात्र ही आग कोणाला म्हणजे अगदी कोणालाही विझवता येणार नाही. हा वणवा साऱ्या जगाला आपल्या कवेत घेईल, त्याआधीच आपण सावध व्हायला हवे. परसपरांचे हात हातात घेऊन गौतम बुध्द आणि महात्मा गांधी यांनी दाखविलेल्या अहिंसेच्या, शांततेच्या मार्गाने चालायला हवे.

एकनाथ पाटील

# अनुभवप्रामाण्य व अंधश्रद्धा निर्मूलनाचे आद्य प्रवर्तक : चार्वाक



अरुण शिंदे
९४२१० २४०५५

'चार्वाक' हे भारतीय संस्कृतीतील एक भौतिकवादी, तर्कनिष्ठ, जीवनवादी तत्त्वज्ञान. 'लोकायत' या नावानेही हे तत्त्वज्ञान ओळखले जाते. प्राचीन भारतातील सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, पूर्वमीमांसा (मीमांसा), उत्तरमीमांसा (वेदान्त) या षड्दर्शनांना आस्तिक म्हटले जाते. चार्वाक, जैन, बौद्ध यांना नास्तिक म्हटले जाते. पाणिनींच्या मते, 'आहे' अशी ज्याची मती आहे तो आस्तिक आणि 'नाही' अशी ज्याची मती आहे तो नास्तिक होय. याचा अर्थ नास्तिक म्हणून तो कशाचे तरी अस्तित्व नाकारत असतो. तो काय नाकारत असतो, हे मात्र पाणिनीने सांगितलेले नाही. सर्वसाधारणतः पुढील गोष्टी नाकारणाऱ्यांना भारतात नास्तिक म्हटले जाते - १. ईश्वराचे अस्तित्व २. वेदांचे प्रामाण्य ३. परलोक ४. पापपुण्य ५. जीवात्मा ६. विशिष्ट सिद्धांत. चार्वाकांनी या आणि इतर गोष्टी 'विशिष्ट अर्थाने' नाकारल्या हे खरे आहे. त्यामुळे पारंपरिक रूढ अर्थाने ते ' नास्तिक' ठरतात; परंतु त्यांच्या नास्तिकतेचे व इतरांच्या कथित आस्तिकतेचे स्वरूप बारकाईने समजून घेणे आवश्यक आहे.

डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या मते, भारतीय दर्शनविश्वामध्ये आस्तिक व नास्तिक या संज्ञांचा काटेकोर व निःपक्षपाती पद्धतीने वापर केला गेलेला नाही. कारण प्रत्येक दार्शनिक एकाच वेळी कशाचे तरी अस्तित्व मान्य करीत असतो आणि कशाचे तरी अस्तित्व नाकारतही असतो. अस्तित्व मान्य करणारा तो आस्तिक आणि नाकारणारा तो नास्तिक. या न्यायाने चार्वाक हे जगाचे अस्तित्व मानतात म्हणून आस्तिक आणि ब्रह्माचे अस्तित्व नाकारतात, म्हणून नास्तिक ठरतात. जो ईश्वराचे अस्तित्व नाकारतो, तो नास्तिक अशी समजूत भारतीय समाजात घट्ट रुजली आहे. चार्वाक ईश्वराला मानत नाहीत, म्हणून त्यांची प्रचंड बदनामी करण्यात आली. तसेच त्यांच्याविषयी खूप गैरसमजही पसरवण्यात आले. पूर्वमीमांसा, सांख्य या दर्शनांनी ईश्वराचे अस्तित्व नाकारूनही त्यांचा समावेश आस्तिक दर्शनामध्ये केलेला आहे. कारण ते वैदिकांच्या गोटातील होते. चार्वाकांनी वैदिकांच्या धूर्त, मतलबी, असत्य संकल्पनांवर कठोर हल्ले केले. वेदप्रामाण्य नाकारले. वैदिकांच्या हितसंबंधांच्या मुळावरच घाव घातला. त्यामुळे चार्वाकांना बदनाम करण्यासाठी नास्तिक म्हणून त्यांची हेटाळणी केली.

वास्तविक चार्वाकांनी उच्च मानवी मूल्यांचा पुरस्कार केला. समग्र मानवी जीवन त्यांच्या विचारविश्वाच्या केंद्रस्थानी होते. ऐहिक, भौतिक जीवन हा चार्वाकांचा विचार विषय होता. सर्वसामान्य माणसांच्या सुखमय जगण्याचा विचार त्यांनी मांडला. सुख हे साध्य आणि चार्वाकदर्शन हे साधन आहे. त्यामुळे ते मानवी जीवनासाठी हितकारक शास्त्र ठरते. ' बार्हस्पत्यसूत्र' या ग्रंथामध्ये म्हटले आहे की, 'अर्थसाधनेच्या वेळी उपयुक्त ठरणारे लौकायतिक हेच एकमेव असे परिपूर्ण शास्त्र आहे.' या विधानात चार्वाकदर्शनाचा एक परिपूर्ण शास्त्र म्हणून यथार्थ गौरव केलेला आहे. चार्वाकांचा विरोधक असलेल्या सोमदेवाने 'नीतिवाक्यामृत'मध्ये म्हटले आहे की, 'ऐहिक व्यवहार यशस्वी करण्याच्या बाबतीत लोकायतशास्त्र हे सर्वश्रेष्ठ शास्त्र होय. कारण ज्याने

लोकायतमताचा अभ्यास केला आहे, तो राजा राष्ट्रकंटकांचा उच्छेद करण्यासाठी धडपडतो.'

कौटिल्याने ' अर्थशास्त्र' या ग्रंथामध्ये आन्वीक्षिकी, त्रयी, वार्ता व दंडनीती अशा चार विद्या असल्याचे सांगितले आहे. त्याने म्हटले आहे की, 'सांख्य, योग व लोकायत म्हणजे आन्वीक्षिकी होय. आन्वीक्षिकी ही तर्कांच्याद्वारे त्रयी, वार्ता व दंडनीती या विद्यांच्या बलाबलांचे अन्वीक्षण करते. त्यामुळे ती लोकांच्या दृष्टीने उपकारक ठरते. आपत्तीच्या व संपत्तीच्या काळी लोकांची बुद्धी स्थिर ठेवते. लोकांना प्रज्ञा, भाषा आणि क्रिया यांच्या बाबतींत नैपुण्य प्राप्त करून देते. त्यामुळे आन्वीक्षिकी ही नेहमीच सर्व विद्यांच्या दृष्टीने प्रदीप ठरते. सर्व कर्मांचे साधन ठरते आणि सर्व धर्मांचे (कर्तव्यांचे वा नियमांचे) आश्रयस्थान ठरते.' कौटिल्याने सर्वश्रेष्ठ मानलेल्या विद्येमध्ये लोकायतांचा अंतर्भाव करून त्यांचा यथार्थ गौरव केला आहे.

प्राचीन भारतीय दर्शनांमध्ये मानवी जीवनावर प्रेम करण्याचे, जीवन प्रयत्नपूर्वक मधुर, आनंददायी, प्रसन्न करण्याचे, उमदे, जीवनप्रेमी विचार चार्वाकांइतक्या उत्कटपणे क्वचितच कोणी मांडले असतील. स्वाभाविकच, चार्वाक नुसते आस्तिक न राहता 'आस्तिकशिरोमणी' ठरतात. बृहस्पती हे या दर्शनाचे सूत्रकार, पुरस्कर्ते होते. ते या देशातील बहुजन समाजाचे दर्शन आहे (२०१८ : २४-२५).

चार्वाकांनी भ्रामक तत्त्वज्ञान मांडणाऱ्या वैदिकांची अक्षरशः चिरफाड केली. कुठलीही तडजोड न करता ते निर्भयपणे व आक्रमकपणे वैदिकांच्या समोर उभे राहिले. त्यामुळे वैदिकांच्या मनात त्यांच्याविषयी कमालीचा द्वेष, तिरस्कार होता. चार्वाकांची मुस्कटदाबी करून त्यांचा नायनाट करण्यासाठी वैदिकांनी आपल्या सर्व शास्त्रांचा वापर केला. चार्वाक मतांचा स्वीकार म्हणजे धर्मशास्त्राच्या विरुद्ध सर्वांत मोठे पाप करण्यासारखे आहे. म्हणून नास्तिकांवर सामाजिक बहिष्कार टाकण्याचा आदेश देण्यात आला. लोकायत नास्तिकांना बहिष्कृत करावे, त्यांची शहरातून हकालपट्टी करावी, त्यांच्याशी बोलू नये, त्यांची साक्ष ग्राह्य मानू नये, नास्तिकांचे प्राबल्य असणारे राज्य दुष्काळ, रोगराई यांनी ग्रस्त होते, सबब त्या राज्यात राहू नये. इत्यादी नियम करून दशहत बसविण्यात आली. नास्तिकांना शिकवू नये, असा आदेश देऊन त्यांचे ज्ञानाचे दरवाजे बंद करण्यात आले. चार्वाकांचे सर्व बाजूंनी खच्चीकरण करण्याचे प्रयत्न झाले. इतकेच नाही, तर प्रसंगी त्यांना ठार मारण्यात आले. वेनराजाने यज्ञ, दान वगैरे कर्मकांड निषिद्ध ठरविले. म्हणून वैदिकांनी त्यास ठार मारल्याची कथा 'विष्णुपुराणा'त आली आहे. महाभारतामध्ये एका चार्वाकाला जिवंत जाळून मारल्याची नोंद आहे. चार्वाकांना मानसिक, बौद्धिक, शारीरिकदृष्ट्या संपविण्याबरोबरच त्यांचे ग्रंथही नष्ट केले. त्यांच्या विचारांचे विकृतीकरण केले. बृहस्पतीने चार्वाकदर्शनांची सूत्रे लिहिली होती; परंतु आज ती उपलब्ध नाहीत. अशा स्थितीत संस्कृत प्राकृत साहित्यातील चार्वाकांचे छोटे-मोठे उल्लेख तसेच चार्वाकांच्या विरोधकांनी त्यांच्याविषयी केलेले लेखन, यांचा तारतम्याने अभ्यास करून चार्वाकदर्शनाचे स्वरूप समजून घेण्याचा प्रयत्न करावा लागतो.

तत्त्वोपप्लवसिंह ( जयराशिभट्ट, सुमारे आठवे शतक), बार्हस्पत्यसूत्रम् (संपा. एफ. डब्लू. थॉमस, लेखनकाळ सुमारे बारावे शतक), सर्वदर्शनसंग्रह ( सायणमाधव, सुमारे चौदावे शतक), षड्दर्शनसमुच्चय (हरिभद्रसुरी, सुमारे आठवे शतक), सर्वमतसंग्रह ( संपा. टी. गणपतिशास्त्री), सर्वसिद्धांतसंग्रह ( संपा. एम. रंगाचार्य) इत्यादी ग्रंथांमधून चार्वाकदर्शनाचा सोनेरी कवडसा नजरेस पडतो.

आधुनिक काळात चार्वाकदर्शनावर काही

लेखन झाले आहे. चार्वाक आणि चारिणी (राघवेंद्र कुलकर्णी, १९५३), चार्वाक : इतिहास आणि तत्त्वज्ञान (सदाशिव आठवले, १९५८), चार्वाकसमीक्षा (सं. गणेश थिटे, १९७८), लोकायत (देवीप्रसाद चट्टोपाध्याय), आस्तिकशिरोमणी चार्वाक (आ. ह. साळुंखे, १९९२) इत्यादी ग्रंथांमधून चार्वाकदर्शनाचा मागोवा घेत त्यावर भाष्य केले आहे.

आपण आतापर्यंत चार्वाकदर्शनाची काही एक पार्श्वभूमी पाहिली. आता आपण चार्वाकदर्शनाचे स्वरूप समजून घेण्याचा प्रयत्न करू.

प्रत्येक दर्शनाची एक सैद्धांतिक भूमिका असते व त्या दर्शनात मांडलेला प्रमाणविचार हा त्या भूमिकेचा पाया असतो. प्रमाण म्हणजे ज्ञानाचे साधन. आपण जे ज्ञान प्राप्त करतो, ते डोळा वगैरेंसारख्या साधनांच्याद्वारे होय. म्हणून डोळा वगैरेंना प्रमाण म्हटले जाते. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात प्रत्यक्ष, अनुमान व शब्द ही तीन प्रमाणे मानली जातात. चार्वाकांनी प्रत्यक्ष प्रमाण मानले. प्रामाण्यविचारांमागील चार्वाकांची भूमिका स्पष्ट करणारी एक कथा 'गुणरत्ना'ने सांगितलेली असून ती खूप बोलकी आहे.

"नास्तिक विचार स्वीकारलेला कोणी एक मनुष्य होता. त्याची पत्नी मात्र आस्तिक विचारांची होती. तो आपल्या शास्त्रात सांगितलेल्या युक्तिवादांनी रोज तिचे प्रबोधन करण्याचा प्रयत्न करीत असे. तिला मात्र त्याचे म्हणणे पटत नसे. तेव्हा त्याने एक क्लृप्ती काढली. तो उत्तररात्री तिला घेऊन गावाबाहेर गेला. 'अप्रत्यक्ष पदार्थाविषयी अनुमाने करणाऱ्या या नगरवासी लोकांचे चातुर्य तू पहा', असे तो तिला म्हणाला. त्या नंतर त्याने वेशीपासून गावातील चौकापर्यंतच्या धुळीने भरलेल्या राजमार्गावर आपल्या हाताची तीन तीन बोटे विशिष्ट पद्धतीने उठविली. ते ठसे लांडग्याच्या पावलांसारखे होते. सकाळी उठून लोक तेथे जमा झाले आणि म्हणू लागले, 'अहो, लांडग्याच्या पावलांचे दुसऱ्या कोणत्याही पद्धतीने स्पष्टीकरण संभवत नाही. रात्री वनातून एखादा लांडगा येथे आला असला पाहिजे.' मग तो नास्तिक आपल्या पत्नीला म्हणाला, 'प्रिये, पहा बरे! लोक, हे ठसे लांडग्याच्या पावलांचे आहेत, असे म्हणत आहेत.' परलोक वगैरे मानणारांची स्थिती अशीच आहे, असेही त्याने पत्नीला सांगितले. 'हे लोक खूप जण आहेत आणि ते समान विचार मांडत आहेत, तरीदेखील त्यांचे बोलणे मान्य करता येत नाही. लोकांना लांडग्याच्या पावलांविषयी वस्तुस्थितीचे योग्य ज्ञान नाही. ते खूप जण असून एकसारखे बोलत असले, तरी ज्यांना वस्तुस्थितीचे ज्ञान आहे, त्यांना त्यांचे बोलणे स्वीकार्य वाटत नाही. तसेच हे खूप जण धार्मिक व्यक्तीचे रूप घेतलेले धूर्त आहेत. ते इतरांना फसवू पहात आहेत. अनुमान, ग्रंथप्रमाण वगैरेंच्या आधारे आग्रहपूर्वक जीव वगैरेंचे अस्तित्व असल्याचे सर्व जण समान रीतीने सांगत आहेत. तथापि ते भोळ्याभाबड्या लोकांना उगाच स्वर्ग वगैरेंमुळे मिळणाऱ्या सुखाचे प्रलोभन दाखवून अज्ञान निर्माण करीत आहेत. तेव्हा विवेकी माणसांनी त्यांच्या बोलण्याची उपेक्षा केली पाहिजे.' त्या नंतर तिने पतीचे सर्व बोलणे मान्य केले."

ज्ञानक्षेत्रामध्ये चार्वाकांनी केलेला हा एक क्रांतिकारी प्रयोग होता. परंपरा कशा निर्माण होतात, पसरतात, टिकून राहतात आणि चिकित्सा केल्यावर अज्ञानातून निर्माण झालेल्या परंपरा कशा कोलमडून पडतात, हे या प्रयोगातून फार चांगल्या रीतीने स्पष्ट होते. एखादी गोष्ट हजारो लोक, हजारो वर्षे सांगत आहेत एवढ्यावरून ती खरी ठरत नाही. ती अनुभवाच्या कसोटीवर उतरली तरच खरी ठरू शकते. चार्वाकांनी अनुभवप्रामाण्याचा आग्रह धरला तो याचसाठी. त्यांचा समग्र प्रमाणविचार हा वैज्ञानिक, विवेकी आहे असे दिसून येते.

चार्वाकांनी शब्दप्रामाण्याबाबत चिकित्सेची भूमिका घेतली व 'जे वचन सयुक्तिक असेल ते स्वीकारावे' असे म्हटले. वैदिकांच्या दृष्टीने वेद हेच शब्दप्रमाण आहेत. वेद हे ईश्वरनिर्मित, अपौरुषेय, अलौकिक ग्रंथ आहेत. बृहस्पतीने मात्र या गोष्टीवर आक्षेप घेतला. ' आप्तवाद ( शब्द) हे काही आकाशातून पडत नाहीत' असे त्यांनी म्हटले. वैदिकांनी वेद हे सर्वश्रेष्ठ, स्वयंभू असून त्यांची चिकित्सा करावयाची नाही, असा दंडक केला होता. या उलट चार्वाकांनी वेदांचे प्रामाण्य नाकारून वेदांवर कठोर टीका केली.

'वेदांची निर्मिती धूर्तांनी केली आहे' असे 'प्रबोधचंद्रोदय' या नाटकातील चार्वाकाने म्हटले आहे. वेद केवळ धूर्तांनी नव्हे, तर धूर्त, भंड व निशाचर यांनी निर्माण केले आहेत, असे चार्वाकमत ' सर्वदर्शनसंग्रहा' त आले आहे. धूर्त म्हणजे दुसऱ्याला फसविणारा, भंड म्हणजे विदूषक तर निशाचर म्हणजे हिंस्र पशू वा चोर होय. बृहस्पतीने आणखी म्हटले आहे की, तीन वेद हे बुद्धिपौरुषहीन लोकांच्या उपजीविकेसाठी उपयोगी पडतात. खोटेपणा, आत्मविसंगती व पुनरुक्ती या दोषांनी वेद दूषित झाले आहेत. स्वतःला वैदिक म्हणवून घेणारे लोक हे धूर्त बगळे आहेत. अग्निहोत्र वगैरेंचे प्रयोजन उदरनिर्वाहाखेरीज दुसरे काही नाही इत्यादी.

'बार्हस्पत्य अर्थशास्त्रा' मध्ये चार्वाकमत पुढीलप्रमाणे आढळते - 'अग्निहोत्र, वेदपठण वगैरे करू नये. कामार्त मनुष्य स्वतःचा दोष लपविण्यासाठी वेदपठण करतो. तसेच मद्यपानासाठी व स्त्रीसमागमासाठी वेदपठण करतो.

वेदांचा उपयोग स्वतःचे हितसंबंध जपण्यासाठी एक मुखवटा, आवरण वा संवरण म्हणून केला जातो', असा चार्वाकांचा आक्षेप होता. चार्वाकांनी ईश्वरासारखी अतिमानवी शक्ती मानली नाही. त्यामुळे वेदांचे अलौकिकत्व, ईश्वरकर्तृत्व त्यांना मान्य होणे शक्यच नव्हते. वेद हे त्या वेळच्या ऋषींनी निर्माण केलेले आहेत. वेदनिर्मात्यांनी वेदामधून त्यांचे हितसंबंध जपले आहेत, अशी चार्वाकांची भूमिका होती. त्यांनी वेदातील हितसंबंधी गोष्टींवर आणि त्यातून निर्माण होणाऱ्या ढोंगबाजीवर कठोर टीका केली.

देहाहून वेगळ्या आत्म्याचे अस्तित्व अनुभवास येत नाही, अशी स्पष्ट भूमिका घेऊन चार्वाकांनी आत्म्याचे अस्तित्व नाकारले. चेतन देह हाच आत्मा, असा देहात्मवाद त्यांनी मांडला. देहाहून वेगळ्या आत्म्याचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी योग्य ते प्रमाण उपलब्ध नाही. देहाहून वेगळा असा कोणी आत्मा नसतो. प्रत्यक्ष प्रमाणाने अनुभवाला येणारा चैतन्यगुणाने युक्त असा देहच मी मनुष्य आहे, असे चार्वाकांचे मत होते. देहात्मवादाच्या या सिद्धांतामुळे चार्वाकदर्शन इतर सर्व दर्शनांहून वेगळे ठरते. 'देहाहून वेगळ्या अशा आत्म्याचे अस्तित्व मान्य केले तर, पारलौकिक विश्वाचा डोलारा उभा राहू शकतो, हे ध्यानात घेतले असता चार्वाकांचा हा सिद्धांत म्हणजे मुळावर घातलेला घाव आहे', असे आ. ह. साळुंखे यांनी म्हटले आहे. देहाहून भिन्न आत्म्याच्या तत्त्वज्ञानाने भारतीय समाजजीवनावर विपरीत परिणाम केला आहे. 'देह असत्य व देहाहून भिन्न आत्मा सत्य' मानण्याच्या प्रवृत्तीमुळे वास्तव देहाला हीनत्व व कल्पित आत्म्याला महत्त्व प्राप्त झाले. देहाच्या बंधनातून आत्म्याची मुक्तता करून घेणे, हेच मानवी जीवनाचे ध्येय बनले. त्यामुळे मानवी जीवनाविषयी तुच्छता भाव निर्माण झाला व मोक्षाचे, मुक्तीचे आकर्षण वाढत गेले. मानवी देह व हे एकूणच जग कसे निर्माण झाले, याबद्दल चार्वाकांची स्पष्ट मते होती. पृथ्वी, पाणी, अग्नी व वायू या चार महाभुतांच्या संयोगातून जग निर्माण झाले आहे. देहातील चैतन्यही त्यांच्या संयोगातून निर्माण झाले आहे. महाभुतांचे विघटन झाले की, चैतन्याचा नाश

होतो आणि तेथेच देहरूपी आत्मा संपून जातो. त्यामुळे नवा देह धारण करणारा कोणी आत्मा शिल्लक राहत नाही. स्वाभाविकच व्यक्तीला पुनर्जन्म, पूर्वजन्म असू शकत नाही, असे चार्वाकांनी ठामपणे सांगितले. या संदर्भातील बृहस्पतीचे वचन प्रसिद्ध आहे. ते म्हणतात, ' भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कृतः? ' महाभुतांपासून देहाची निर्मिती आणि महाभुतांमध्येच देहाचा विलय हे चार्वाकांचे मत ' सर्वमतसंग्रहा' त आले आहे. 'विद्वन्मोदतरंगिणी' मध्ये 'पुनर्जन्मदेखील नाही' अशा स्पष्ट शब्दांत पुनर्जन्म नाकारला आहे. चार्वाकांनी केवळ पुनर्जन्मच नाकारला असे नाही, तर त्यांनी एकूणच मरणोत्तर अस्तित्व नाकारले. मृत्यूबरोबर सर्व काही संपते, असे चार्वाकांनी मानल्यामुळे मरणोत्तर जीवनाच्या संदर्भातील सर्व कल्पना निकालात निघाल्या. वैदिक, जैन, बौद्ध या सर्वांनी कोणत्या ना कोणत्या स्वरूपात पुनर्जन्म स्वीकारला आहे. पुनर्जन्म नाकारणारे यहुदी, ख्रिस्ती, मुसलमान हे मरणोत्तर अस्तित्व मान्य करतात. या पार्श्वभूमीवर चार्वाकांची वास्तववादी जीवनदृष्टी व आपल्या मतांच्या प्रतिपादनासाठीचे कमालीचे धैर्य यांचे दर्शन घडते.

चार्वाकांनी कर्मसिद्धांतही नाकारला. जीवात्म्याच्या कर्माची फळे त्याला पुनर्जन्म घेऊन भोगावी लागतात, असे सांगणारा कर्मसिद्धांत वैदिक, बौद्ध व जैन धर्मामध्ये सांगितला गेला होता आणि त्यास महत्त्वाचे स्थान होते. चार्वाकांनी पुनर्जन्म नाकारल्यामुळे कर्मसिद्धांतही आपोआप नाकारला गेला. 'मृत्यूनंतर आत्म्याला कर्मफळे भोगावी लागतात, हा विचार धूर्तांचा असून तो टाकून दिला पाहिजे' असे चार्वाकांनी म्हटले आहे. चार्वाकांचा हा विचार सामाजिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. कर्मसिद्धांताच्या प्रभावामुळे हजारो वर्षे भारतातील वर्णजातिव्यवस्था, शोषण, विषमता, अन्याय वगैरेंना एक तात्त्विक अधिष्ठान मिळाले होते. आपल्या दुःखदैन्याला, दारिद्र्याला, अमानुष अवस्थेला, शोषणाला माझीच पूर्वकर्मे जबाबदार आहेत, कोणी बाह्य शोषक वा समाजव्यवस्था जबाबदार नाही, अशी धारणा बनल्यामुळे समाजात अन्याय, दुःखे निमूटपणे भोगण्याची सोशिकता निर्माण झाली होती. त्यामुळे वर्चस्ववाद व उच्चनीचतेची उतरंड, शोषण यांचा अर्थ लावण्याची, त्याविरुद्ध बंड करण्याची प्रेरणाच शोषितांच्यामध्ये निर्माण झाली नाही. परिणामी, इथली शोषणव्यवस्था हजारो वर्षे अबाधित राहिली. चार्वाकांनी कर्मसिद्धांतावर हल्ला करून दैववादी मानसिकतेला, अन्यायी समाजव्यवस्थेला एक प्रकारे आव्हान दिले.

चार्वाकांनी पुनर्जन्माप्रमाणेच परलोकही नाकारला. ' परलोकात जाणाऱ्या जीवात्म्याचा अभाव असल्याने परलोकाचाही अभाव आहे', असे बार्हस्पत्य सूत्र आहे. 'स्वर्ग नाही, मोक्ष नाही तसेच परलोकात जाणारा आत्माही नाही' , असे बृहस्पतीचे विचार 'सर्वदर्शनसंग्रहा'मध्ये उद्धृत केले आहेत. 'इहलोकीच्या उपभोगाचा त्याग करून परलोक मिळविण्यासाठी प्रयत्न करणे म्हणजे तळहातावरील खाद्यपदार्थ टाकून कोपर चाटण्याचा प्रकार होय', अशा मार्मिक शब्दांत चार्वाकांनी आपले मत मांडले आहे.

भौतिकवादी चार्वाकांनी ईश्वराचे अस्तित्व स्पष्ट शब्दांत नाकारले. 'या जगाचा कोणी निर्माता, पालनकर्ता व नाशकर्ता असा ईश्वर नाही', असा चार्वाकविचार ' विद्वन्मोदतरंगिणी' या ग्रंथात आढळतो. 'सर्वदर्शनसंग्रहा'मध्ये म्हटले आहे की, 'चार्वाकाने ईश्वराच्या अस्तित्वाचे खंडन केले आहे आणि चार्वाकाचा प्रयत्न खोडून काढणे अवघड आहे. कारण बहुतेक सर्व लोक चार्वाक मताचेच अनुसरण करतात.'

' सर्वमतसंग्रहा' मध्ये चार्वाकांचे पुढील महत्त्वपूर्ण विधान उद्धृत केले आहे, 'स्वर्ग व नरक

यांचा अभाव असल्यामुळे मानवांना स्वर्ग व नरक देणारा कोणी परमेश्वरही अस्तित्वात नाही.' ईश्वराचे अस्तित्व नाकारणाऱ्या चार्वाकांनी 'नैषधीयचरिता' मध्ये युक्तिवाद केला आहे की, 'ईश्वर हा जर सर्वज्ञ व करुणाशील असेल आणि त्याचे बोलणे कधी वाया जात नसेल, तर आम्ही याचना करताक्षणीच तो आमची इच्छा का बरे पूर्ण करीत नाही?'

कल्पित ईश्वर नाकारल्यानंतर चार्वाकांनी 'लोककल्याणकारी राजा हाच ईश्वर आहे', अशी नवी भूमिका घेतली. ' सर्वदर्शनसंग्रहा' त 'लोकसिद्धो राजा परमेश्वरः' असा चार्वाकविचार आला आहे. 'लोकसिद्ध राजा हाच परमेश्वर आहे. दुसरा परमेश्वर नाही. ' ' लोकव्यवहारात आढळणारा राजा हाच परमेश्वर' असे चार्वाकमत 'न्याकुसुमांजली'मध्ये येतो. उदा. सम्राट अशोक, छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महाराजा सयाजीराव गायकवाड यांसारख्या राजांनी रयतेचे दुःखदैन्य दूर करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे आपली काळजी घेणारे, न्याय देणारे राजे हेच आमचे ईश्वर आहेत, अशी रयतेची भूमिका होणे रास्त, न्यायोचित आहे. चार्वाकांनी या मताची सर्वप्रथम मांडणी केली.

भारतीय संस्कृतीमध्ये धर्म, अर्थ, काम व मोक्ष असे चार पुरुषार्थ मानले आहेत. त्यामध्ये धर्म व मोक्ष हे प्रधान आहेत. जन्ममरणाच्या फेऱ्यातून आणि पर्यायाने सांसारिक दुःखातून सुटका, वैदिकांबरोबरच जैन व बौद्ध यांनीही मोक्ष वा निर्वाण हेच मानवी जीवनाचे सर्वश्रेष्ठ उद्दिष्ट आणि परमकल्याण मानले आहे. चार्वाकांनी मात्र हा पारलौकिक मोक्ष नाकारला आहे. अर्थ व काम हे दोनच पुरुषार्थ त्यांनी मानले आहेत. मोक्ष मानायचाच झाला, तर मरण हाच मोक्ष असे चार्वाकांनी अनेकदा म्हटले आहे. ' सर्वसिद्धांतसंग्रहा' त चार्वाकांनी म्हटले आहे, 'मरण हाच मोक्ष असून प्राणवायू निवृत्त होणे, हेच मरण होय. ' ' सर्वदर्शनसंग्रहा' तही ' देहोच्छेदो मोक्षः' असे म्हटले आहे. 'देहाचा नाश हीच मुक्ती' असेही त्याच ग्रंथात म्हटले आहे. मोक्षासाठी केला जाणारा आटापिटा व सोसले जाणारे क्लेश व्यर्थ आहेत, हा विचार मांडताना चार्वाक म्हणतात, 'स्वर्ग नाही, मोक्ष नाही. लोक त्यांच्यासाठी उगाचच क्लेश सहन करतात.' चार्वाकांनी अनेक युक्तिवाद करून पारंपरिक मोक्ष संकल्पना पूर्णपणे नाकारली आहे.

मोक्षाच्या बाबतीत एक अत्यंत महत्त्वाचा विचार चार्वाकांनी मांडला आहे. तो असा, 'पारतंत्र्य बंधः स्वातंत्र्यं मोक्षः।' पारतंत्र्य हा बंध तर स्वातंत्र्य हाच मोक्ष. या चार्वाकांच्या भूमिकेवर भाष्य करताना आ. ह. साळुंखे म्हणतात, “चार्वाकांची ही संकल्पना भारतीय संस्कृतीच्या इतिहासातील एक आगळी व युगप्रवर्तक संकल्पना आहे. मनुष्य जोपर्यंत दुसऱ्याच्या बंधनात असतो, तोपर्यंत त्याचा विकास कुंठित होऊन राहतो. त्याचे व्यक्तिमत्त्व सर्वांगाने उमलू, फुलू शकत नाही. बंधने तुटल्याशिवाय स्वतःच्या जीवनाचे निर्णय स्वतः घेण्याचे सामर्थ्य त्याच्या ठिकाणी जागृत होऊ शकत नाही. स्वातंत्र्याच्या उत्कट आकांक्षेमध्ये मानवी मनात जिजीविषा (जगण्याची इच्छा) आणि विजिगिषा (विजयाची इच्छा) असते. चार्वाकांना निराशेने जगायचे नव्हते. जीवनापासून पळायचे नव्हते. म्हणून त्यांनी स्वातंत्र्यालाच सर्वोत्तम पुरुषार्थ मानले” (२०१८ : ८३).

वैदिकांनी इहलोकापेक्षा परलोकीच्या सुखाला अधिक महत्त्व दिले. परलोकीच्या सुखासाठी मोक्ष व स्वर्ग या संकल्पना मांडल्या. दुःख भोगण्याचे स्थान म्हणून नरक मानला. चार्वाकांनी मात्र मोक्ष, स्वर्ग, नरक या सर्व संकल्पना नाकारल्या. हे सर्व नाकारत असताना, इहलोकीचे दुःख टाळण्याचा प्रयत्न करावा आणि इहलोकीचे सुख मिळविण्याचा प्रयत्न करावा, असे

आग्रहपूर्वक सांगितले. स्वर्ग-नरकाच्या संकल्पना स्वीकारायच्याच असतील, तर इहलोकीचे सुख हाच स्वर्ग वा पुरुषार्थ आणि इहलोकीचे दु:ख हाच नरक, असा विचार त्यांनी मांडला. 'यावज्जीवेत् सुखं जीवेत्' अशी घोषणा त्यांनी केली. 'माणसाने ते कर्म करावे, की ज्याच्यामुळे अखेरीस सुख प्राप्त होईल', अशी विवेकी, जबाबदारीची भूमिका त्यांनी घेतली आहे.

चार्वाकांच्या मतांचे मूल्य व महत्त्व अधोरेखित करताना डॉ. साळुंखे म्हणतात, "चार्वाकांचे वरील सर्व विचार बारकाईने पाहिले असता एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की, त्यांनी प्रमाणविचारांच्या आधारे सर्व पारलौकिक संकल्पना नाकारल्या. हे सर्व नाकारत असताना त्यांनी प्रमाणविचाराला प्रत्यक्ष प्रयोगशीलतेची जोड दिली. आत्म्याचे स्वतंत्र अस्तित्व नाकारून पारलौकिक संकल्पनांच्या मुळावरच घाव घातला. अर्थात त्यांची मांडणी केवळ नकारात्मक व वितंडवादाची नव्हती. त्यांनी नैरात्म्यवाद स्वीकारताना देहात्मवाद व भौतिकवाद मांडला. कर्मसिद्धांत नाकारताना प्रयत्नवादाचा पुरस्कार केला. पुनर्जन्म नाकारून वर्तमान जीवनावर प्रेम करण्यास सांगितले. परलोक नाकारताना इहलोकाचा गौरव केला. ईश्वर नाकारताना स्वभाववाद सांगितला व राजाचे महत्त्व विशद केले. पारलौकिक दु:खे नाकारताना इहलोकीच्या सुखाचा स्वीकार करण्याची प्रेरणा दिली (२०१८ : ८६). यामुळे चार्वाक हे रचनात्मक, नवनिर्माणशील होते, हे सिद्ध होते."

(पूर्वार्ध)

■ ■ ■



# सण उत्सव आणि अंधश्रद्धा



दीपक बाविस्कर
८९९९० ४८१४७

'श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे, ' या बालकवींच्या ओळी श्रावणात आठवल्या नाहीत, असे होत नाही. बालकवींनी निसर्गाचे केलेले वर्णन जेव्हा आपल्या दृष्टीस पडते नी म्हणून या ओळी आपोआप स्मरतात. हाच श्रावण मग सणवार यांची रेलचेल घेऊन येतो. मात्र हा बहरलेला, निसर्ग ओरबाडणे म्हणजे सणोत्सव साजरा करणे नव्हे. या सण-उत्सवा मधून मानवाला निर्मळ आनंद मिळाला पाहिजे. मात्र आज प्रत्येक सण-उत्सव हे मानवी समस्या, कलह, पर्यावरण ऱ्हास करणारे ठरतात. कोणत्याही सणातून आनंद मिळावा, सण साजरा करतांना तो कालसुसंगत करावा, त्यातून मानवी संबंध दृढावतील असा तो साजरा झाला पाहिजे. हिच अपेक्षा कोणताही विवेकी माणूस करेल.

पूर्वीच्या काळी अपुऱ्या साधनांमुळे माणसांच्या भेटीगाठी होणे दुरापास्त होते. मात्र आज आपल्याकडे असणाऱ्या सोयी- सुविधा, साधने यामुळे आपण दिवसातून चारदा बाहेरगावी राहणाऱ्या व्यक्ती, मित्रमंडळी, नातेवाईक यांच्याशी संपर्क करू शकतो प्रत्यक्ष भेटू शकतो. अशी परिस्थिती पूर्वीच्या काळी नसल्याने सण वारांचे निमित्त काढून वर्षातून एक दोनदा आप्तेष्टांना भेटीसाठीचे नियोजन केले जात होते. हेच स्नेह वृद्धीचे कारण होते. आज परिस्थिती बदलली. ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या. भौतिक सोयी-सुविधा वाढल्या. त्याचे स्वरूप बदलले जगण्याचा वेग वाढला, असे सारे म्हटल्यावर ज्ञान आणि अज्ञानाची दरी कमी झाली पाहिजे. मानवाचे कालसुसंगत वर्तन घडणे अपेक्षित आहे. मात्र आजही आपण निसर्ग, पर्यावरण, मानवी स्नेहबंध, श्रद्धा यांचा डोळसपणे विचार करताना दिसत नाही.

सण- उत्सव साजरा करणे म्हणजे निसर्गाकडून मिळणाऱ्या वस्तू तसेच पर्यावरण, पैसा, वेळ, श्रम, मानवी संसाधन याचा अपव्यय करणे असे मुळीच नाही. मानवाने आज खऱ्या मानवतेचा विचार केला पाहिजे. आजपर्यंतची सण-उत्सवाची कल्पना जाती-धर्मात विभागलेली आपल्याला दिसत होती. त्यात अलीकडे चांगला बदल होताना दिसतो आहे, म्हणूनच सर्वच जाती-धर्माचे बांधव एकत्र सण-उत्सव साजरा करताना दिसतात. हाच उदात्त विचार यातून दृढ होण्याची हीच वेळ आहे. त्यातून खऱ्या अर्थाने सामाजिक बांधिलकी जपली जाणार आहे. सण-उत्सवातून खऱ्या अर्थाने 'मानवता ' जपली जावी, निसर्ग, पर्यावरण संतुलन राखले जावे. मात्र तसे होताना दिसत नाही. मानवी संसाधन, श्रम, वेळ, पैसा तसेच पर्यावरण याचा योग्य विनियोग होताना दिसत नाही. पर्यावरण ऱ्हास, निसर्गाला ओरबाडणे, निसर्ग नियमाच्या विरोधी वर्तन करणे हे सारे घडत असल्याने त्या विरोधी कायदे करणे भाग पडते. कायदा झाला म्हणजे समस्या सुटतात असे मुळीच नाही. तसे असते तर आज हुंडाबंदी, दारूबंदी, भ्रष्टाचार विरोधी कायदा होऊन अनेक दशके

ओलांडली. मात्र ते आपल्याला समाजात होताना दिसते. यासाठी मानवतेच्या दृष्टीने विचार करून सण- उत्सवांना कालसुसंगत स्वरूप देणे, हेच महत्त्वाचे आहे.

मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. समाजात, समुदायात राहणे ही त्याची मानसिक गरज आहे. यातूनच सण-उत्सवांची कल्पना उदयास आली. याबरोबर ज्या पद्धतीने समुदायात राहण्याचे कारण मानसिक गरज सांगितले जाते ती गरज भीती आणि असुरक्षितता यातूनच जन्माला येते. हे सारे अज्ञानातून येताना दिसते. त्याचेच पुढे अंधश्रद्धेत रूपांतर होते . अंधश्रद्धेची अतिशय साधी आणि सोपी व्याख्या सांगायची झाली तर ती अशी सांगता येईल 'ज्ञान म्हणजे श्रद्धा व अज्ञान म्हणजे अंधश्रद्धा'. भीती, असुरक्षितता, मृत्यूचे भय हे सारे ज्ञानाच्या अभावातून जन्माला येते. त्यातून सुटका म्हणून जवळचा मार्ग अंधश्रद्धा स्वीकारला जातो आणि यालाच खत-पाणी मिळते ते अनिष्ट रुढी, अपरंपरानी सणोत्सवाचे बिभत्स स्वरूप.

सण उत्सवात आपल्याकडे महत्वाची भूमिका बजावण्याचे काम करते स्त्री, सण-उत्सव साजरा करणे हे महिलांचे हक्काचे काम. हा त्यांचाच प्रांत, जणू काही त्यांची मक्तेदारी म्हणून वर्षानुवर्षे त्यांच्याकडेच सोपवणे. तिला तो हक्काचा अधिकार असल्याचे तिच्यावर संस्कार केले जातात. त्यातूनच ती महिला कधी अंधश्रद्धेचे वाहक बनते हे तिलाही कळत नाही. या साऱ्यात धन्यता मानण्याच्या अविर्भावात तिला जाणूनबुजून ठेवले जाते. एका अर्थाने या माध्यमातून कुटुंबाकडून तिचा छद्म अहम जपला जातो. यातच तीसुद्धा धन्यता मानते. आपल्या खऱ्या अस्मितेला तिलांजली देते. मानवी स्नेहता, परस्पर भावबंधापासून ते राष्ट्रीय एकात्मतेच्या वाढीसाठी सण-उत्सव महत्त्वाचे असल्याचे सांगितले जाते. मात्र याच सण-उत्सवाचे आज निर्माण झालेले स्वरूप, त्याच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात केली जाणारी शारीरिक, मानसिक तसेच आर्थिक पिळवणूक याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करून अंधश्रद्धेला खतपाणी घालते. सण उत्सवाच्या नावे धार्मिक, सामाजिक एक्याचे खुळे दाखले दिले जातात. सण-उत्सव साजरा करणे म्हणजे देवा धर्माचे काम, असे सांगून त्याबद्दल विवेकी चिकित्सा करणे द्रोह करण्यासारखे मानले जाते.

स्त्रियांकडून सण- उत्सव एवढ्या उत्साहाने करण्यामागेही काही मानसशास्त्रीय कारणे आहेत. आजही बऱ्याच कुटुंबात, समाजात स्त्रीला दुय्यम स्थान दिले जाते. खऱ्या अर्थाने आजही बऱ्याच बाबतीत पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून सोबतच नाही तर काही बाबतीत स्त्री पुढेही असल्याचे दिसते. तरीही तिचा दुय्यमतेचा शिक्का आजही पुसला गेला नाही. यातूनच तिची कुठेतरी मानसिक कुचंबणा होते, म्हणून तिची मानसिक गरज हे सांगते की, ‘मला देखील ॲड्रेस केले गेले पाहिजे.‘ अर्थात कुटुंबाने तिची दखल घेणे आवश्यक असल्याची तिची मानसिकता तिला या गोष्टी करण्यास प्रवृत्त करते. अशा वेळी कुटुंबाकडून तिची सहानुभूतीपूर्वक दखल घेतली जावी, या जाणिवेची गरजपूर्ती म्हणून ती सण उत्सवातून व्यक्त होऊ पाहते. सणोत्सवाच्या या दोन दिवसात का होईना आपला ‘स्व‘ जपला जातो, कुटुंबाकडून आपली दखल घेतली जाते, या मानसिकतेतून ती सुखावते. म्हणून ती सारं मोठ्या उत्साहाने करते. एवढे करूनही जर सणोत्सवाच्या काळात तिला मासिक पाळी आली तर तिला नाकारले जाते. विधवा, परितक्त्या स्त्रीला तर सण-उत्सवाला डावलले जाते. मग अशावेळी ‘सण-

उत्सव हे ‘स्त्रियांचे कार्य‘ या उदात्त हेतूचे काय होते हे कळत नाही. पुन्हा तिच्या वाटेला उपेक्षा येते. स्त्री अनेकदा हा नकार पचवून पुन्हा उभी राहते. वारंवार या मानसिक द्वंद्वात ती जगते. म्हणूनच या सण-उत्सवाच्या माध्यमातून अंधश्रद्धांना खतपाणी दिले जाते असेच म्हणावे लागेल.

सण आणि उत्सव या दोन वेगळ्या बाबी आहेत. यात वरवर पाहता साम्य वाटत असले तरी यातील मुख्य फरक आहे तो म्हणजे, सण कौटुंबिक पातळीवर साजरा करायचा असतो. मात्र तो करताना स्त्री-पुरुष समानतेचे भानही आवश्यक आहे. उत्सव मात्र सामाजिक पातळीवर साजरा केला जातो. मात्र असे करताना दोन्ही ठिकाणी आर्थिक, शारीरिक, मानसिक तसेच पर्यावरणीय नुकसान होणार नाही, याचा प्रारंभी विचार झाला पाहिजे हे सारे घडत नाही म्हणूनच त्यातून अंधश्रद्धा वाढते.

मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामुख्याने त्याच्या मानसिक गरजपूर्तीसाठी सण-उत्सव महत्त्वाचे मानले जातात. मात्र त्यातून अपेक्षित ते घडून येत नाही. ज्याप्रमाणे कौटुंबिक पातळीवर नुकसान होते, त्यापेक्षा मोठ्या प्रमाणात उत्सवाच्या नावाने सामाजिक पातळीवर नुकसान होताना दिसते. याचा फायदा राजकारणी करून घेताना दिसतात. बेरोजगारी, भ्रष्टाचार , वास्तवाचे भान, पर्यावरण संवर्धन या बाबींपासून उत्सवाच्या नावावर , ढोल - लेझीम च्या तालावर तरूणाईची तात्पुरती गरज भागवून त्यांनाच त्यांच्या भविष्यापासून दूर ठेवले जाते. यातूनच तरुणांच्या क्षमतेचा अपव्यय घडून येतो. संघर्ष, ईर्ष्या, व्यसनाधीनता टोळीयुद्ध, गट-तट , यात तरूणांना उत्सवाच्या नावाखाली अडकविले जाते. क्षणीक शौर्याचे स्वप्न दाखवून आयुष्यभरासाठी भरकटत सोडले जाते.

राष्ट्रीय सणांमधुन राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्राप्रती प्रेम वृद्धिंगत व्हावे तसेच सामाजिक आणि धार्मिक सण- उत्सवातून धर्मनिरपेक्षता, सामाजिक ऐक्य निर्माण व्हावे, ही अपेक्षा! मात्र हा उदात्त हेतू राजकीय अजेंड्यापूरता मर्यादित झाला आहे . सण- उत्सव राजकीय भांडवलशाहीसाठी एक इव्हेंट बनला आहे . खरा धर्म , ज्ञान या विषयी जनतेचे अज्ञान, तरूणांची दिशाभूल, भावनिक छळ यातून स्वार्थी राजकारणी अंधश्रद्धेला आपले साधन मानत आहेत. या साऱ्यांचं भान जाऊन ज्ञान यावे, म्हणूनच विवेकाचा आवाज बुलंद करू या !

■ ■ ■

**शहिद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या स्मृतिदिनी राज्यभरात**
**मॉर्निंग वॉकद्वारे डॉ. नरेंद्र दाभोलकर यांना अभिवादन करण्यात आले.**



# संत सेना महाराज आणि अंधश्रद्धा निर्मूलन



महेश गायकवाड
९४२२० ३९९९०

संत साहित्य ही महाराष्ट्राची संस्कृती आहे. वारकरी संप्रदाय ही महाराष्ट्राची ओळख आहे. संत साहित्य हे आपल्या जगण्याचे, विचारांचे, बोलण्याचे अभिन्न अंग आहे. इतके अभिन्न की, बऱ्याचदा एखादे उदाहरण, एखादा दाखला आपण संत साहित्यातला देतो आहोत, हे देखील आपल्या लक्षात येत नाही. संत साहित्याचा अभ्यास अनेक अंगांनी करता येतो. आशयाच्या अंगाने, भक्तिमार्गाच्या अंगाने, साहित्यशास्त्रीय दृष्टिकोनातून, काव्यसौंदर्याच्या अंगाने, इ. परंतु आज संत साहित्याचा विचार विवेकवादी आणि समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून करणे जास्त आवश्यक आहे. वारकरी संप्रदायाने समाजाला नेहमीच मानवतावादाच्या दिशेने घेऊन जाण्याचे प्रयत्न केलेले आहेत. त्याचा मागोवा घेत राहणे, हीच आजच्या काळाची गरज आहे. येत्या ४ सप्टेंबरला संत सेना महाराजांची पुण्यतिथी आहे. त्यानिमित्त सेना महाराजांच्या जीवनचरित्राचा आणि त्यांच्या अंधश्रद्धा निर्मूलनविषयक विचारांचा आढावा प्रस्तुत लेखात घेतला आहे.

अहमदाबाद-जबलपूर रेल्वे मार्गावरील कटनी रेल्वे जंक्शनपासून इशान्येला अठरा मैलांवर असलेल्या बांधवगड येथे सेनाजींचा जन्म शके १२२३ (इ. स. १३०१) मध्ये झाला. बांधवगड येथे राजा रामसिंगांचे राज्य होते. त्यांच्यानंतर त्यांचे पुत्र राजावीर सिंह गादीवर बसले. सेनाजींचे वडील या राजघराण्याचे परंपरागत नाभिक होते. सेनाजींचे वडील देविदास व आई प्रेमकुंवरबाई हे दोघेही सत्शील, वृत्तीचे होते. वडील देविदास हे उत्तर भारतातील थोर संत रामानंद यांचे शिष्य होते. रामानंद यांचे त्यांच्या घरी येणेजाणे असे. देविदास आपले गुरू रामानंद यांच्याशी तात्त्विक व आध्यात्मिक विषयांवर चर्चा करीत असत. सेनाजी त्या चर्चा ऐकत असत. सेनाजींची बुद्धिमत्ता, ग्रहणक्षमता, चातुर्य पाहून गुरु रामानंद यांनी सेनाजींचा शिष्य म्हणून स्वीकार केला.

वडिलांच्या वृद्धापकाळामुळे त्यांची राजदरबारातील सेवा सेनाजींनी पुढे चालू ठेवली. आपल्या विहित कार्याविषयी अत्यंत निष्ठा, कार्यात तन्मयता व तत्परता यामुळे सेनांवर राजाचे विशेष प्रेम होते. सेनाजी आपले नाभिक कर्म रोज दोन प्रहरापर्यंत करीत असत. त्यानंतर मात्र ते आपल्या व्यवसायाच्या धोकटीला हातही लावीत नसत. त्यानंतर स्नान भोजन करून ते नामस्मरण आणि आध्यात्मिक चिंतन यात उर्वरित सर्व दिवस व्यतित करीत असत. सेनाजींची पत्नी सुंदराबाई या नावाप्रमाणे सुंदर, सालस आणि भक्तीबाबत सेनाजीना साथ देणाऱ्या होत्या.

सेनाजींची भाविक वृत्ती, संतवृत्ती आणि त्यांचा अधिकार ओळखून राजाने सेनाजींचे शिष्यत्व पत्करले. त्या दिवसापासून ते सेना महाराज झाले. त्यांची कीर्ती सर्वत्र पसरली. ते संत पुरुष म्हणून ओळखले जाऊ लागले. मुळात संत हे जातीपातीच्या बंधनांच्या पलीकडे गेलेले असतात. ते सर्व मानवसमूहाचे दीपस्तंभ असतात. 'जाती-पाती पुछे ना कोय, हरि को भजे सो हरि का होय.' या संत कबीराच्या दोह्याप्रमाणे सेनाजी हे कोणत्या एका जातीचे संत नाहीत तर ते वारकरी संप्रदायाचे

आणि पर्यायाने मानवकल्याणाची अभिलाषा बाळगणाऱ्या सर्व मानवांसाठी वंदनीय संत आहेत.

सेनाजी स्वतः हिंदी भाषिक होते. त्यांनी संपूर्ण भारतभर प्रवास केला होता. त्यांनी मराठी, हिंदी, पंजाबी भाषांमधून अभंग रचले आहेत. सेनाजींनी आपल्या अभंगांतून सर्वसामान्य साधकांसाठी नामसंकीर्तन आणि भक्तिमार्ग सांगितला असला, तरी ते स्वतः ज्ञानमार्गाचे उपासक होते. समाजातील अज्ञान दूर करायचे असेल, तर ज्ञानदीप लावण्याशिवाय अन्य पर्याय नाही, याची त्यांना जाण होती. म्हणून आयुष्यभर लोकांच्या बोलीभाषेत, त्यांना समजेल, पेलेल, झेपेल अशा भाषेत त्यांनी उपदेश केला. मराठीत, सकलसंत गाथेत सेना महाराजांचे १४३ अभंग व इतर रचना आढळतात. यात गुरूविषयी आदरभाव प्रकट करणारे अभंग, नाममहात्म्य, विठ्ठल भक्तीपर अभंग; तसेच त्र्यंबकमाहात्म्य, आळंदीमाहात्म्य आणि सासवडमाहात्म्य ही तीन स्थानमाहात्म्ये सांगणारे अभंग; काही संत स्तुतीपर अभंग आहेत. त्यांनी रचलेली वासुदेव गीते आणि गौळणी आहेत. या त्यांच्या रचना अतिशय भावोत्कट आहेत.

काही अभ्यासकांच्या मते, सेनाजींचे मराठी भाषेवरील प्रभुत्व पाहता असे वाटते की, मुळचे मध्य प्रदेशातील असलेले सेना महाराज आपल्या पूर्वायुष्यात पंढरपूर परिसरात राहिले असावेत, वारकरी संप्रदायाच्या संस्कारात वाढले असावेत आणि आयुष्याच्या उत्तरार्धात परत गेले असावेत. आणि त्यानंतर त्यांचा गुरू रामानंदांशी सबंध आला असावा. तर काहींच्या मते सेना महाराज उत्तर भारतीय होते; ते रामानंदांचे शिष्य होते. तीर्थयात्रा करीत पांडुरंग दर्शनासाठी ते महाराष्ट्रात आले आणि नामदेव व इतर संतांसोबत सोबत येथेच रमले, राहिले. असे काही अभ्यासकांचे मत आहे.

आपले अनुभव, आपले चिंतन समाजाच्या भल्यासाठी सांगत राहावे, अशी उर्मी त्यांच्या मनात जागी झाली. जे स्वहित आपणास कळते ते समाजाला सांगणे हेच पुण्याईचे काम आहे असे समजून त्यांनी साध्या सोप्या मराठी भाषेत समाजाला हितोपदेश करण्यास सुरुवात केली. व्यसनाने कित्येक पिढ्यांची होणारी बरबादी सेनाजींना अस्वस्थ करीत होती. यातून समाजाला बाहेर काढण्यासाठी त्यांनी काही रचना केल्या.

नका सेवू अफू, नका सेवू दारू ।  
गांजाचे धुरा नाश होय ।  
या व्यसनाने बुडाले किती ।  
रांडा पोरे मरती ना खावया ।  
शरीराजी भंगमान, गेले धन ।  
पाहती किळवाणी जनामध्ये ।  
सेना म्हणे सांगतो, धरा अंत:करणी ।  
करितो विनवणी तुम्हालागी ।।

अफू, गांजा, दारू यांसारख्या व्यसनाने जीवनाचा नाश होतो. शरीर खचते, बायको-मुले उपाशीपोटी मरतात आणि समाजामध्ये अपमान होतो. हे विदारक सत्य सांगून लोकजागृती करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. सेनाजींच्या मते असत्य हे पाप आहे, सत्य हेच पुण्य आहे. सत्य हेच जनोद्धाराचे साधन आहे. सत्याने केलेले वर्तनच तुम्हाला परमेश्वराप्रत घेऊन जाईल.

कामातुर सांडी सज्जन लक्षण ।  
मदिरा व्यसन बडबडी ।।  
गांजा भांग अफू सेवी दृष्टी क्रूर ।  
शरीर मुर्दाड कळत नाही ।।  
आला विनाशकाल विपरीत बुद्धी ।  
जुगारीचे छंदी नाना कळा ।।  
सेना म्हणे धन घालविती दु:खी ।  
परि हरि मुखी येईचिना ।।

माणसाचे अध:पतन होऊ नये म्हणून सेनाजी हितोपदेश करतात, कामातुर झालेल्या पुरुषाची बुद्धी विपरित तऱ्हेने वागते. दारूमुळे तो बेताल बडबड करतो. गांजा, भांग, अफू या नशेमुळे शरीर संपत जाते. जुगाराचा नाद लागल्याने सगळे

धन जाते, एवढे सारे होऊनही त्याच्या मुखातून हरीचे नाव काही येत नाही. त्याचा विनाशकाळ जवळ आल्यानेच त्याला अशी बुद्धी होते.

वारकरी संप्रदाय हा निवृत्तीपर शिकवण देणारा पंथ नाही, तर तो प्रखर प्रवृत्तीपर संप्रदाय आहे. माणसाने आपले जीवन आदर्शवत कसे व्यतित करावे याचा व्यवहारी उपदेश सर्व संतांनी केला आहे. कर्तव्याप्रति असणाऱ्या परमनिष्ठेने, सदाचरणाने परमेश्वराचे सानिध्य प्राप्त करता येते, इतके साधे सोपे त्यांचे अध्यात्म होते. परमेश्वराची भक्ती करण्यासाठी घरदार, बायको-पोरे सोडून, संसाराचा त्याग करण्याची गरज नाही, तर संसारात राहून, कुटुंबाचे पालनपोषण करीत, तुमचा नित्याचा जो व्यवसाय असेल तो करीतच तुम्ही परमेश्वर प्राप्ती करू शकता. फक्त त्यासाठी आपले कर्म निष्ठेने, प्रामाणिकपणे करा. आपला व्यवसाय म्हणजेच परमेश्वराची पूजा आहे. तीच परमेश्वराची आराधना आहे. संत ज्ञानदेवांपासून संत तुकारामांपर्यंत वारकरी संप्रदायातील जवळपास सर्व संतांनी हाच उपदेश केला आहे. सावतोबांना आपल्या फुललेल्या मळ्यात आपला विठ्ठल दिसला, तसेच बहुजन समाजात जन्मलेल्या गोरा कुंभार, नरहरी सोनार, चोखा मेळा, रैदास चांभार या सर्वांनी 'कामातच आपला राम' पाहिला. सेनाजींनीही आपल्या कर्मात परमेश्वर पाहिला. आपला व्यवसाय हा केवळ उदरभरणाचे साधन नाही, तर ती परमेश्वराची पूजा आहे, ही भावना मनी बाळगून त्यांनी आपले विहित कर्म केलेले दिसते.

आम्ही वारीक वारीक ।
करू हजामत बारीक ।।
विवेक दर्पण आयना दाऊ ।
वैराग्य चिमटा हालऊ ।।
उदक शांती डोई घोळू ।
अहंकाराची शेंडी पिळू ।।
भावार्थाच्या बगला झाडू ।
काम क्रोध नखे काढू ।।
चौवर्णा देऊनी हात ।
सेना राहिला निवांत ।।

नाभिकाच्या व्यवसायाच्या अनुषंगाने आत्मिक विकासाचे सुंदर रूपक सेनाजींनी रचले आहे आणि अहंकाराची शेंडी पिळून, काम-क्रोध याचा त्याग करायला लावून सेनाजींनी जणू विवेकाचाच आरसा प्रत्येकाच्या डोळ्यासमोर धरला आहे, प्रत्येकाच्या मनातील विवेकालाच साद घातली आहे. आणि हे करतानाही त्यांच्यातील समतेची भावना कायम आहे. कारण मी हे सर्व चारही वर्णांसाठी करतो आहे, हेही त्यांनी सांगितले.

अंधश्रद्धेच्या जोखडात अडकलेले समाजमन बाहेर काढण्याचा प्रयत्न जवळपास प्रत्येक वारकरी संताने केला आहे. वारकरी संप्रदायातील संतांनी ईश्वरभक्तीबाबत जो हितोपदेश केलेला आहे. त्यात कर्मकांड आणि अंधश्रद्धा यांना कोठेही स्थान नाही. सेनाजीही याला अपवाद नाहीत. सेनाजींनी ईश्वरप्राप्तीचा मार्ग निखळ भक्ती हाच असल्याचे निःसंदिग्धपणे सांगितले आहे. होम-हवन, यज्ञ-याग, देहदंड याने झाले तर नुकसानच होईल; परंतु ईश्वरप्राप्ती काही व्हायची नाही.

करिता योगयाग ।
न भेटेची पांडुरंग ।।
एका भावावांचोनि काही ।
देव जोडे ऐसा नाही ।।
धुम्रपानादि साधन ।
करितां व्यर्थ होय शीण ।।
करितां साधने शीणली ।
सेना म्हणे वायां गेली ।।

कोरडा जप-तप-यज्ञ-यागादी साधनांच्या द्वारे पांडुरंग भेटणार नाही. त्याला प्राप्त करायचा असेल तर मनात भक्ती आणि शुद्ध भाव असला पाहिजे. विनाकारण देहदंड सोसून भक्तीचे अवडंबर माजवू नका आणि त्यासाठी धुम्रपानादी अघोरी भक्ती करून शरीराचे व्यर्थ नुकसानही करून घेऊ नका,

असा स्पष्ट उपदेश सेनाजींनी केला आहे. जप-तप तीर्थाटन उपासतापास करणाऱ्या अंधश्रद्धाळू उपासकांना सेनाजींनी चांगलेच फटकारले आहे. ते म्हणतात,

कशासाठी करितां खटपट ।
तप तीर्थे व्रते अचाट ।।
न लागे शोधावे गिरिकानन ।
भावें रिघा विठ्ठल शरण ।।

आणि भक्तीचे हेच वास्तव समजल्याने मनापासून भक्ती करणे, मन शुद्ध ठेवणे, शुद्ध आचरण करणे आणि आपले कर्म निष्ठेने करणे हीच ईश्वर पूजा, हे साधे सोपे आणि व्यवहारी अध्यात्म सेनाजींनी सर्वसामान्य जनांना सांगितले आहे.

आज एकविसाव्या शतकात आणि विज्ञानयुगात अंधश्रद्धा आणि कर्मकांडांचा माजलेला बाजार पाहताना मनात विचार येतो की, तेराव्या शतकात समाजाची काय परिस्थिती असेल ? आणि त्याहीपेक्षा या तथाकथित धर्मरक्षकांना जाब विचारणाऱ्या आणि त्यांच्या फसवेगिरीला विरोध करणाऱ्या संतांचे धारिष्ट्य काय असेल ! ज्यावेळी जारण-मारण, भुते-खेते, बळी देणे, शांती घालणे, आणि देवतांचे नवससायास, पूजाअर्चा हाच धर्म समजला जात होता, अशा एका अंधाधुंदीच्या काळात नामदेव-ज्ञानदेव यांच्या पासून प्रेरणा घेऊन; वारकरी संप्रदायाची परंपरा सोबत घेऊन आणि पुरोगामी विचाराच्या गुरु रामानंदांचा उपदेश समोर ठेऊन सेनाजींनी या सर्व अनिष्ट रूढी परंपरांना कट्टर विरोध केला. ते म्हणतात,

घुमती या जागी अंगी दैवत खेळे ।
मरती का मुले वांचवेना ।।
चेटुक मेटुक साधन मंतर ।
दाविती प्रकार वाढुनियां ।।
आंधळे हे जग विसरती केशवा ।
शेंदराचे देवा आळविती ।।
सेना म्हणे हरी जगाचा नायक ।
कर्तव्य सुखदु:ख देई कांही ।।

धर्माच्या नावाखाली आपली आध्यात्मिक दुकाने उघडून त्याच्या नावाखाली व्यभिचार करण्याची प्रवृत्ती आजही समाजात दिसते. आणि या बुवा-बाबांना बळी पडणारी जनता आजही दिसते, तेव्हा

'थाट माट करून लुबाडीत रांडा ।
ऐसिया पाखंडा भुलूं नये ।।'

हा सेनाजींचा रोकडा उपदेश किती व्यवहार्य आहे, हे लक्षात येते.

खरा धर्म वेगळा आणि धर्माचे थोतांड वेगळे. खरा धर्म शुद्ध आचार शिकवतो, अध्यात्माची गोडी लावतो, तर धर्माचे थोतांड करणारा स्वार्थासाठी धर्म वापरीत असतो, हे स्पष्टपणे सेनाजींनी सांगून ठेवले आहे. 'धर्माचे थोतांड' हा शब्दही त्यांचाच आहे.

धर्माचे थोतांड करुनी पोट भरी ।
भार्या मुले मठ मजा करी ।।
पुराण सांगत नागावाणी डोले ।
आविर्भाव फोल करिताती ।।
गळां माळा भस्म नेसे पितांबर ।
साधूचा आचार दाखविती ।।
सेना म्हणे ऐसे दांभिका भजती ।
दोघेही जाती अधोगती ।।

असे धर्माचे थोतांड करणाऱ्यांच्या जे नादी लागतील त्यांची अधोगती ठरलेलीच आहे, किंबहुना 'अंधश्रद्धा हीच अधोगतीची जननी आहे' असा स्पष्ट निर्वाळा सेनाजींनी दिलेला असतानाही आजही आमचे डोळे उघडत नाहीत. समतेच्या आणि समाजप्रबोधनाच्या या चळवळीतील सेना महाराजांचे योगदान महत्त्वाचे तर आहेच पण ते आजच्या काळालाही समयोचित आणि प्रस्तुत आहे. सेनाजी विठ्ठलाचे अनन्यभक्त तर होतेच पण खऱ्या अर्थाने समाजसुधारक, संत, पुरोगामी विचारवंत होते.

# पितृपक्ष पंधरवड्याचे लाभार्थी कोण?



डॉ. नितीन शिंदे
९८६०४ ३८२०८

दि. २१ सप्टेंबर ते ०६ ऑक्टोबर २०२१ अखेर हा पंधरवडा 'पितृ पक्ष' किंवा 'श्राद्ध पक्ष' म्हणून साजरा होत आहे. 'साजरा होतो' असं म्हणणं थोडं धाडसाचं होईल, कारण हा पंधरवडा अशुभ मानला जातो. त्यामुळे श्राद्ध साजरे न होता ते 'पार पडते' असं म्हणणं योग्य होईल. सध्या कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या 'कोविड-१९' या आजाराने संपूर्ण जग त्रस्त आहे. मृत्यू झालेल्यांचे अंत्यसंस्कार करण्यासाठीदेखील नातेवाईक पुढे येत नाहीत. अशा परिस्थितीमध्ये हा विधी कितीजण पार पाडतील, याबद्दलच शंका आहे. एखादी नैसर्गिक आपत्ती संस्कृती, परंपरा आणि कर्मकांडांबद्दल विचार करायला लावते, याची अनेक उदाहरणे आपण मार्च २०२० पासून अनुभवत आहोत. अशुभ मानल्या गेलेल्या या काळात जेईई, नीट आणि विद्यापीठीय परीक्षा होत आहेत, हे उल्लेखनीय आहे.

सर्व मृत पूर्वजांना 'पितृ' किंवा 'पितर' म्हणतात. मृत्यूनंतरही मानवाला अस्तित्व असते आणि त्याला जिवंत व्यक्तींशी संबंध ठेवून त्यांच्या जीवनावर प्रभाव पाडता येतो, या श्रध्देवर पितृपूजेची प्रथा आधारलेली आहे. जगातील सर्व लोकांच्या मते, 'पितर' हे जिवंत माणसासारखेच असतात; फक्त काही अतिमानवी शक्ती त्यांच्याकडे असतात. अन्न आणि पाणी हवे असल्यामुळे ते मानवावर अवलंबून असतात. त्यासाठी ते वंशजांशी संपर्क साधतात. खरं म्हणजे अतिमानवी शक्ती असणाऱ्याला मानवावर अवलंबून राहण्याची तशी अजिबात गरज नाही; पण परंपराच ती, चिकित्सा न केलेली! पितरांच्या सुखासाठी आणि परलोकात त्यांच्या गरजा पूर्ण व्हाव्यात, यासाठी त्यांना काही वस्तू लागतात. त्या त्यांना अर्पण करण्यासाठी वर्षातील काही ठराविक दिवस धर्मव्यवस्थेने राखीव ठेवलेले आहेत. इतर वेळी मनाई आहे! हीच बाब लोकांच्या धर्मभावना रुजवण्यासाठी कारणीभूत ठरली, असं मानलं जातं.

अमावस्या संपली की मराठी महिना सुरू होतो. प्रत्येक महिन्यामध्ये एक अमावस्या आणि एक पौर्णिमा येते. प्रत्येक महिन्याचे दोन पंधरवडे केलेले आहेत त्यांना 'पक्ष' म्हणतात. पौर्णिमेपर्यंतच्या पहिल्या भागास 'शुक्ल पक्ष' आणि पौर्णिमा ते अमावस्येपर्यंतच्या दुसऱ्या भागास 'कृष्ण पक्ष' म्हणतात. शुक्ल पक्ष देवांचा तर कृष्ण पक्ष पितरांचा आहे. 'असं का?' म्हणून प्रश्न विचारायचा नाही; कारण ते ठरवण्याचा अधिकार सर्वस्वी निर्मात्याला. प्रत्येक वर्षातील भाद्रपद महिन्यातील कृष्ण पक्ष हा 'पितृपक्ष' या नावाने ओळखला जातो. दैनंदिन व्यवहारात सर्वमान्य असलेला एक महिना म्हणजे पितरांचा एक दिवस आणि एक रात्र. शुक्लपक्ष म्हणजे पितरांची रात्र आणि कृष्णपक्ष म्हणजे पितरांचा दिवस, असे मानले जाते. हे ठरवणारा माणूसच; फक्त 'विशेष' माणूस! पितरांचा यात काहीच 'रोल' नाही!

आपले मृत झालेले पूर्वज, आई, वडील अथवा इतर नातेवाईक यांच्यासाठी राखीव असलेला हा पंधरवडा. तसेच भाद्रपद महिन्यातील अमावस्या ही 'सर्वपित्री अमावस्या' म्हणून ओळखली जाते. वास्तविक पाहता कृष्णपक्ष आणि अमावस्या ही अशुभ म्हणून गणली जाते. असं

असेल तर, याच काळात आपल्या पूर्वजांसाठी पूजाविधी करायचा म्हणजे अशुभच की, हे कधी आपल्या लक्षात येणार? आपल्या पूर्वजांना अशुभ म्हणून हिणवणारे हे कोण? असा जाब विचारण्याची गरज आहे.

असो, पारशी लोक १० ते २० मार्च या काळात आणि रोमन लोक १३ ते २१ फेब्रुवारी या काळात पितरांसाठीचे विधी करतात. अंधश्रद्धा सर्वदूर आहेत; प्रमाण मात्र कमीअधिक आहे. विशेष बाब म्हणजे उत्तर भारतामध्ये पितृपक्षाचा कालावधी २१ सप्टेंबर ते ६ ऑक्टोबर असाच आहे. परंतु त्यांच्या भारतीय महिन्याचे नाव आहे अश्विन. उत्तर भारतीयांचा पितृपक्ष अश्विन महिन्यातील शुक्लपक्षात येतो. भारतातील एकाच धर्मातील ही दोन विविध रुप.

पितृ म्हणजे पिता. पितृपक्षात आपल्या पूर्वजांचे त्यांच्या मृत्युतिथीवर श्राद्ध करतात. 'माता, पिता यांच्या मृत्यूपश्चात त्यांच्या तृप्तीसाठी श्रद्धापूर्वक केले जाणारे कर्म म्हणजे पितृपक्ष.' जे श्रद्धेने केले जाते ते श्राद्ध. हिंदू धर्मामध्ये माता-पित्यांची सेवा, सर्वात पूजनीय मानली जाते. त्यामुळे पितरांचा उद्धार करणे मुलाला बंधनकारक आहे, मुलीला नाही. पुरुषप्रधान संस्कृती! मुलीला अधिकार नाकारणारी! वंदनीय, पूजनीय? विचार तरी करा ना! पितृपक्ष आणि पिंडदानाचं (अवाजवी) महत्व फारच अधोरेखित करण्यात आलेलं आहे. दि. ०६ ऑक्टोबर २०२१ रोजी सर्वपित्री अमावस्येला या विधीचं विसर्जन केलं जातं. हा मुख्य दिवस. पितृपक्षांतर्गत खालील विधी करणे गरजेचे असते. हे विधी जरा बारकाईने पाहू आणि मग जमलंच तर विचार करू.

- हराळी, मका, फुलं, गंध, सातू आदी वस्तू पुरोहिताच्या पायावर ठेवून पाय धुणे. दक्षिणा आणि शिधा दान देणे. दान नाही असा विधी नाही! धन्य ते धर्मशास्त्र!
- सूर्योदयानंतर नैवेद्य घरावर, नदीकाठी अथवा रिकाम्या ठिकाणी कावळ्यांसाठी ठेवणे. कावळ्यांच्या प्रेमासाठी हे करायचं नसून, कावळ्यांच्या रूपाने आपले पितर तृप्त होतात, असं धर्मशास्त्र सांगतं म्हणून. कुपोषण आणि कोरोनाने निर्माण केलेल्या उपासमारीने अनेकजण आपला जीव गमावत आहेत. अशांच्या काळजीपेक्षा कावळ्याची चिंता वाहणारी ही परंपरा.

लहान मुलांना जर हे सांगितलं, तर काही प्रश्न ते नक्कीच विचारणार. मका, सातू या कधीही न पाहिलेल्या आणि दैनंदिन वापरात नसलेल्याच वस्तू का वापरायच्या? पुरोहिताचेच पाय का धुवायचे? सज्जन, कष्टकरी किंवा बुद्धीवंताचे पाय का चालत नाहीत? दक्षिणा आणि दान ब्राह्मणाला देण्यापेक्षा गरजवंत आणि गरिबाला का द्यायचे नाही? नैवेद्य कावळ्याला टाकण्यापेक्षा भुकेलेल्याला का देऊ नये? आपले पूर्वज फक्त याच दिवसांत जेवतात का? सगळे पितर कावळाच का असतात? सर्वांच्या पूर्वजांचा विचार केला, तर कावळ्यांची संख्या माणसांच्या संख्येपेक्षा जास्त असायला हवी; प्रत्यक्षात तसं नाही, असं का? हे प्रश्न मोठ्यांना का पडत नाहीत, याचंच आश्चर्य वाटतं. निरर्थक प्रथा, परंपरेचे 'पाईक' होण्याची प्रतिज्ञा घेतलेल्यांकडून नवीन विचारांची घुसळण होण्याची शक्यता धूसर आहे. पितृपूजा केल्याचे फायदे आणि न केल्याचे तोटे पाहिले, तर व्यक्तीच्या मनात आदर आणि भीती निर्माण झाल्याशिवाय राहातच नाही.

- देवांकडे मध्यस्थी करत पितर कुटुंबाचे रक्षण करतात; तसेच मित्रांना मदत आणि शत्रूंना शिक्षा करतात.
- त्यांच्या कृपेने संतती, संपत्ती, पाऊस, शेती इत्यादी गोष्टी लाभतात.
- पितृपूजेमुळे कृतज्ञता, आदर, आत्मीयता आणि नीतिमूल्यांचे संवर्धन होते.

- पितरांच्या कृपेशिवाय लक्ष्मी प्राप्त होत नाही.
- भूतकाळाचे स्मरण, वडीलधाऱ्यांच्या शहाणपणाविषयी आदर व्यक्त होतो आणि त्यांचे आशीर्वाद मिळतात.
- पितृपूजा न केल्यामुळे रागावलेले पितर वंशजांना मारतात किंवा आजारी पाडतात.
- श्राद्ध केले नाही तर पितरांना पिशाच्च बनून भटकावे लागते.
- सामुदायिकरीत्या केलेल्या विधींमुळे वंशामध्ये आणि समाजामध्ये ऐक्य साधण्यास मदत होते.
- अशक्यप्राय गोष्टी पितर करू शकत असल्यामुळे संकटप्रसंगी त्यांचा आधार वाटतो.
- पितरांना तृप्त केल्यानंतरच सर्व सुखसुविधा प्राप्त होतात.
- वंशाच्या अखंडतेची भावना, वारसा हक्काने मिळावयाच्या संपत्तीचा विचार, शेजाऱ्यापेक्षा अधिक प्रभावी विधी करण्याची भावनासुध्दा पितृपूजेच्या मागे लपलेल्या असतात.

या सर्व समजूतींमुळे पितरांविषयी प्रेम, जिव्हाळा आणि विश्वास वाटून त्यांची पूजा केली जाते. खरंतर वरील विधाने कोणत्याही व्यक्तीला ऐकवली, तर ती व्यक्ती भावनिक अथवा घाबरली नाही तरंच नवल. आपल्या सुखामध्ये कोणीही आडवा येऊ नये, यासाठी पितरांचे श्राद्ध घालण्याशिवाय पर्याय नसतो. हे सर्व करूनही जर दुःखाचे प्रसंग आलेच, तर आपलं नशिबच खोटं! व्यक्तीच्या आयुष्यात सुखदुःखाचे प्रसंग येणारच, हे त्रिकालाबाधित सत्य आहे. त्याचा संबंध पूर्वजांच्या शांतीशी लावणे इष्ट नव्हे. विज्ञान असं सांगतं की, एकदा माणसाचा मृत्यू झाला की, सर्वकाही संपलं. त्यामुळे आत्म्याची शांती करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. श्राद्धविधी हे भीती, अज्ञान, अंधश्रद्धा आणि पुरोहितांचा स्वार्थ यासाठीच निर्माण केलेल्या आहेत. ज्याकाळात धर्मभावना प्रबळ होत्या त्याकाळात

जिंदा बाप कोई न पूजे, मरे बाद पूजवाया।
मुठ्ठीभर चावल लेके कौवे को बाप बनाया।।

असं दोह्याच्या माध्यमातून सांगणारे संत कबीर, 'या काठावरचं पाणी दुसऱ्या काठावर जात नाही, तर आपल्या पूर्वजांना पृथ्वीवर भरवलेला घास स्वर्गात कसा पोहोचेल?' असा परखड सवाल करणारे संत गाडगेमहाराज आणि

जिवंत असता रोटी ना दे।
मेलियावरि वाजवी वाद्यें।
कावळयासि पिंड, इतरां दक्षणा दे।
म्हणोनि साधे काय त्यानें?।।
श्राद्धासाठी धन उधळावे।
लोकलाजेस्तव मरावे।
ऐसे कासया करावे।
मूर्खपणे?।।

असं ग्रामगीतेद्वारे प्रबोधन करणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि

भुके नाहीं अन्न। मेल्यावरी पिंडदान।।
हे तों चाळवाचाळवी। केलें आपण चि जेवी।।
नैवेद्याचा आळ। वेचे ठाकणीं सकळ।।
तुका म्हणे जड। मज न राखावें दगड।।

असं ठणकावून सांगणारे संत तुकाराम महाराज, या महान संत परंपरेचे आपण वारसदार आहोत, हे विसरून चालणार नाही.

आज मात्र विज्ञानयुगात अशा निरर्थक कर्मकांडांवर बोलायचं धाडस करणाऱ्यांची संख्या अत्यंत नगण्य आहे. वेद, संस्कृती आणि परंपरांचा हवाला देत सर्वसामान्याच्या माथी अशी कर्मकांडं थोपवणाऱ्यांना ठणकावून सांगण्याची गरज आहे की, बहुजनांची डोकी बधीर करून त्यांचा वेळ आणि पैसा लुबाडू नका. 'समाज काय म्हणेल?

**(उर्वरीत मजकुर पृष्ठ क्र. २६)**

# कर्मवीर भाऊराव पाटील यांची पुरोगामी विचारसरणी



सुधीर कुंभार
९४२११२१४१३६

शेकडो वर्षे ज्या झोपडीत ज्ञानाचा दिवा पेटलाच नाही, त्या झोपडीला ज्ञानमंदिर बनविण्याचे स्वप्न पाहणारे आणि त्यासाठी आयुष्य पणाला लावणारे ज्ञान भगीरथ म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील! महात्मा फुले आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या विचार व कार्याचा प्रभाव घेऊन त्यांनी स्वतःचा ज्ञानमार्ग निवडला. ते मुळातच विज्ञानवादी व प्रयोगशील वृत्तीचे होते. मात्र त्यांचे प्रयोग चार भिंतीच्या आतील प्रयोगशाळेत चालत नव्हते, तर ते खुल्या समाजशाळेत चालत होते. पारंपरिक भारतीय समाजात त्यांनी केलेले कार्य वैज्ञानिकांच्या तोडीचे होते, हे आपणास लक्षात घ्यावे लागेल. त्यातून बरेच काही शिकण्यासारखे आहे. कर्मवीरांच्या जीवनदर्शनातून विद्यार्थी, समाज व शिक्षकांना वैज्ञानिक दृष्टिकोन घेता येईल. त्यामुळेच 'वैज्ञानिक विचारसरणीतून सामाजिक अभिसरण' असे ब्रीदवाक्य रयत विज्ञान परिषदेने स्वीकारले आहे. कर्मवीर अण्णांच्या जीवनातील काही उदाहरणांतून आपण त्यांचा विज्ञाननिष्ठ, पुरोगामी, बुद्धिवादी दृष्टिकोन समजून घेऊ.

अण्णांनी प्रारंभी सत्यशोधक समाजाच्या विचारांच्या प्रसारासाठी कोल्हापूर ते नागपूरपर्यंत कार्यक्रम केले. या कार्यक्रमांना शेकडो लोक येत. त्यांना सामान्य माणसांचे हक्क, निर्भय वर्तन, व्यसनमुक्ती याबाबत मार्गदर्शन केले जाई. गाण्याद्वारे, पोवाड्यातून व कलगी तुऱ्यातून ते प्रबोधन करीत असत. सत्यशोधनाचा व प्रबोधनाचा हा प्रवास कर्मवीरांनी संपूर्ण जीवनभर चालविला होता.

आण्णांचा पेहराव साधा असायचा. दोन धोतरे, दोन सदरे, घोंगडे, टोपी इतकीच त्यांची संपत्ती! पायात पादत्राणही नसे. पण वसतिगृहातील सर्व विद्यार्थ्यांना चप्पल घेऊन द्यायला ते विसरत नसत. प्रत्येक हट्टी विद्यार्थ्यालाही कृतीतून काही शिकवून जात. मुलांना शिकायला संधी देणाऱ्या कृती मुद्दामहून करत. आजची ज्ञानरचनावादी अध्यापन व अध्ययन पद्धती खूप वर्षांपूर्वी त्यांनी उपयोगात आणली होती, हे पाहून आश्चर्य वाटल्या वाचून राहात नाही. ही ज्ञानरचनावादी भूमिका आता अभ्यासक्रमातून आपल्याला स्वीकारायची गरज पडते.

निरीक्षण, अनुमान, पडताळणी आणि सिद्धांताप्रत जाणे, हे वैज्ञानिक विचाराचे टप्पे होत. याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे त्यांनी स्वीकारलेली कमवा व शिका सिद्धांतप्रणाली. त्यांनी माधुकरी मागून शिकण्याच्या पद्धतीचे निरीक्षण केले होते. कोणाच्या उपकाराच्या ओझ्याखाली आयुष्यभर राहणे योग्य नव्हे. लाचार असणे योग्य नव्हे. हे जाणवल्यावर त्यावरून काढलेले एकमात्र अनुमान म्हणजे कष्ट करून शिकले पाहिजे. त्याची प्रायोगिक पडताळणी म्हणजे श्रमाला न लाजणारे विद्यार्थी, कष्टाला तयार असणारे जिद्दी विद्यार्थी यांना योग्य संधी देणे. त्यावरून विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारा, स्वतःच्या पायावर उभा करणारा सिद्धांत म्हणजे 'कमवा व शिका योजना'. अनेक खेड्यापाड्यातील कुटुंबांना हा सिद्धांत आधारवड ठरला. त्याकाळात विविध तीस जातीच्या मुलांना वसतिगृहात एकत्र ठेऊन ३०० ते ४४० मुलांना एकदमच शिक्षणाची संधी देण्याचा त्यांचा प्रयोग कमालीचा यशस्वी ठरला, तोही १९४४ या साली.

आण्णांनी त्यानंतर वारंवार या प्रयोगाची पडताळणी घेतली. पण निष्कर्ष सारखेच आले, ते म्हणजे ' कमवा आणि शिका' या योजनेतील कोणताही विद्यार्थी शिक्षणात मागे राहत नाही.

प्रयोगशीलता हा त्यांचा गुण होता. शालेय शिक्षणासोबतच जीवनशिक्षणही मुलांना मिळावे, असे त्यांना वाटत असे. त्यामुळे मुलांमध्ये जिद्द, जिगर निर्माण व्हावी, यासाठी ते झटत असत. त्यासाठी ते बागकाम, शेतीकामाच्या स्पर्धा लावत असत. वसतिगृहातील मुलांना रस्त्यावर, बागेत, शेतात काम करायला लावत. 'हातावर घट्टा न पडता शिक्षण घेऊ नका', हा साधा विचार मुलांमध्ये अण्णा रुजवत. आष्टा, देवापूर, रुकडी या त्यांच्या प्रयोगशाळा होत्या. विद्यार्थ्यांनी वेळ घालवू नये. स्वनिर्मितीचा आनंद घ्यावा. यासाठी भाजी, धान्य, फळे, दुध याचे उत्पादन घेतले जाई. यातून मुलांनी सुंदर बागा फुलवल्या होत्या. तेथेही मुलांचे विविध प्रयोग चालत. शेतातले उत्पादन वाढविण्याचे तंत्र शिकले व शिकविले जात असे. त्यांच्या प्रयोगात चले (व्हेरिएबल) बदलत. वसतिगृहाच्या मुलांचे गट करायचे. त्यांना शेतीचे तुकडे वाटायचे. बियाणांचे प्रकार, खताचे प्रकार, खतांची मात्रा, भांगलणीची पद्धत, मशागतीच्या वेळा, पाण्याचा पुरवठा यात बदल करायचा. नंतर आलेल्या उत्पन्नावर चर्चा करायची. निसर्गातून शिकण्याचा धडा निसर्गातच गिरविला जायचा. त्यातून बरेच शिक्षण आपसूक होत असे.

अशा प्रकारच्या ज्ञानरचनावादी शिक्षण पद्धतीत कृतीला वाव तर असेच, पण प्रत्येकाला प्रयोगाची संधी दिली जाई. त्यातल्या नेमक्या चुका शोधून त्यावर योग्य पर्याय निवडण्याची मुभा गटात काम करणाऱ्यांना दिली जाई. गटात काम करण्याने मिळणारे फायदे, प्रकल्प स्वतः करून बघण्यासाठी प्रयोगाच्या वस्तू जपण्याचे, त्या टिकविण्याचे महत्त्व समजून जात असे. चार म्हैशी, चार बैल सांभाळणे. बैलगाडी, अवजारे, गोठा स्वच्छता करणे. धारा काढणे, ताक करणे, स्वयंपाक करणे, अशी एक ना अनेक कौशल्ये सहज मिळून जात.

दारिद्र्य व अज्ञानाचे दुष्टचक्र भेदण्याचे तंत्र अण्णांनी कृतीने शिकविले. विज्ञानवादी माणूस हा भारदस्त असावा, आनंदी असावा. निरीक्षण करण्याची वृत्ती त्याच्यात असावी, असे अण्णांना वाटे. ध्येयाप्रत जाण्यासाठी सातत्याची गरज त्याच्याकडे असते. ती कर्मवीर आण्णांच्यात होती. भांड्याकुंड्याचे आंघोळीचे वाया जाणारे सांडपाणी डास माशा वाढविते, पण त्याचा वापर वसतिगृहाच्या मुलांच्यासाठी पौष्टिक भाज्या निर्मितीसाठी, गुरांच्या वैरण निर्मितीसाठी करता येतो, हा वैज्ञानिक बाणा मुले लहानपणीच शिकत. घाण संपली, स्वच्छता वाढली, खत मिळाले, दूध मिळाले. जनावरांना वैरण मिळाली. अशा प्रयोगात मिळालेली तथ्ये अण्णा दुसरीकडे वापरत.

त्यांनी सातारच्या तात्कालीन जिल्हाधिकाऱ्याकडून माळरान मिळविले. सुरुंगाच्या साहाय्याने तेथे खड्डे घेतले. वाया जाणारे मैलाखत त्यात टाकून केळीच्या बागेची निर्मिती केली. अनेक शेतकरी हा अनोखा प्रयोग पहायला येत. त्यासारखे प्रयोग त्यांच्या गावात करीत असत. शास्त्रज्ञांच्यात असणारी निर्भीड वृत्ती त्यांच्याकडे दिसून येई. वारंवार नवे प्रयोग करताना विविध ठिकाणी जागा मिळवताना ते अनेक क्लृप्त्या वापरत.

त्यांचा जनसंपर्क दांडगा होता. एकदा वसतिगृह पाहायला आलेल्या महाराजा सयाजीराव गायकवाडांना ठसका लागला. अण्णांनी एका मुलाला शहाळे काढायला लावून त्यातले पाणी महाराजांना द्यायला लावले. एका गावातील सार्वजनिक विहिरीवरचा रहाट सर्वांना खुला नाही, म्हणून मोडून टाकला. सज्जनगडावर जत्रेत सामान्य लोकांना प्रथम प्रसाद मिळावा, यासाठी भांडण काढले. तेथे अगोदर उच्च वर्णीय

लोकांसाठी व नंतर सामान्यांसाठी प्रसाद वाटला जाई. या भेदभावाविरुद्ध त्यांनी आक्षेप नोंदविला. औदुंबर (जि.सांगली) येथेही असेच घडत होते. महाप्रसाद कुणा एकट्याचा नसतो. त्यावर सर्वांचा समान हक्क असतो. एका पंगतीत बसायचे नसेल तर ब्राह्मणांनी नंतर बसावे. अथवा शेतकऱ्यांनाही पहिल्या पंगतीचा हक्क द्यावा. कारण ते अन्नाचे निर्माते आहेत, असे अण्णा म्हणत. हा समानतेचा हक्क मिळवून देण्यासाठी त्याकाळात कर्मवीरांनी यशस्वी लढा  दिला होता. निसर्गतः सर्व समान आहेत, असा संदेश ते देत असत.

वैज्ञानिकांचे विचार सार्वकालिक सत्य असतात. भूतकाळातील अथवा वर्तमानातील अवैज्ञानिक बाबींना त्यात स्थान नसते. अनिष्ट रूढी, अंधश्रद्धा यामुळे समाजातील तळागाळातील लोकांचे नुकसान होते. या विचारावर अण्णा ठाम होते. अशा बाबींचा त्याग केलाच पाहिजे. रूढी व परंपरा या घातक किंवा शोषक असतील तर त्याविरूद्ध बोलले पाहिजे आणि त्याविरुद्ध कृती केली पाहिजे, असा आण्णांचा दृष्टिकोन होता. अण्णा जातिभेद, धर्मभेद मानत नव्हते. यामुळे विविध जातिधर्मातील लोकांमध्ये ते सहज मिसळत. म. फुले, शाहू महाराज, गाडगे महाराज यांच्या कार्याने प्रभावित झाल्याने त्यांच्या वागण्या बोलण्यात जातिधर्माच्या श्रेष्ठ कनिष्ठत्वाचा मागमूसही नसे. कदाचित त्याबाबत बोलून आपला बहुमूल्य वेळ, श्रम ते त्यात वाया घालवू इच्छित नसत. रूढी परंपरावर बोलताना काही सण मुद्दामहून विद्यार्थ्याकरवी साजरे करत, साताऱ्यात बैलपोळ्यादिवशी चिखलाचा मोठा बैल बनवून त्याची गावातून मिरवणूक काढायची व त्यानंतर भाषण द्यायचा रिवाज त्यांनी सुरू केला. त्या भाषणात दरवर्षी वेगवेगळा विषय असायचा. कधी व्यसनाधीनता, तर कधी रूढी परंपरा, कधी शिक्षणाचे महत्त्व, तर कधी आरोग्याविषयी माहिती ते देत असत. विविध ठिकाणी फिरताना आलेले अनुभव कथन यावर त्यांचा भर असे.

कोपार्डे येथे एकदा होळीच्या उत्सवात अण्णांनी मार्गदर्शन केले होते. होळीतील त्या शेण्यांची राख करण्यापेक्षा निदान खत तरी तयार करा, असा संदेश त्यांनी दिला. अनेकदा कार्यक्रमानंतर मुक्त प्रश्नोत्तरे होत असत. अण्णा अनेकांना त्यांच्या समस्यांवर उत्तरे देत. लोक त्याचा स्वीकारही करत. अनुभव, विज्ञान, तंत्रज्ञान याच्यांशी अण्णांच्या उत्तराची सांगड असे. सामान्य नागरिकांना जनतेला त्याचा फायदा होई.

वाया जाणाऱ्या सर्व गोष्टींचा वापर विविध ठिकाणी करण्याचा त्यांचा अट्टाहास असे. अनेक शाळांची सुरुवात, निर्मिती करताना ते सामान्यांकडून मदत घेत. पडीक टाकाऊ जमीन, जुन्या घरांच्या विटा, लाकूड याचाही पुरेपूर वापर ते करत असत. एक गाव एक तळे, वृक्षारोपन, वृक्ष जतन यावरही ते भर देत. विविध गावात व्हॉलंटरी स्कूल व वसतिगृहासाठी फंड योजना आखून त्यात सातत्य राखले जाई. त्याच्या बदल्यात ग्रामस्वच्छता साफसफाई करून देण्याचे काम विद्यार्थी करत. वैज्ञानिक जसा एखाद्या गोष्टीच्या अनेक पर्यायाबद्दल विचार करतो आणि त्यादृष्टीने कृती करतो तसेच विविधता असलेले स्थानिक वापराचे भिन्न भिन्न पर्याय उभे करण्याचे कार्य कर्मवीर आण्णांनी केले.

रयत शिक्षण संस्थेचे ब्रीदवाक्यही अण्णांच्या प्रागतिक जाणीवेतून निर्माण झाले होते. 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद'  अण्णांनी संस्थेसाठी निवडलेले चिन्ह वडाचे झाड होते. त्यातही पर्यावरणवादी दृष्टिकोन दिसून येतो. वडाचे झाड त्यांचे आवडते झाड होते. वडाचे झाड ऐसपैस पसरते. सर्वांना निवारा देते. अनेकांना चारा देते. हजारो पक्ष्यांना, प्राण्यांना, कीटकांना अन्न निवारा देते. त्याचबरोबर याच्या अनेक फांद्या सर्वत्र पसरतात.

**(उर्वरीत मजकुर पृष्ठ क्र. २६)**

# श्रावणसरी



डॉ. प्रदीप पाटकर
patkar.pradeep@gmail.com

श्रावणसरी, उनपावसाचा खेळ, नागपंचमी, जन्माष्टमी, सण, सुट्या, गोडधोड आदी साऱ्या आनंद उत्साहाने भरगच्च असे दिवस आता 'दीन' दर्शिकेवर दिसू लागले आणि बालपण क्षितिजापार गेल्याचे जाणवले. हा सारा वातावरणातला romanticism खरेतर मनातलाच होता,हे आता लक्षात येते. तारखा त्याच, महिना तोच, सण तेच, आनंद कुठे हरवला ?

जाणीवा समृद्ध झाल्या, मनात realism ने शिरकाव केला आणि वास्तव हे विस्तव वाटू लागले. पूर्वी व्यवहारात भावना गुंतून गोंधळ करायच्या, आता भावनांमध्ये व्यवहार पुढे आले. पूर्वी आणि आता हे मी आपल्या आयुष्याला समोर ठेवून बोलतो आहे. पण प्रत्यक्षात पूर्वीही असेच घडत होते, आपल्या जाणिवांचे, आकलनाचे क्षेत्र अगदीच अरुंद होते. ते विस्तारले की मग मानवी मनातील विवेकाची घुसमट लक्षात येत जाते. स्वार्थ-परमार्थ, विवेक-अविवेक यांच्या व्याख्या स्वत:च्या सोईप्रमाणे बदलणे आजही होते आहेच की !! आपल्यापेक्षा अधिक हे कुणाला कळणार? माणसे बदलली नाहीत, अधिक व्यक्त होऊ लागली, आंतरिक/वैयक्तिक संघर्ष सार्वजनिकरीत्या उघड करू लागली, नाते-स्नेहसंबंधांचे फायदेशीर लिलाव करू लागली, समाजकारण व राजकारणात स्वत:च्या मानवतावादाची अवास्तव किंमत वसूल करू लागली...

शस्त्रे जुनी होत जातात, तेव्हा ती टाकून देऊन अथवा ती दुर्बळ समूहाना विकून नवी अधिक संहारक शस्त्रे हाती घ्यावी लागतात. असे करणारी माणसे, व्यवहारचतुर नेते म्हणून जीवनसंघर्षात यशस्वी होतात. त्यातील स्वार्थी नेत्यांसाठी पुढील आयुष्यात श्रावणसरी बरसतात, आकाशी इंद्रधनु उमलते, सण उत्सव जल्लोषाने साजरे होतात.

अनेक कार्यकर्ते स्वत:च्या कर्तृत्वाला विसरून जातात. समाजउभारणीतले त्यांचे स्वत:चे श्रेय ह्या खऱ्याखुऱ्या कर्त्या सुधारकाना स्वत:लाच उमगलेले नसते. उमगले तरी ते मिळवावे असा स्वार्थही त्यांच्या मनात उद्भवत नाही. मात्र 'श्रेय क्लेम करण्याला स्वार्थ समजावे, असे वागणे टाळावे ', हे श्रेय हिसकावू पाहणाऱ्या कुणीतरी त्यांच्या संवेदनशील मनावर बिंबवलेले असते. जगाचे राजकारण समजणाऱ्या या कार्यकर्त्याला जवळपासचे हे सत्ताकारण मात्र समजत नाही. जाणवले, समजावले तरी crisis निर्माण होईपर्यन्त त्याला ते स्वीकारता येत नाही. राजकारणात, समाजसेवेत, धर्मसत्तेत, अगदी विस्तारित एकत्र कुटुंबातही हे घडत असते. जवळजवळ रोज विकत गेलेल्या माध्यमातून तर हे श्रेयाभिलाषी सत्ताकारण सामोरे येत राहते.मात्र ते वाचता व समजता आले पाहिजे...

इतरांच्या उत्कर्षासाठी, स्वत:चे आयुष्य सार्थकी लावणारी काही उत्साही, प्रामाणिक माणसे ढगाळ, काळ्याभोर आकाशात मध्येच कधी दिसणाऱ्या इंद्रधनुष्याने सुखावतात. सर्वांच्या आयुष्यात, आकाशात असे इंद्रधनुष्य कायमस्वरूपी निर्माण करता येईल, या शक्यतेने भारावून जाऊन अशा कामात स्वत:ला झोकून देतात. ही स्वप्ने मानवी जीवनात साकारण्यासाठी स्वत: असीम त्यागमय जीवन जगतात. स्वत:च इतरांच्या आयुष्यात ते एक दिशादर्शक आणि

कायमस्वरूपी इंद्रधनुष्य बनून जातात. शहीद डॉक्टर नरेंद्र दाभोलकर हे आपल्याला जवळून पाहायला मिळालेले असे एक उदाहरण आहे. त्यांच्या स्मृतीस आपणा साऱ्यांतर्फे मनापासून आदरांजली.

स्वभान बाजूला ठेवून, व्यक्ती-पुस्तक-शब्द प्रामाण्यात अडकून न पडलेले, प्रामाणिक मानवतावादी कार्यकर्ते वाट्याला आलेली कामे करण्यात मग्न असतात. त्यातच त्यांना निखळ आनंद असतो. ही माणसे स्वत:च श्रावणसरी बनून,जीवनरस शिंपीत स्वत:सोबत समाज, देश, विश्व प्रगत, समृद्ध करीत असतात.

श्रावण असा विविध अंगांनी सामोरा येत असे, येत असतो. तो आला की आषाढाचे घनघोर बरसणे त्याच्या नाजुक सरींनी विसरायला लावत असे....यावर्षी मात्र महासाथीने आणि प्रलयंकारी पुराने आपल्या भावा-बहिणींची घरेदारे उद्ध्वस्त झाली..

आपला साधा सरळ कार्यकर्ता आज आपले घर, आपल्या आकाशातले इंद्रधनुष्य व अंगणातला श्रावण बाजूला ठेवून, मानसमित्र बनून, गुंतलेला आहे आषाढातील पूरग्रस्त बेघरांचे आयुष्य सावरण्यात. त्याला त्रिवार अभिवादन !!

■ ■ ■

---

**पृष्ठ क्र. २१ च्या लेखाचा उर्वरीत भाग....**

**(पितृपक्ष पंधरवड्याचे लाभार्थी कोण?)**

आम्हाला पटतं हो; पण घरच्यांचं काय करायचं?' असल्या सबबी सांगण्याची आज बिलकुल गरज नाही. महात्मा फुले, सावित्रीबाई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज यांनी चुकीच्या प्रथा-परंपराबद्दल आवाज उठवला नसता, तर आज आपली अवस्था काय झाली असती, याचा क्षणभर तरी विचार करा ना! विचार करण्याचं स्वातंत्र्य गहाण न टाकता, जे चुकीचं आहे त्याला चूक म्हणण्याची आज नितांत गरज आहे.

■ ■ ■

---

**पृष्ठ क्र. २४ च्या लेखाचा उर्वरीत भाग....**

**(कर्मवीर भाऊराव पाटील यांची पुरोगामी विचारसरणी)**

या फांद्यांना पुढे पारंब्या फुटतात. त्या जमिनीकडे धावतात. जमिनीतून या पारंब्या मूळ झाडाला वाढविण्यासाठी क्षार पाणी पोहचवितात. वटवृक्षाला बहर आणतात. वृक्षाला मोठेपण आणण्यास मदत करतात. त्याचीच एखादी फांदी छाटून दुसरीकडे लावली तरी त्याचा वेगाने वृक्ष होतो. एखाद्याला दुष्काळात जगायचे असेल तर वडाच्या झाडाचे उदाहरण देतात. जुन्या घरांच्या भिंतीवर गड किल्ल्यावर वडाचे जोमाने वाढलेले झाड पाहिल्यावर या झाडाचा चिवटपणा लक्षात येतो. रयत संस्थेचा विस्तार याच धारणेने मोठा होईल हे स्वप्न या महान हस्तीने पाहिले होते. ते सत्यात उतरत आहे. ज्ञाननिर्मिती व ज्ञानरचना या दोन्ही बाबी विद्यार्थ्यांत रुजविण्याचा प्रयत्न कर्मवीरांनी त्यांच्या आयुष्यात केला म्हणूनच विठ्ठल वाघ म्हणतात,

" रयते मधुनी नव्या युगाचा  
माणूस आता घडतो आहे.  
वटवृक्षाच्या विशालतेचा  
मोह नभाला पडतो आहे"

आपण कर्मवीरांचा हा प्रागतिक दृष्टिकोन बहुजन समाजाच्या हितासाठी अंगीकृत केला पाहिजे. श्रम व ज्ञान यांना समान महत्त्व देणारा नवा माणूस घडविला पाहिजे. हेच खरे कर्मवीरांना केलेले अभिवादन!

■ ■ ■

# वैज्ञानिक दृष्टिकोन आणि चमत्कार



संदेश बालगुडे
९८९२९ ८९२७०

२१सप्टेंबर १९९५, या महिन्यात २६ वर्षे होतील या दिवसाला. त्यावेळी कळत्या वयातील कोणाला आजही विचारले तरी; त्या दिवसाच्या आठवणी जाग्या होतात. काय झालं होतं या दिवशी? तर 'गणपती बाप्पा दुध प्यायले होते. केवळ गणपती बाप्पाच नव्हे तर त्यांच्या परिवारातील उंदिरमामा, नंदी इ.इ. सुद्धा!'आणि त्यावेळी मोबाईलच नव्हते. त्यामुळे फेसबुक, व्हाटस ॲपचा प्रश्नच नव्हता; तरीही ही बातमी वणव्यासारखी पसरली. या वृत्ताविषयी केलेली चिकित्सा आणि प्रसंग याबद्दल डॉ नरेंद्र दाभोलकर यांनी लिहिलेले आहेच. त्यातील पुनरावृत्ती टाळून, असे होणे शक्य आहे का? किंवा काय काय घडले असेल? याचा अंदाज येतो. काही मूर्तींनी कोरड्या पृष्ठभागामुळे काही वेळ दूध शोषलेही असेल पण, सातत्याने हा प्रकार घडणे शक्य नव्हता. तसेच लोकमानसही या प्रसंगाची चिकित्सा करु द्यायला तयार नव्हते. परंतु या गोष्टीतील फोलपणा लक्षात आल्यानंतर तसे प्रकार घडलेच नाहीत का? तर तसे नाही. त्यानंतर माहिमच्या खाडीचे पाणी गोड झाले. (मिठी नदीच्या स्वच्छतेमुळे, पण भरतीने ते लगेचच खारटही झाले!) येशूच्या क्रूसाच्या खिळ्यातून रक्त आले. (खिळ्याच्या जागी एक पाण्याचा लालसर ओघळ!) असे फुटकळ आणि तेवढ्यापुरती प्रसिद्धी मिळालेले प्रकार घडले. म्हणजे लोकांचा चमत्कारावरचा विश्वास उडाला किंवा लोक चिकित्सक पद्धतीने विचार करु लागले, असा अर्थ घ्यायचा का? तर जून २०२१मध्ये पुन्हा धुमाकुळ घातला तो, 'मॅग्नेट मॅन'ने! टिव्ही वाहिन्यांनी ही बातमीही प्रसिद्धी देऊन चालवली. आणि लोकांनीही तेवढ्याच वेगाने फॉरवर्ड केली.मात्र यावेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनीही यावर तसेच व्हिडिओ बनवून त्यातील फोलपणा सर्वांच्याच लक्षात आणून दिला.

कोरोना लसीकरणामुळे शरीरात चुंबकत्व निर्माण झाल्याचा तो दावा होता, पण चुंबकाकडे स्टील, प्लास्टिक कसे आकर्षित होतात? हा साधा प्रश्न कोणाला पडला नाही. बरं, लसीकरणाआधी त्यांनी अंगाला भांडी चिटकवून पाहिली होती का? हेही कोणी विचारले नाही. म्हणजे 'गणपती दूध पिण्याला' जेवढे लोक भुलले तेवढेच आजही या प्रकाराला भुलतात, असेच मानावे लागेल. असं का होतं?

१९९२-९३ च्या सुमारास डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या लेखांनी, त्यांच्या बातम्यांनी प्रभावित होऊन, मी तेव्हापासून त्यांच्या विचारांचा समर्थक झालो होतो. घरी अगदी पुरोगामी नसलं तरी, कर्मठ वातावरणही नव्हतं. म्हणजे, माझ्या प्रश्न विचारण्याला मनाई नव्हती. त्यामुळे डॉ.दाभोलकरांचे विचार ऐकून, तसे काही मांडू लागलो तर, वडील-चुलते किंवा त्यांच्या वयाच्या अनेकांचे मत होते की, 'डॉ. दाभोलकर खूप घाई करत आहेत. लोकांना असे प्रश्नाच्या समोर उभे करण्यापेक्षा लोकांना वेळ द्यायला हवा. जसजसा विज्ञानाचा वापर वाढेल, तसतसे लोक जुन्या,चुकीच्या गोष्टी सोडून देतील, आपोआप होईल ते.' खरंच असं झालं असतं तर, किती बरं झालं असतं! पण आजूबाजूला पाहिलं तर काय दिसून येतं? विज्ञानातून अज्ञानाचा अंध:कार दूर होणं,तर दूरच राहिलं. पण विज्ञानाचा वापर अशा

अज्ञानमूलक गोष्टी पसरवण्यासाठी केला जातोय! डॉ. नरेंद्र दाभोलकर म्हणायचे, "आपण विज्ञानाची सृष्टी घेतली, पण विज्ञानाची दृष्टी घेतली नाही. विज्ञानाची करणी घेतली,पण विचारसरणी घेतली नाही." ही गोष्ट आजही बदललेली नाही.

मुळात वैज्ञानिक दृष्टिकोन ही गोष्टही आपल्या समाजात नीटपणे रूजलेली नाही. अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरणे म्हणजे वापरकर्त्याला वैज्ञानिक दृष्टिकोन समजलेला असेलच असेही नाही. कितीतरी डॉक्टरांच्या दवाखान्यात देवादिकांचे, एवढेच काय, बाबा-बुवांचे फोटो असतात, हॉस्पिटलच्या आवारात मंदिरे असतात. डॉक्टरांचे धार्मिक स्वातंत्र्य मान्य करुनही, दवाखान्यात या गोष्टींची आवश्यकता का असावी? देशाचे संरक्षणमंत्रीच राफेल सारख्या अत्याधुनिक विमानाचं पूजन चाकांखाली लिंबू ठेवून करत असतील तिथे इतर जनांची काय कथा? सध्याचं युग संगणकाचं, माहिती-तंत्रज्ञानाचं युग मानलं जात असताना आपला देश याबाबतीत मागासलेलाच का रहावा? याची कारणं शोधायला गेलो तर, बरीचशी कारणं आपल्या पारंपारिक विचारसरणीत दडलेली आहेत असे आढळून येते. प्रश्न पडण्याला आपल्याकडे महत्वच दिलं जात नाही. स्वतःला प्रश्न पडत नाहीत, आणि इतरांनाही ते पडलेले चालत नाहीत. लहान मुलांच्या प्रश्नांना, कुतुहलाला उत्तर न देता, 'गप्प बैस' म्हणून निरुत्तर केले जाते.

विज्ञानाचा विषय निघाला की, आपल्या प्रगत इतिहासाचे पौराणिक दाखले दिले जातात. पण तेव्हाचा काळ ते आताचा काळ, आपल्याकडे वैज्ञानिक प्रगतीचा दुष्काळ का पडला असावा? घरात दिसून येणारे किंवा आपल्याला आठवतील असे शंभर किंवा निदान दहा तरी वैज्ञानिक शोध आठवा आणि त्या शोधांचे जनक किती भारतीय आहेत, याचा शोध घ्या. त्यावरून आपली विज्ञानातील प्रगती दिसून येते. वैज्ञानिक दृष्टिकोनाची डॉ.नरेंद्र दाभोलकरांनी प्रसिद्धीस आणलेली एका शब्दातील व्याख्या म्हणजे, 'कार्यकारणभाव'.

घडणाऱ्या कोणत्याही घटनेमागे कारण असते. ते आपल्याला विज्ञानामुळे समजून येते. आणि आज जरी त्याचे कारण माहीत नसले तरी ते वैज्ञानिक दृष्टिकोनामुळेच भविष्यात कळू शकते. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा सोपा अर्थ असा की, जेवढा पुरावा उपलब्ध असेल तेवढाच विश्वास ठेवणे.

वैज्ञानिक दृष्टिकोन हीच बाब एका शास्त्रीय पद्धतीने अमलात आणतो. या पद्धतीचे घटक आहेत निरीक्षण, तर्क, अनुमान, प्रचिती आणि प्रयोग. कोणताही चमत्कार,आपण या पद्धतीने तपासला तरी त्यातील सत्य बाहेर येईल. चमत्कार म्हणजे अविश्वसनीय किंवा सहजासहजी न घडणारी गोष्ट, असे जरी मानले तरी त्याचे निरीक्षण करुन त्यावरुन काही तर्क आणि अनुमान आपण काढू शकतो. सहसा या पातळीवरच अनेक चमत्कार उघडे पडतात.

विज्ञानाची जी पद्धती आहे, ती सगळीकडे सारखीच आणि त्या पद्धतीनेच अनेक शोधही लागलेले आहेत. वैज्ञानिक दृष्टिकोन नेहमीच नम्र असतो. मी सांगितलेला शब्द हा अंतिम, असा दावा विज्ञान करत नाही. "मला सर्व काही समजले आहे, विश्वाचे कोडे उलगडले आहे. सर्व ज्ञान प्राप्त झाले आहे, आता माझ्या आदेशाचे पालन करा " असे धर्म मात्र सांगतो. न्यूटन हा महान शास्त्रज्ञ होताच; परंतु त्याचा अपुरेपणा आइनस्टाईन मांडू शकतो. त्यामध्ये न्यूटनचा अधिक्षेप नसतो. त्या दोघांच्याही मर्यादा तिसऱ्यानेच सिद्ध केल्या तरीही त्यांचा अपमान होत नाही. उलट विज्ञान एक पाऊल पुढे गेलेलं असतं. वैज्ञानिक दृष्टिकोन ही विचार व कृती करण्याची पद्धती आहे. तर्कशुद्ध विचार करणे हे माणूस असण्याचे प्रमुख लक्षण आहे. अतार्किक विचार व त्यासारखेच वर्तन हा माणसाने स्वतःच्या बुद्धीचा केलेला पराभव ठरेल. जगण्यातील सगळ्याच गोष्टी आपण वैज्ञानिक दृष्टिकोनाने पाहत

असतो,पण काही वेळेस मात्र हा दृष्टिकोन गुंडाळून ठेवला जातो. आपल्याला कुठे प्रवासाला जायचं असेल तर, त्यासाठी कसं जायचं? रस्ता कसा? तिथे पोचल्यावर अनोळखी ठिकाण असेल तर पुढची व्यवस्था कशी? राहण्याच्या सोयीसाठी आपण इंटरनेटवरुन माहिती मिळवतो, प्रत्यक्षात गेलेल्या आपल्या जवळच्यांना विचारतो. आणि मग आपण निर्णय घेतो. पण तीच गोष्ट तथाकथित चमत्काराबाबत आपण करतो का? असे का झाले असेल? त्यामागची कारणं काय असतील? आणि प्रत्यक्ष पाहिल्यावर काय दिसले? त्यातून कायकाय निष्कर्ष काढता येतील? पण असे चमत्काराबाबत होत नाही.शिवाय ते चमत्कार धार्मिकतेशी निगडित असतील तर, त्याविरुद्ध शंका विचारल्यास स्वतःचे श्रध्दाळू मन स्वतःलाच अपराधी ठरवते.

यात हितसंबंध गुंतलेले असल्यास लगेच अशा गोष्टींना धार्मिकतेचा, लोकभावना दुखावल्याचा कांगावा केला जातो. त्याला विवेकाने सामोरे जायला हवे. इथे एक गोष्ट ही सुद्धा लक्षात घ्यायला हवी की, प्रत्येकाला धार्मिक उपासनेचे स्वातंत्र्य आहे. तसेच संविधानाने, नागरिकांना जी मूलभूत कर्तव्ये सांगितलेली आहेत, त्यातले महत्वाचे कर्तव्य म्हणजे,"It is a duty of every Indian citizen, to promote scientific temperament." म्हणजे "वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विचार, प्रसार आणि अंगिकार करणे, हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य आहे". तसेच १९८७ मध्ये आलेल्या शैक्षणिक धोरणात मूल्यशिक्षणाच्या गाभाघटकामध्ये याचा समावेश केला गेलेला आहे.

वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव हाच चमत्काराच्या प्रभावास कारणीभूत ठरतो. माणसं चमत्कारावर विश्वास ठेवतातच कशी? आपल्या सर्वच धर्मांतील पुराणकथा या चमत्कारांनी ओतप्रोत भरलेल्या आहेत. सामाजिक परिस्थिती अशी आहे की, कष्ट, मेहनत, चिकाटी व प्रामाणिकपणे प्रयत्न केले तरी प्रत्येक वेळेस यशस्वी होऊच असे नाही. त्यासाठी असणारी कारणं, ही मानवनिर्मित व्यवस्थेशी निगडित असतात. त्याच्या मुळाशी जाऊन भीडणे प्रत्येकालाच शक्य असते असे नाही. पण हे समजून घेण्याऐवजी, बाबा-बुवा किंवा इष्टदेवतेच्या कृपाप्रसादाने काही घडलं तर, ते किती फायद्याचे ठरेल? माणसाचा कर्तृत्वावरचा विश्वास उडाला की, तो चमत्काराचा आधार शोधायला लागतो. त्यावेळी, प्रत्येकवेळी त्याचा चमत्कारावर विश्वास असतोच असे नाही तर, बघूया, काही होतंय का असं करुन. सगळेच इलाज झाले, आता हेही करुन पाहूया. काय नुकसान आहे आपले यात? बराचशा लोकांचा असा कल असतो. कित्येक गोष्टी "असेल काहीतरी" म्हणून केल्या जातात, काहीतरी म्हणजे काय? हे मात्र शोधले जात नाही. उलट अशा गोष्टींना चढवलेला धार्मिक मुलामा एवढा घट्ट असतो की, हे 'काहीतरी' शोधण्याचा दुसऱ्या कोणी प्रयत्न केला तरी भावना दुखावल्या जातात. या चमत्कारामागची एक गंमत माहीत आहे का? म्हणजे बाबा-बुवांनी केलेल्या फुटकळ हातचलाखीवर विश्वास ठेवून लोक त्यांच्यापुढे बुद्धिसहित नतमस्तक होतात. पण त्याच बुवांच्यापेक्षा कितीतरी प्रभावीपणे जादूचे प्रयोग करणाऱ्या जादूगाराला आपण केवळ मनोरंजनाच्या नजरेतून पाहतो. चमत्कार नावाची गोष्टच मुळात अस्तित्वात नसते. अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचे पितामह डॉ.अब्राहम कोवूर म्हणतात त्याप्रमाणे,"चमत्कार करणारे बदमाश असतात, चमत्कारावर विश्वास ठेवणारे मूर्ख असतात, तर चमत्काराला आव्हान न देणारे भ्याड असतात." या वक्तव्यातच चमत्कारामागील फोलपणा ठळकपणे लक्षात यावा.

**(उर्वरीत मजकुर पृष्ठ क्र. ३३)**

# वेध खगोलीय आविष्कारांचा



शंकर शेलार
९६५७८ ८७५३२

विज्ञानप्रेमी मित्रहो, गेले एक-दीड वर्ष कोविड महामारीमुळे आपण सर्वजण बंदिस्त आहोत. कोणतेही सार्वजनिक उपक्रम होऊ शकले नाहीत. पण आकाश निरीक्षणासारखा मनाला विरंगुळा देणारा आणि विचारांची क्षितिजे वैश्विक बनवणारा छंद, आपण व्यक्तिगत पातळीवर जोपासू शकतो. थोड्या मार्गदर्शनाची आवश्यकता भासेल, ती महाराष्ट्र अंनिसकडून पूर्ण करण्याचा आपला प्रयत्न जरूर राहील. पावसाळा ओसरु लागला की,सप्टेंबर महिन्यापासून खगोल निरीक्षणाचा हंगाम सुरू होतो. आपणही या महिन्यातील महत्त्वाच्या खगोलीय घटनांची माहिती घेऊन, आकाश निरीक्षणाचा आनंद लुटुया.

**१३ सप्टेंबर रोजी बुध ग्रह परम इनांतरवर :**

या महिन्यात खगोलप्रेमींना सायंकाळी सूर्यास्तानंतर पश्चिम क्षितिजावर कन्या राशीत काही काळ बुध ग्रहाचे दर्शन घडणार आहे. १ ऑगस्ट रोजी बुध ग्रह 'बहिर्युती' मध्ये म्हणजे सूर्याच्या पाठीमागे होता. आता तो सूर्याच्या पूर्वेला सरकला आहे. त्यामुळे सूर्यास्तानंतर पश्चिम क्षितिजावर तो सध्या दिसतो आहे. पृथ्वीवरून पाहता १३ सप्टेंबर रोजी तो सूर्यापासून जास्तीत जास्त पूर्वेकडे सरकलेला असेल. तेव्हाचे त्याचे परम इनांतर २६.८ अंश असेल. आणि तो पश्चिम क्षितिजावर ९ अंश उंचीवर (Altitude) दिसेल. त्यावेळी त्याची दृश्यप्रत (Apparent Magnitude) 0.१ असल्याने तो बऱ्यापैकी ठळक दिसेल.

**इनांतर (Elongation) :**

‘ इनांतर‘ म्हणजे अंतरग्रहाने सूर्य प्रदक्षिणेवेळी पृथ्वी आणि सूर्य यांच्याशी केलेल्या कोनाचे माप होय. सूर्यमालेतील बुध व शुक्र हे दोन ग्रह पृथ्वीच्या आतील कक्षांतून सूर्याभोवती फिरतात म्हणून आपण त्यांना ‘ अंतरग्रह‘ (Inner Planets) म्हणतो. तर मंगळ, गुरु, शनी, युरेनस व नेपच्यून या पृथ्वीच्या बाहेरील कक्षांमधून फिरणाऱ्या ग्रहांस बाह्यग्रह (Outer Planets) म्हणून संबोधतात.


जेव्हा एखादा अंतरग्रह सूर्य प्रदक्षिणेवेळी पृथ्वी आणि सूर्य यांच्या बरोबर मध्ये येतो, तेव्हा सूर्य-पृथ्वीशी त्याने केलेला कोन शून्य झालेला असतो. अंतरग्रहाच्या या स्थितीला त्याची ' अंतर्युती ' (Inferior Conjunction) झाली असे म्हणतात. तर जेव्हा अंतरग्रह सूर्याच्या मागे पृथ्वीच्या विरुद्ध दिशेला, सरळ रेषेत येतो तेव्हा त्याची 'बहिर्युती' (Superior Conjunction) झाली असे म्हणतात. बहिर्युतीच्या वेळीसुद्धा त्याने सूर्य - पृथ्वीशी केलेला कोन (इनांतर) शून्य असतो. अंतर्युती व बहिर्युतीवेळी सूर्य सान्निध्यामुळे अंतरग्रह आपणांस दिसु शकत नाहीत.

अंतर्युतीनंतर ग्रह सूर्याच्या पश्चिमेकडे सरकू लागतो आणि सूर्य -पृथ्वीशी त्याने केलेला कोन वाढू लागतो. या वेळी ग्रह सूर्योदयापूर्वी काही काळ, पूर्वक्षितिजावर दिसु लागतो. दररोज हळूहळू तो क्षितिजावर उंच उंच चढू लागतो. जेव्हा सूर्याच्या पश्चिमेला तो जास्तीत जास्त अंतरावर पोहोचतो त्यावेळी त्याने पृथ्वी -सूर्याशी केलेल्या कोनास ‘परम इनांतर‘ (Great Elongation) म्हणतात. आणि तो ग्रह पश्चिमेकडील परम इनांतरावर आहे असे म्हणतात. या स्थितीत तो पूर्वक्षितिजावर जास्तीत जास्त उंचीवर चढलेला दिसतो. नंतर तो हळूहळू क्षितिजावर खाली उतरू लागतो. आणि सूर्याच्या पलीकडे (बहिर्युती) जातो. या काळात सूर्य

सान्निध्यामुळे तो काही दिवस दिसू शकत नाही.

बहिर्युतीनंतर अंतरग्रह सूर्याच्या पूर्वेकडे सरकू लागतो. यावेळी  तो सूर्यास्तानंतर पश्चिम क्षितिजावर दिसू लागतो.  हळूहळू  क्षितिजावर उंच उंच चढू लागतो. जास्तीत जास्त पूर्वेकडे सरकला की तो परम इनांतरावर असतो. या  स्थितीला ग्रहाचे पूर्वेकडील 'परम इनांतर' (E astern Great Elongation) म्हणतात. यानंतर ग्रह क्षितिजावर उतरु लागतो आणि अंतर्युतीत जातो.  बुध २८ अंश, तर शुक्र ४७ अंशांपर्यंत इनांतर गाठू शकतात. त्यानुसार ते क्षितिजावर कमी- अधिक उंच चढलेले दिसतात.

चंद्रकोरी प्रमाणे अंतरग्रहांच्या कला दिसतात. अंतर्युतीपूर्वी व नंतर काही आठवडे हे ग्रह पृथ्वीच्या जवळ आल्यामुळे त्यांचे तेज व आकार वाढलेले दिसतात. या काळात दुर्बिणीतून शुक्राची कोर अप्रतिम दिसते.  १३ सप्टेंबरला सायंकाळी बुध ग्रह पश्चिम क्षितिजावर ९ अंश उंचीवर दिसेल. क्षितिज सान्निध्य, धुळीचा पट्टा आणि पावसाळी ढगांमुळे बुध दर्शन होणे थोडे कठीण वाटते. एरवी बुध हा दर्शनदुर्लभ समजतात मात्र परम इनांतरावर



असताना त्याची दिसण्याची शक्यता वाढते.

## नेपच्यूनची प्रतियुति  (Opposition of Neptune) :


या महिन्यातील दुसरा खगोलीय आविष्कार १४ सप्टेंबरला घडत आहे. नेपच्यून या आपल्या सूर्यमालेतील आठव्या नंबरच्या ग्रहाची 'प्रतियुति' घडत आहे. खगोल निरीक्षकांना नेपच्यूनचे निरीक्षण करण्यासाठी ही उत्तम संधी आहे. कारण प्रतियूति काळात बाह्यग्रह रात्रभर आकाशात दिसत राहतात. पण नेपच्यून आपल्यापासून खूपच दूर आहे. सूर्य - पृथ्वी अंतराच्या ३० पट म्हणजे सुमारे ४.५ अब्ज कि. मि. दूर असल्याने तो उघड्या डोळ्यांनी दिसूच शकत नाही. त्याची तेजस्विता ८ व्या प्रतीची असल्याने त्याला पाहण्यासाठी मोठ्या दुर्बिणीची आवश्यकता असते. प्रतियूतीच्या काळात तो पृथ्वीच्या जवळ ४.३ अब्ज कि. मि. अंतरावर आलेला असतो. एरवी ४.७ अब्ज कि. मि.  पर्यंत तो दूर जात असतो.

### प्रतियुति (Opposition) :

सूर्यमालेतील पृथ्वीच्या बाहेरील कक्षांमधून फिरणाऱ्या ग्रहांना आपण बाह्यग्रह म्हणून ओळखतो. नेपच्यूनची गणना त्यांमध्ये होते. जेव्हा एखादा बाह्यग्रह सूर्य प्रदक्षिणेवेळी पृथ्वीपासून दूर सूर्याच्या पलीकडे जातो आणि पृथ्वी-सूर्य-बाह्यग्रह असे एका सरळ रेषेत येतात, तेव्हा त्यांची 'युती' (Conjunction) झाली असे म्हणतात. अशावेळी सूर्य सान्निध्यामुळे तो ग्रह काही दिवस दिसत नाही. मात्र जेव्हा बाह्यग्रह आणि पृथ्वी सूर्याच्या एकाच बाजूला सरळ रेषेत येतात आणि सूर्य -पृथ्वी-बाह्यग्रह अशी स्थिती घडते तेंव्हा त्या ग्रहाची ' प्रतियुति ' झाली असे म्हणतात. यावेळी बाह्यग्रह आणि पृथ्वीमधील अंतर  कमीत कमी झालेले असते. त्यामुळे बाह्यग्रह नेहमीपेक्षा आकाराने मोठा व तेजस्वी दिसत असतो. प्रतियुतीच्या काळात बाह्यग्रह सूर्यास्तावेळी पूर्व क्षितिजावर दाखल झालेला असतो. आणि पहाटे पश्चिमेकडे मावळतो. त्यामुळे तो रात्रभर आकाशात दिसत राहतो. नेपच्यून सध्या कुंभ राशीत असून,  मध्यरात्री तो आकाशात मध्यमंडलावर आलेला असेल. त्यामुळेच त्याचे रात्रभर निरीक्षण करणे शक्य होणार आहे.

नेपच्यून हा सूर्यमालेतील शेवटचा ग्रह.

जोहान गॅले या खगोल निरीक्षकाने २३ सप्टेंबर १८४६ ला याचा शोध लावला. हा आकाराने पृथ्वीच्या चौपट असून १७ पट वजनदार आहे. त्याला सूर्य प्रदक्षिणा घालण्यासाठी १६५ वर्षे लागतात. स्वतःभोवती मात्र फक्त १६ तासांत फिरतो. तो प्रामुख्याने हायड्रोजन व हेलियम वायूंचा बनलेला आहे. त्याच्या भोवती दाट वातावरण असून, त्यामध्ये मिथेन, अमोनिया, पाण्याची वाफ इत्यादींचा समावेश आहे. त्यामुळेच नेपच्यूनला निळा रंग प्राप्त झाला आहे. त्याच्या भोवती सुंदर निळ्या रंगाची कडी असून १४ उपग्रह देखील आहेत. व्हायेजर यानांनी नेपच्यूनसंबंधी भरपूर माहिती आपणांस पुरविली




आहे. त्याचा शोध लागल्यापासून त्याची एकच सूर्य प्रदक्षिणा झाली आहे. अशा दूरवरच्या ग्रहांचे निरीक्षण करण्यासाठी प्रतियुति ही सुवर्णसंधी ठरते.

**विषुव दिन (September Equinox ) :**

या महिन्यातील अत्यंत महत्त्वाची खगोलीय घटना म्हणजे "विषुव दिन". या वर्षी गुरुवार दिनांक २३ सप्टेंबर रोजी विषुव दिन आहे. या दिवसाला शरद संपात दिन (September Equinox) असेही म्हणतात. या दिवशी सूर्य आकाशात बरोबर विषुववृत्तावर दिसतो म्हणून या दिवसाला विषुव दिन असे म्हणतात. या दिवसाची वैशिष्ट्ये म्हणजे, दिवस व रात्र समान कालावधीचे १२-१२ तासांचे असतात. येथे सूर्य बरोबर पूर्वेला Due east उगवताना व बरोबर पश्चिमेला Due west मावळताना दिसतो. सूर्यकिरणे पृथ्वीच्या दोन्ही ध्रुवांवर पोहोचतात त्यामुळे यादिवशी संपूर्ण पृथ्वी सूर्यप्रकाशात उजळून निघते. येथून पुढे सूर्य दक्षिण गोलार्धात प्रवेश करतो. आणि उत्तर गोलार्धात शरद ऋतूस प्रारंभ होतो.

आपल्या पृथ्वीचा अक्ष तिच्या सूर्याभोवतीच्या भ्रमण कक्षेच्या प्रतलाशी लंबरुप नसून २३.५ अंशांनी कललेला आहे. त्यामुळे सूर्याचा भासमान भ्रमण मार्ग आयनिक वृत्त (Ecliptic) आणि पृथ्वीचे विषुववृत्त (Equator) यांच्यामध्ये २३.५ अंशाचा कोन तयार होतो. ही दोन वृत्ते एकमेकांस १८० अंशावरील समोरासमोरील दोन बिंदूत छेदतात. या बिंदुंना संपातबिंदू म्हणतात. ज्या बिंदूत सूर्य आल्यावर उत्तर गोलार्धात प्रवेश करतो त्या बिंदूला 'वसंत संपातबिंदू' म्हणतात (Vernal Equinox) . येथे सूर्य २०/२१ मार्च रोजी असतो म्हणून यास 'March Equinox' देखील म्हणतात. तसेच ज्या बिंदूत आल्यावर सूर्य दक्षिण गोलार्धात प्रवेश करतो,त्यास 'शरद संपातबिंदू' म्हणतात (Autumnal Equinox ) . येथे सूर्य २२/२३ सप्टेंबर रोजी असतो म्हणून यास 'September Equinox' असेही म्हटले जाते.


या संपात बिंदुंवर असताना वर्षातील फक्त दोन दिवस सूर्य विषुववृत्तावर असतो त्या दिवसांना "विषुव दिन" म्हणून ओळखतात. बाकीचे सहा-सहा महिने सूर्य उत्तर व दक्षिण गोलार्धात असतो. यालाच आपण सूर्याचे 'उत्तरायण-दक्षिणायन' असे म्हणतो.

शरद संपात बिंदूत आल्यावर सूर्य दक्षिण गोलार्धात प्रवेश करतो. त्यामुळे उत्तर गोलार्धात दिनमान कमी तर रात्र मोठी होत जाते आणि तिकडे शरद ऋतु चालू होतो. दक्षिण गोलार्धात या उलट परिस्थिती असते. तिकडे दिवस मोठा व रात्र लहान होऊ लागते. परिणामी दक्षिण गोलार्धात उन्हाळा सुरू होतो. २१ डिसेंबर नंतर सूर्य उत्तरेकडे सरकू लागतो. २१ मार्चला तो पुन्हा विषुववृत्तावर वसंत संपातबिंदूवर येतो आणि उत्तर गोलार्धात प्रवेश करतो. तेंव्हा उत्तर गोलार्धात वसंत ऋतूस प्रारंभ होतो.

अशा प्रकारे पृथ्वीचा अक्ष कललेला असल्यामुळे, आपण ऋतुचक्र अनुभवतो. त्यासाठी पृथ्वीचे विषुव दिन (Equinox), आयन दिन

(Solstice), तसेच सुर्याचे उत्तरायण-दक्षिणायन या भू-खगोलीय घटना जीवसृष्टीच्या संवर्धनासाठी अत्यंत महत्वाच्या आहेत.

■ ■ ■




**पृष्ठ क्र. २९ च्या लेखाचा उर्वरीत भाग....**
**(वैज्ञानिक दृष्टिकोन आणि चमत्कार)**

चमत्कारावर कोणताही प्रश्न न विचारता विश्वास ठेवणारे बुवाबाजीच्या मार्गाकडे वळत असतात. आपला माणूस आहे म्हणून, बुद्धी वापरायचंच नाकारत असतात. बुद्धीचा वापर हा मानवी प्रगतीचा इतिहास आहे.

चमत्काराला आव्हान देताना, पडणारे 'क'-कारी प्रश्न विचारले, तरी बरेचसे चमत्कार उलगडू शकतात, जसे की, का? कसे? कुठे? कधी? कोण? आणि तरीही काही चमत्कार असतीलच तर; त्याचा उलगडा हा वैज्ञानिक दृष्टिकोनातून होऊ शकतो, हे लक्षात घ्यायला हवे. चमत्कारामुळे मानवी मेंदूला येणारी काजळी वैज्ञानिक दृष्टिकोनामुळे, विज्ञानामुळे दूर होऊ शकते.

२१ सप्टेंबर हा दिवस चमत्कार सत्यशोधन दिन म्हणून साजरा केला जातो. गणपती दूध प्यायल्याची ' घटना' आपल्याला भूषणावह नक्कीच नव्हती. अशा 'घटना' टाळण्याचा व त्यांपासून लोकांना दूर ठेवणारा वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याचा संकल्प आपण यानिमित्ताने करायला हवा. घडणाऱ्या कोणत्याही घटनेमागे, कोणतेतरी कारण असतेच, चमत्कार नसतोच, हे पक्के ध्यानात ठेवायला हवे!

■ ■ ■

# स्वातंत्र्यासाठी 'वैज्ञानिक दृष्टिकोन' आणि वैज्ञानिक दृष्टिकोनासाठी 'स्वातंत्र्य'



अविनाश पाटील
राज्य कार्याध्यक्ष, महा. अंनिस

अंधश्रद्धा निर्मूलन करण्यासाठी व समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी प्रश्न विचारण्याचे, चिकित्सा करण्याचे तपासण्याचे 'स्वातंत्र्य' अत्यावश्यक आहे. त्यासाठी सुरक्षित व अनुकूल सभोवताल गरजेचा असतो. असा अनुकूल, प्रोत्साहक, सुरक्षित अवकाश मानव समाजात ज्या कालखंडात आणि ज्या समूहांमध्ये उपलब्ध झाला त्या मानव समूहांनी आपापले जीवन अधिक समृद्ध, सुखी, संपन्न आणि आनंददायी करण्यासाठी भरीव योगदान दिल्याचा इतिहास आहे. त्यामुळेच जगाच्या 'मानव विकास' प्रक्रियेतील 'स्वातंत्र्य' संकल्पनेचे महत्त्व मानवाच्या आजपर्यंतच्या झालेल्या वर्धिष्णू वाटचालीत अधोरेखित झाले आहे. त्यासाठी वर्तमान व भविष्यातील सर्वांगीण मानवी विकास वाटचालीस स्वातंत्र्याची आवश्यकता आपण लक्षात घेतली पाहिजे. त्याच्या अत्यावश्यकतेसह ' स्वातंत्र्य संकल्पना' स्पष्टतेची, त्याच्याशी संबंधित व अवलंबित असलेल्या मावन विकास प्रक्रियेतील मूल्य धारणांची (उदाहरणार्थ - लोकशाही, प्रजासत्ताक, समाजवाद, धर्मनिरपेक्षकता, भौतिक विकास व पर्यावरण संवर्धन आदी) आपण ओळख ठेवणे आवश्यक वाटते. त्या सर्व वैश्विक मूल्य धारणांचे स्वातंत्र्याशी असलेले अविभाज्यपण जोडलेपण आपण समजून घेणे महत्त्वपूर्ण ठरते.

महा अंनिसच्या वतीने भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्ष प्रारंभापासून ते समारोपर्यंत १५ ऑगस्ट २०२२ दरम्यान 'वैज्ञानिक दृष्टिकोनासाठी स्वातंत्र्याचा उद्घोष' केला जाणार आहे. त्यासाठी आपण संघटनेतील व समसंवादींच्या अभ्यासकांच्या सहकार्याने पहिल्या टप्प्यात २१ ऑगस्ट ते २१ सप्टेंबर (चमत्कार सत्सशोधन दिन) दरम्यान संपूर्ण राज्यातील ३६ जिल्ह्यातून किमान ७५ प्रबोधन, व्याख्यानांचे ऑनलाइन आयोजन केले जाणार असल्याचा संकल्प केला आहे. तसेच राज्याच्या, देशाच्या व जगाच्या सर्वांगीण मानवी विकासामध्ये धोरण म्हणून वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अंगीकार आणि व्यक्तिगत, सार्वजनिक पातळीवरील व्यवहार विकसित करण्याची चर्चा उपस्थित करण्याचा प्रयत्न चालविला जाणार आहे. म्हणजेच स्वातंत्र्याचा वैज्ञानिक दृष्टिकोन या परस्परावलंबी विचार, संकल्पना संवादाची घुसळण घडवून आणण्याचा आपल्याला प्रयत्न करावयाचा आहे. अर्थातच त्यासाठी आपल्याला केवळ देव- धर्माच्या व संस्कृतीच्या नावाने केल्या जाणार्या शोषण, फसवणूक, दिशाभूल यांच्या चौकटीत फक्त वैज्ञानिक दृष्टिकोनाची चर्चा उपस्थित करून चालणार नाही. तर मानवी जीवनाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक विविध क्षेत्रांशी त्याच्या अंगाशी वैज्ञानिक दृष्टिकोनाचे महत्त्व व आवश्यकता नोंदवावी लागेल, त्याची चर्चा घडवून आणावी लागणार आहे. त्यासोबतच वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अंगीकार आणि सार्वजनिक जीवनातील व्यवहारासाठी कार्यरत असणार्या संघटना, संस्था प्रतिनिधींच्या सहभागाने राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिसंवाद घडवून आणीत आहोत. त्यातून वैज्ञानिकदृष्ट्या मानवी जीवनाच्या विविधांगीक्षेत्रातून कार्यरत समविचारांची ओळख व त्यांच्या कार्यानुभवाचा निष्कर्ष समजून घ्यायला मदत होणार आहे. पुढील वर्षभराच्या कालावधीत आपला प्रयत्न राहील तो मानवी जीवनापुढील आव्हानात्मक ठरलेल्या विविध समस्यांच्या निराकरणासाठी आवश्यक वैज्ञानिक विचार पद्धती, दृष्टिकोनाची चर्चा उपस्थित करण्याचा, त्यानिमित्ताने स्थानिक वैश्विक मुद्द्यांच्या गुंतागुंती व त्यातील मानवी हितसंबंधाच्या

अडसरांना किमान समजून घेण्याचा प्रयास आपल्याला करायचा आहे जेणेकरून प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी आधी अपेक्षित माहिती, ज्ञान, दृष्टिकोन, विश्लेषण व नंतर उपाययोजना याबाबतच्या धोरणांची चर्चा घडवून आणता येईल.

**'स्वातंत्र्य' संकल्पनेचे महत्त्व, आवश्यकता अधोरेखित करणार स्वातंत्र्य संकोची भोवतालचा 'विवेक'**

महाराष्ट्र, भारत आणि जगातील माणसांना जगण्याच्या स्वातंत्र्यावरील आक्रमणाला सतत सामोरे जावे लागत आले आहे. भूतकाळात आणि वर्तमानात स्वातंत्र्याचा संकोच प्रचलित व्यवस्थी हितसंबंधींकडून जसा झाला आहे तसा भविष्यातही केला जाणार नाही याची खात्री बाळगता येत नाही. त्याचे कालानुरूप विविध प्रतीके, प्रतिमा, यंत्रणा आणि व्यवस्था उभारण्याचे प्रयत्न सातत्याने सुरूच असतात. त्यामुळे अशा वास्तविकतेला स्वीकारतानाच त्याला बदलण्यासाठी, त्याला भिडण्याची आणि व्यापक जनहिताच्या लोकाधारीत व्यवस्थेत परावर्तित करण्याची सुरवात प्रश्न विचारण्यापासूनच करावी लागते. मृत्यूच्या भयग्रस्तेचे दमन झुगारून निर्भयता देणार्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचा, विवेकाचा पुरस्कार व्यक्तीपासून समूहांपर्यंत संघटितपणे करायला कटिबद्ध होणे हाच त्याच्या निराकरणाचा विधायक व कृतिशील मार्ग आहे. त्यामुळे आजच्या धर्मांध, मूलतत्त्ववादी, हिंसक तालिबानी असोत वा त्यांच्या पाऊलवर पाऊल टाकून मार्गक्रमण करणारे, तथाकथित सनातनी असोत हे मानवजातीच्या सौहार्दपूर्ण सुरक्षित, स्वातंत्र्यशिलपणे सन्मानाने जगण्याच्या मुळावर येणार्या प्रवृत्ती आहेत. त्यांच्यापासून स्वातंत्र्याचा संकोच आणि त्यांना हव्या असणार्याच मूल्य विचारांचे पुरस्कार करण्याला भाग पाडणारी दडपशाही ही एकाचवेळी 'वैज्ञानिक दृष्टिकोना'ला अभिप्रेत असणार्या प्रश्न विचारण्याचे तपासण्याचे, चिकित्सा करण्याचे, पर्यायी- समांतर - विरोधी मत मांडण्याचे व त्याप्रमाणे जगण्याचे स्वातंत्र्य नाकारणारी आहे. म्हणून आपल्या मानवतावादी काल सुसंगत, समन्वयवादी, खुल्या विचार व्यवहारांच्या जन्माला येऊ देण्यापासून त्याला नैसर्गिकरीत्या वाढू देण्यापर्यंत, विस्तारू देण्यासाठी फलदायी ठरणारी विवेकी विचारसरणी अंगीकारण्याची, पुरस्कृत करण्याची जास्त निकड आज जाणवते आहे. अशा स्वातंत्र्याच पुरस्कार करू या.

**वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अंगीकार करू या आणि विवेकाचा आवाज बुलंद करू या !**

लढेंग, जितेंगे !

■ ■ ■

**स्मृतिदिनाच्या पूर्वसंध्येला डॉ. नरेंद्र दाभोलकरांना महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पूल येथे सुमारे २०० कार्यकर्त्यांनी एकत्र येत अनोख्या पद्धतीने अभिवादन केले.**





यावेळी महाराष्ट्र अंनिसचे कार्याध्यक्ष अविनाश पाटील, उपाध्यक्ष महादेवराव भुईभार, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे, प्रधान सचिव माधव बावगे, संजय बनसोडे, नंदकिशोर तळाशीलकर, सरचिटणीस विनायक सावळे, सुरेखा भापकर, बबन कानकिरड, डॉ. गोराणे, परेश शहा, योगेश कुदळे, विशाल विमल, अजय भालकर, वनिता फाळके, संदीप कांबळे, विनोद खरटमोल आणि विविध संस्था संघटनांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# अल्लाची अदृश्य दिव्यशक्ती, बिना अग्नी कागदा जाळती



मच्छिंद्रनाथ मुंडे
९९६९४ ७३७०२

गजाभाऊ आज फारच घाईत होते. गेला महिनाभर पत्नी द्रोपदा सांगत होती की, मुलं वेळेवर काही खात पीत नाहीत. त्यामुळे ती अशक्त होत चालली आहेत, जरा लक्ष द्या. द्रोपदा त्यांना अज्या पर्वतावरील बंगाली बाबाकडे घेऊन जा म्हणाली, म्हणून ते लगबगीने  अज्या पर्वताकडे निघाले होते. लॉकडाऊनमुळे गेले वर्ष-दीड वर्षे मुलं जरा जास्तच अभ्यास करू लागली आहेत, असे दिसुन येत होतं. सगळा अभ्यास ऑनलाइन असल्यामुळे त्यांच्या हातात मोबाईल देऊन अभ्यास करणं, हे जरा प्रमाणापेक्षा जास्तच होत होतं. त्यामुळेच त्यांचे जेवणाकडे दुर्लक्ष होत होतं. फक्त मोबाईलचे वेड! आईला वाटले की, यांना एकदा बंगाली बाबा समशेर खान यांना दाखवून आणावे. ईडा-पिडा असेल तर ती दूर होईल.  म्हणूनच गजाभाऊंनी डोंगराचा रस्ता चालण्यास सुरुवात केली होती. काही क्षणातच ते बंगाली बाबाकडे पोहोचले.

बाबांचा दरबार शुक्रवारी भरायचा. नेहमीप्रमाणे दरबारात प्रचंड गर्दी होती. काही वेळेनंतर गजाभाऊंचा नंबर येताच समशेर खानच्या सेवकांनी आत जाण्याची परवानगी दिली. बाबांनी समस्या ऐकून घेतली व लगेच एका क्षणात एका भांड्यामध्ये कपिला गायीचे तूप घेतलं. गजाभाऊंना सांगितले की, 'या मुलांना कोरोना टिक टॉक या व्हायरसची बाधा झाली आहे.  जसं कोरोना व्हायरसची बिमारी आपल्याला होते, तशीच ही कोरोना टिक टॉकची बिमारी तरुण मुला- मुलींना जडते आणि मग मुलं मोबाईलच्या आहारी जातात. काही जण अभ्यास करतात, तर काही जण वेगळ्याच जगात  मश्गुल राहतात. काही जण गेम खेळत बसतात व रात्र-रात्र झोपत नाहीत. त्यामुळेच त्यांचे खाण्यापिण्यावर लक्ष राहत नाही. त्यामूळे ही टिक टॉकची बिमारी अदृश्य शक्तीने जाळायला हवी, तरच त्यांची यातून सुटका होईल. परंतु यासाठी किमान तीन हजार रुपये तरी खर्च येईल. आपली तयारी असेल तर मी लगेच काम सुरू करेन व कोरोना टिक टॉक व्हायरसला जाळून टाकेन. हा विधी केल्याने तुमच्या दोन्ही मुलांची त्यातून सुटका होईल.  उद्यापासून ते अभ्यासाबरोबरच खाण्यापिण्यावर लक्ष देतील.'  हे ऐकताच गजाभाऊंनी विधी करण्याची तयारी दर्शवली. बाबांना सांगीतलं की, 'एकदाचं काय असेल ते उरकून घ्या!' त्यानतंर बाबांनी एका छोट्या परातीत कपिला गाईचं तूप घेतलं आणि तूपाची चव घेऊन दाखवली. त्यानंतर ते तूप पेटत्या मेणबत्तीने पेटवलं आणि  त्यांच्या दोन्ही मुलांना एका छोट्या कागदावर स्वत:चे नांव लिहायला सांगितले व तो कागद  हातात घेऊन परातीतील अदृश्य अग्नीवर स्वत: कोरोना टिक टॉक गो! कोरोना टिक टॉक गो !! कोरोना टिक टॉक गो!!! असे तीनदा म्हणायला सांगितले. असे म्हटल्यावर लगेच  कागद  अदृश्य शक्तीत जळून जाईल आणि बघता बघता व्हायरस देखील जळून जाईल, असे बाबा म्हणाला. त्यानंतर दोघा  मुलांनी कागद समोरच्या कपिला गायीच्या तुपाच्या परातीवर धरले. काही क्षणानंतर अग्नि दिसत नसताना देखील कागद  पेटले आणि बघता बघता करोना व्हायरस मरून गेला. हे पाहून गजाभाऊ फारच खूष झाले. खिशातून तीन हजार रुपये काढले आणि बाबांच्या पायाशी ठेवून त्यांचे

**(उर्वरीत मजकुर पृष्ठ क्र. ३८)**

# मी असा घडलो....



बाबा हलकुडे
८६६८२ ५१३१९

मी पानगाव  जि. लातूर येथील राहणारा असलो, तरी माझे प्राथमिक शिक्षण व बालपण मावशीकडे झाले. मावशी अतिशय कर्मठ पण प्रेमळ होती. आंघोळ केल्यावर देवपूजा होईपर्यंत ब्राम्हण जरी शिवला तरी परत अंघोळ करणारी! यात तिला आपण चुकतोय, असे कधीच वाटले नाही. तिच्याकडे राहत असल्याने साहजिकच पूजापाठ करणे, विविध पोथी-पुराण वाचणे, उपवास करणे आदी संस्कार माझ्यावर झाले होते. लहान असताना जेव्हा पोथी वाचत असे तेव्हा पोथीमध्ये लिहिलेल्या चमत्काराबद्दल मनात जिज्ञासा निर्माण व्हायची. केवळ तथास्तु म्हटल्यावर मुलगा होण्याऐवजी मुलगी कशी काय होवू शकते?  असा प्रश्न पडायचा. आठवीत असताना केवळ अंगठ्यावर मी महादेवाची पिंड फिरवायचो. या कारनाम्यामुळे काही दिवसातच माझे गावात नाव झाले. चोरी कोणी केली? अमुक एखादं काम होईल का? सुखाचे दिवस येतील का? मूल होईल का? मटक्याचा कोणता आकडा येईल? वगैरे प्रश्न घेऊन लोक माझ्याकडे यायचे आणि मी त्यांना जमेल तसे उत्तर द्यायचो. पण कोणाकडूनही पैसे घेत नव्हतो. मला लहानपणापासूनच स्पृश्य-अस्पृश्यता, जातीभेद मान्य नव्हता. मावशी मला ओल्या कपड्याने पूजेचे पाणी आणायला पाठवायची तेव्हा मी मुद्दाम दुसऱ्याला स्पर्श करून घरी जायचो. काहीही होत नाही तर उगाच का सोवळे पाळायचे? असा बालमनाला प्रश्न पडायचा.

लातूर जिल्ह्यात अंनिसच्या कामासाठी माधव बावगे सुपरिचित होते. मी जिल्हाभर शिक्षक समितीचे  काम करत होतो. सदस्य वाढवण्याची जबाबदारी मला समितीने दिली होती. भेटी घेताना अंनिसचे संभाजी गुळवे आणि गणेश सावळकर यांची भेट झाली. मी त्यांना शिक्षक समितीचे सभासद केले तर त्यांनी मला वार्तापत्राचा वर्गणीदार केले. विशेषांकामध्ये 'सोनेरी बालाजी व प्रजापिता ब्रम्हकुमारी' असे लेख आले होते. मला लेखकाची काळजी वाटली, कारण देव आणि ब्रम्हकुमारी आता त्यांचे काय करतील कुणास ठाऊक?  खऱ्या अर्थाने माझी विवेकी विचार करण्याची सुरुवात येथूनच झाली. संत कबीर, संत गाडगे बाबा, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांची पुस्तके वाचनात आली. त्यांनतर वाचनालयात जाऊन पुरोगामी साहित्य वाचायला घरी घेऊन जात असे. त्यावेळी मला मा. जिल्हाधिकारी कृष्णा लव्हेकर यांच्या हस्ते 'आदर्श वाचक' म्हणून पुरस्कारदेखील मिळाला. डोक्याची मशागत चांगलीच सुरु होती. अशातच एके दिवशी शाखेच्या बैठकीला गेलो असता बावगे सरांची ओळख झाली. तेथे माझे स्वागत खूप छान केले गेले. त्याच वेळेस मी ठरवले की, आपण पुढे आयुष्यभर अंनिसचं काम करत राहायचं. संघटनेची बैठक पाक्षिक असली, तरी मी दररोज तीन तास न चुकता बावगे सरांजवळ जाऊन बसायचो.  कार्यक्रमाला आणि भानामती केस सोडवायला मला बरोबर घेऊन जाण्याचा हट्ट करायचो. मला ते अंनिसच्या कार्यक्रमाला तर न्यायचेच पण खाजगी कार्यक्रमालासुद्धा सोबत घेऊन जायचे. त्या कार्यक्रमात खूप सन्मान मिळायचा. कार्यक्रमाच्यावेळी ते कसे बोलतात?

संपर्क कसा ठेवतात? प्रश्नांशी कसे भिडतात? हे मी पाहत असे. त्यांनतर एका महिन्यातच त्यांनी चाळीस कार्यकर्ते ट्रॅव्हल्सने घेऊन मुंबईला आणण्याची जबादारी माझ्यावर टाकली होती.

अंनिसमध्ये सक्रिय झाल्यानंतर मी कर्मकांड विरहित आयुष्य जगत असताना वडिलांनी घर सोडून जाण्यास सांगितले. मी वडिलांना सांगितले 'एक वेळ घर सोडेन पण आता कोणतेच कर्मकांड करणार नाही.' तेव्हा आई-वडिलांनी मला सांगितले की, 'आम्ही तुला विरोध करणार नाही, परंतु आम्हीही बदलणार' . मी अंनिसमध्ये आल्यावर दोनशे पन्नास चमत्काराचे कार्यक्रम आणि जवळपास तीनशे भूत, भानामती, करणी, चेटूक अशा केसेस काही साथींना सोबत घेऊन सोडवल्या आहेत. दोनशे पन्नास आंतरजातीय सत्यशोधकी विवाहाची जबाबदारी पार पाडलेली आहे. एवढंच नाही तर मी स्वतः माझ्या मुलीचे आंतरजातीय लग्न लावले आहे. विज्ञानबोध वाहिनीचा जिल्हा समन्वयक असताना पंचेचाळीस दिवस लातूर जि. प. ने मला ऑन ड्यूटी जाण्याची परवानगी दिली होती. संघटनेच्या अनेक परिषदा, उपक्रमात मी सहभागी होतो.

अंनिसमुळे मी अनेक पुरस्काराने पुरस्कृत झालो, याचा मला अभिमान वाटतो. भूत,भानामती, करणी, मूठ मारणे, कौटुंबिक प्रश्न सोडवण्यामध्ये रामकुमार रायवाडीकर, उत्तरेश्वर बिराजदार, जिल्हा प्रधान सचिव सुधीर भोसले, अनिता भोसले, महिला विभाग राज्य सहकार्यवाह रुक्साना मुल्ला, शहर कार्याध्यक्ष प्रा. डॉ. दशरथ भिसे, शहर प्रधान सचिव प्रा. हनुमंत मुंडे, रणजित आचार्य यांच्यासोबत माझाही खारीचा वाटा आहे.

महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीचा कार्यकर्ता होणे म्हणजे जीवनाला विवेकी वळण देणारी घटना होय, असे मी मानतो. समितीचं काम करणं म्हणजे एका अर्थाने ' अंधाराकडून प्रकाशाकडे नेणारा जीवनमार्ग होय.'

■ ■ ■

---

**पृष्ठ क्र. ३६ च्या लेखाचा उर्वरीत भाग....**

चरण स्पर्श करून पुन्हा परतीच्या मार्गाला निघाले.

**रहस्यभेद:**

खरं म्हणजे या प्रयोगामध्ये बाबांनी परातीत तूपाच्या नावाने सॅनिटायझर घेतलेले होते. ते पेटत्या मेणबत्तीने पेटवले तेव्हा ते पेटले व अदृश्य फिक्कट निळ्या रंगाच्या ज्योतीने जळत राहीले. त्यामुळे मुलांनी अदृश्य ज्योतीवर धरलेले कागद पेटले. पण ज्योत दिसत नसल्यामुळे अदृश्य शक्तीनेच कोरोना टिक टॉक व्हायरस जाळण्यात आला, असा भास निर्माण झाला. खरं म्हणजे अशा प्रकारे विधी करून सुद्धा मुलांच्या वागण्यामध्ये काहीच फरक पडला नाही. याचा अनुभव आणि प्रचिती लवकरच गजाभाऊंना आली.

**टीप:**

सॅनिटायझर हा ज्वालाग्राही पदार्थ आहे. त्यामुळे सदर प्रयोग अनुभवी व्यक्तीच्या मार्गदर्शनाखालीच करावा. कोरोना टिक टॉक नावाचा कुठलाही व्हायरस नाही.

■ ■ ■

# 'अंधश्रद्धांच्या मुळांना आग लावणारे विधायक चिंतन'



यशवंत मनोहर

लेखक संदीप सारंग यांचे ' अंधश्रद्धा निर्मूलन प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम' हे पुस्तक सर्वच अंधश्रद्धांची सडेतोड चर्चा करणारे मराठीमधले पहिलेच पुस्तक आहे. या विषयासंबंधी अत्यंत निर्णायक चर्चा करणारे हे बिनतोड पुस्तक आहे. अंधश्रद्धांचे गवत मुळापासून उपटून काढणारे आणि जाळून टाकणारे हे झुंजार पुस्तक आहे. अर्थात हे पुस्तक अंधश्रद्धांची राख तर करतेच पण ते इथेच थांबत नाही तर या राखेच्या जागी कोणती नवी बुद्धिवादी आणि करुणामयी जीवनरूपे यावीत, या संदर्भातही स्पष्ट मांडणी करते.

संदीप सारंग यांनी या पुस्तकाला दिलेले नाव अत्यंत बोलके आहे. अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ चालविणाऱ्या कार्यकर्त्यांच्या आणि नेत्यांच्याही कार्यपद्धतीत तसेच विचार करण्याच्या पद्धतीत गोंधळ आहे. या दोन्ही पातळ्यांवरील गोंधळासंबंधित संदीप सारंग यांनी या पुस्तकात धगधगते प्रश्नचिन्हे उभे केले आहेत. या प्रश्नचिन्हांकडे पाठ फिरवून होणारे अंधश्रद्धा निर्मूलनासंबंधीचे कार्य आणि चिंतन केवळ निरर्थकच ठरणार नाही तर ते दिशाभूलही करणारे ठरेल. अंधश्रद्धा निर्मूलनासमोर उभ्या ठाकलेल्या या गोंधळलेल्या परिस्थितीत कोणती कार्यदिशा आणि वैचारिक दिशा प्रमाण मानायला हवी? याही संदर्भातले स्पष्ट प्रतिपादन लेखकाने केलेले आहे. म्हणजे सध्या अर्ध वा स्वल्पविरामापाशी थांबलेली अंधश्रद्धा निर्मूलनाची ही चळवळ संपूर्ण भारतीय समाजाला अंधश्रद्धा मुक्त पूर्णविरामापर्यंत कशी पोचवू शकेल? या संदर्भातले सडेतोड प्रतिपादन या पुस्तकात संदीप सारंग यांनी मांडले आहे.

आपल्या विषयाची मांडणी त्यांनी तीन पातळ्यांवरून केलेली आहे. पहिली पातळी सर्वसामान्य माणसांच्या आणि बाल मनस्क राजकारण यांच्या जीवनातील अंधश्रद्धांच्या गरजेचे आहे. दुसरी पातळी अंधश्रद्धा निर्मूलनाच्या चळवळीतील कार्यकर्त्यांच्या आणि नेत्यांच्या मनातील वैचारिक गोंधळाची आहे. तर तिसरी पातळी खऱ्या अर्थाने समाजाला अंधश्रद्धा मुक्त करायचे असेल तर निर्णायक पद्धतीने नेमके काय करायला हवे ? या संदर्भातील चिंतनाची आहे. या सर्वच पातळ्यांवरील चर्चा संदीप सारंग यांनी अत्यंत निसंदिग्धपणे, जबाबदारीने आणि पळवाटा अशक्य करून सोडणारे युक्तिवाद करीत केलेली आहे. या चर्चेत असंख्य बारकावे आहेत. विषयाच्या अनेकदालनी गुहांमध्ये उरात बुद्धिप्रामाण्यवादाचा सूर्य घेऊन शिरल्याशिवाय इतक्या बारकाव्यांचे घबाड हाती लागतच नाही. देशातील सर्वच परिवर्तनवादी चळवळीला झगमगती आणि न वाकणारी वैचारिक दिशा देणाऱ्या चळवळीत सारंग यांची घडण झालेली आहे . विशुद्ध बुद्धिवादाच्या चळवळीला कोणत्याही पातळीवरची इजा पोहोचेल असा अंधाराचा कणही त्यांच्या विचार करण्याच्या पद्धतीत मला दिसत नाही. अशी स्वच्छ बुद्धिप्रामाण्यवादी भूमिकाच स्वीकारल्याबद्दल संदीप सारंग यांना मी मनापासून धन्यवाद देतो.

या पुस्तकात अनेक मुद्द्यांची प्रथमच मूलगामी पातळीवरून चर्चा झालेली आहे. त्यातला

एक मुद्दा धर्मग्रंथातील पुराणांमधील तसेच रामायण महाभारतासारख्या आख्यायिकांमधील कथा या देशातील लोक इतिहास म्हणून स्वीकारून चालतात, हा आहे. कल्पित आणि सत्य यांतील सीमारेषा निश्चित करणारे प्रमाणच आपल्या लोकांनी स्वीकारले नाही. सारंग यांनी स्वच्छपणे या पुस्तकात सांगितले आहे की, परिवर्तनासाठी जिवाचे रान करणाऱ्या प्राचीन काळातील आणि अर्वाचीन काळातीलही महानायकांचे येथील अंधश्रद्ध माणसे ऐकत नाहीत. राजा राममोहन रॉय, लोकहितवादी, ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे परिवर्तनवाद्यांचे महानायक लोकांना माहीत नसतात. ज्यांच्यामुळे आपण नव्या भौतिक आणि नैतिक विकासाशी जोडले गेले आहोत ते दुर्लक्षित आणि जे आपल्याला गोठवतात ते बाबा, बुवा, बापू, देव्या मात्र आदरणीय, पूजनीय ! हे या समाजातील बहुसंख्य लोकांचे मानसशास्त्र मोठे अवघड आहे. हे मानसशास्त्र धार्मिक वाङ्मयाने घडवलेले आहे. आज या मानसशास्त्राला खतपाणी देण्याची स्पर्धा दूरदर्शनच्या वाहिन्यांमध्ये लागलेली आहे. या बहुसंख्य लोकांसंबंधीचे सत्य हे आहे की त्यांना फक्त धार्मिक अभिरुची आहे. ही अभिरुची या माणसांना सभोवतालच्या वास्तवाचा विचारच करू देत नाही. कारण प्रत्यक्षाचे हे विराट वास्तव या अभिरुचीच्या परिघाबाहेर आहे. या अभिरुची ने स्वतःला इतके संकुचित करून घेतले आहे की कोणी खरे बोलले तरी या अभिरुचीधारकांच्या भावना दुखावतात. या धार्मिक अभिरुची धारकांनी शतकानुशतके अनेक पिढ्या मारल्या. या भयानक मृत्यूसत्राचे त्यांना काहीही वाटत नाही. कारण हे महामृत्युसत्र धर्मन्यायानुसारच घडलेले असते, हीच त्यांची ठाम समजूत असते . त्यामुळे या धार्मिक अभिरुचीधारकांना सामाजिक समतेची अभिरुची शत्रूअभिरुची वाटते. त्यामुळे या धार्मिक अभिरुचीधारकांना आर्थिक-सामाजिक आणि इहवादी वांङ्मयीन समतेच्या अभिरुचीचे मोलच कळलेले नाही.

संदीप सारंग यांचे प्रस्तुत पुस्तक म्हणजे बिनतोड युक्तिवाद करीत वाचकांशी थेट बोलणारे पुस्तक आहे. हा लेखक अत्यंत सडेतोड बोलतो . तर्काचे बोट धरून प्रश्नाच्या तळापर्यंत जातो. अत्यंत यथोचित प्रमाणे देऊन बोलण्याची त्यांची पद्धत आहे. सैल अंगाने चालणे वा संदिग्ध मनाने बोलणे त्यांना मान्य नाही. लेखकाच्या मनात प्रचंड विश्वास आहे. भोवतालच्या जीवनातील कुरुपता आपण नष्ट करू शकतो, असे या विश्वासाचे स्वरूप आहे. या लेखकाचे युक्तिवादकौशल्य तर वाचकाला प्रश्नाच्या मूळ उजेडरुपापाशी घेऊन जाते. शिवाय त्याच्या प्रतिपादनात एक बुलंद निर्भयपणा आहे. हा निर्भयपणा लेखकाला त्याच्या मातृ चळवळीने दिलेला आहे. महाराष्ट्राच्या वैचारिक परंपरेची शान वाढविणारे हे पुस्तक लिहिल्याबद्दल संदीप सारंग यांना मनापासून धन्यवाद !

( डॉ. यशवंत मनोहर यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेच संक्षिप्त रूप)

अंधश्रद्धा निर्मूलन प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम

लेखक - संदीप सारंग

ग्रंथाली प्रकाशन

मूल्य १२० रुपये

■ ■ ■

# कानगोष्टी



अरुण घोडेराव
९८२२६८९८८६६

दोन-चार कानगोष्टी
आज सांगून ठेवतो तुला,
भाकडकथांवरती विश्वास
ठेवायचा नसतो मुला ।।-।।

कोण कुठला साधू येतो
दाढी जटा वाढवून,
आयुष्यातले सारे प्रश्न
झटक्यात देतो सोडवून,
संन्यासी तो झालाच का?
असा प्रश्न विचार त्याला,
भाकडकथांवरती विश्वास
ठेवायचा नसतो मुला ।।१।।

दुसऱ्यांची ती अंधश्रद्धा,
आपली म्हणे डोळस श्रद्धा,
स्वर्ग, नरक, पाप, पुण्य,
खरे असते अमृतसुध्दा?
अनुभव कधी आला आहे
यांचा कधी कोणाला?
भाकडकथांवरती विश्वास
ठेवायचा नसतो मुला ।।२।।

श्रध्देपायी अंध होऊन
घेतात कुणी नरबळी,
भ्रष्ट गुरुंच्या नादापायी
बुध्दी होते आंधळी,
गुरूने खरे दिले आहे
दान कधी कोणाला?
भाकडकथांवरती विश्वास
ठेवायचा नसतो मुला ।।३।।

सत्संग की संतसंग,
प्रत्येक मठात असते वादंग,
मी म्हणेल तीच पूर्व,
मी म्हणेल तोच रंग,
खुदपसंत महंताच्या
झळ बसते का खिशाला?
भाकडकथांवरती विश्वास
ठेवायचा नसतो मुला ।।४।।

यांचा धर्म गंधटिळा,
यांचा धर्म पाद्यपूजा,
मान यांची ऊंच मात्र,
धर्म यांचा असतो खुजा,
अधर्मालाच ठरवून धर्म
गल्लीबोळात बोलबाला,
भाकडकथांवरती विश्वास
ठेवायचा नसतो मुला ।।५।।

डोळस हो, चालव डोके,
माणुसकीला विसरू नको,
विज्ञान, नीती, निर्भयतेकडे
पाठ कधी फिरवू नको,
लोकशाहीत स्वातंत्र्याचा
मार्ग नेहमी असतो खुला,
भाकडकथांवरती विश्वास
ठेवायचा नसतो मुला ।।६।।

■ ■ ■



विशाल विमल
७२७६५ ५९३१८

**अंधश्रद्धांचा उपयोग राजकारणासाठी होतोय**
**- ज्येष्ठ पत्रकार हेमंत देसाई यांचे प्रतिपादन**
**- दाभोलकर स्मृती विशेषांक प्रकाशित**

अंधश्रध्दांचा उपयोग हा राजकारणासाठी केला जात आहे. सर्व काही सुसूत्रपद्धतीने सुरू आहे, त्यामुळे राजकीय क्षेत्रातील अंधश्रद्धांचे काय करायचे? हा मोठा प्रश्न आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार हेमंत देसाई यांनी केले आहे.

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका - ऑगस्ट २०२१ या मासिकाच्या शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृती विशेषांकाच्या प्रकाशन समारंभात हेमंत देसाई बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र अंनिसचे उपाध्यक्ष डॉ. सुरेश खुरसाळे, प्रमुख पाहुणे अविनाश पाटील होते. यावेळी मासिकाचे कार्यकारी संपादक उत्तम जोगदंड, प्रमोद गंगणमाले, राजेंद्र फेगडे यांनी मनोगत व्यक्त केले. श्यामसुंदर मिरजकर यांनी सुत्रसंचलन केले, तर डॉ. ठकसेन गोराणे यांनी आभार मानले. तांत्रिक व्यवस्था अवधूत कांबळे यांनी  पाहिली.

सम तारखेला संग केल्यास कोणते अर्भक जन्माला येते असे म्हणणाऱ्या बाबाला राजकीय लोक समर्थन देतात. कोरोनाच्या काळात टाळ्या वाजवायला सांगून त्यातून निर्माण झालेल्या अंधश्रध्दांबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी बोलत नाहीत. काही राजकीय लोक गोमूत्राने कोरोना बरा होतो अशी वक्तव्ये करतात. काही देवस्थाने नवसाला पावणारा देव म्हणून जाहिरात करतात आणि प्रसारमाध्यमे देखील त्याला प्रसिद्धी देतात. पण याकडे गंभीरपणे पाहिले जात नाही, अशी खंत हेमंत देसाई यांनी यांनी व्यक्त केली.

अंधश्रद्धा निर्मूलनाची लढाई सध्याच्या काळात अवघड बनली आहे. अनेक राज्यातील सत्ताधारी अंधश्रद्धांना पाठबळ देत आहेत, असे डॉ. सुरेश खुरसाळे यांनी सांगितले. महाराष्ट्र अंनिसच्या कामाबद्दल लोकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. देवाधर्माशी संबंधित असलेल्या अंधश्रध्दांसह राजकीय क्षेत्रातील अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम करावे लागणार आहे, अशी अपेक्षा अविनाश पाटील यांनी व्यक्त केली.

■

**पुण्यात अभिवादन सप्ताहात ६०० जण सहभागी**

**पुणे :** महाराष्ट्र अंनिसचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा पुण्यातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुलावर मॉर्निंग वॉक करताना २० ऑगस्ट २०१३ रोजी खून झाला. आद्यपही त्यांचे मारेकरी मोकाट आहेत. डॉक्टरांच्या ८ व्या स्मृतिदिनानिमित्त महाराष्ट्र अंनिसच्या शिवाजीनगर पुणे शाखेने अभिवादन सप्ताहाचे आयोजन केले होते. या सप्ताहात पुण्यातील सुमारे ६०० समविचारी संस्था संघटनेचे कार्यकर्ते नेते, हितचिंतक, नागरिक यांनी सहभाग घेतला.

**रक्तदान शिबिर :** भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी दिनी पुण्यातील एस एम जोशी सोशलिस्ट फाउंडेशन येथे रक्तदान शिबिर आयोजित केले होते. या शिबिरासाठी सुमारे २००

कार्यकर्ते, हितचिंतक, नागरिक उपस्थित होते. या रक्तदान शिबिरात ८४ जणांनी रक्तदान केले. आचार्य आनंद ऋषी पुणे ब्लड बँक यांनी रक्तसंकलन केले. शिवाजीनगर पुणे शाखेच्या कार्यकर्त्यांनी शिबिरासाठी केलेले कष्ट, एस एम जोशी सोशलिस्ट फाउंडेशनची साथ, रक्तदानासाठी सोशल मीडिया - प्रसारमाध्यमांमध्ये केलेले आवाहन, समविचारी नेते, कार्यकर्ते, सजग नागरिक यांची मदत, राज्य सर्वेक्षण अधिकारी डॉ. प्रदीप आवटे, अभिनेते ओंकार गोवर्धन, शाहीर शीतल साठे आणि प्रसारमाध्यमे यांनी केलेली शिबिराची प्रसिद्धी, यामुळे शिबिराला चांगला प्रतिसाद मिळाला. विशेष म्हणजे सर्व क्षेत्रातील तरुणाई या रक्तदान शिबिरात सहभागी होती. ज्येष्ठ कष्टकरी नेते डॉ. बाबा आढाव, माजी आमदार जयदेव गायकवाड, ज्येष्ठ समाजवादी नेते प्रा. सुभाष वारे, माजी उपमहापौर आणि नगरसेवक डॉ. सिद्धार्थ धेंडे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते



अंकुश काकडे, ब्लड बँकेचे शांतीलाल सुरतवाला, नगरसेवक विशाल तांबे, सामाजिक कार्यकर्ते नितीन पवार, अभिनेते ओंकार गोवर्धन, साहिल जाधव, लोकायतच्या अलका जोशी, मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे डॉ. शमसुद्दीन तांबोळी, डॉ. बेनझीर तांबोळी, सहाय्यक राज्यकर आयुक्त भक्ती काळे, डॉ. प्रदीप आवटे, प्रा. कमलादेवी आवटे, शाहीर शीतल साठे, सचिन माळी, प्रा. देवकुमार अहिरे, मधुश्री प्रकाशनचे शरद अष्टेकर, नाट्यअभिनेते कृतार्थ शेवंगावकर आदींनी उपस्थित राहून सदिच्छा दिल्या.

**अभिवादन :** स्मृतिदिनाच्या पूर्वसंध्येला डॉ. नरेंद्र दाभोलकरांना महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पूल येथे सुमारे २०० कार्यकर्त्यांनी एकत्र येत अनोख्या पद्धतीने अभिवादन केले. 'आमचे नाते विचारांचे - आम्ही वारस विवेकाचे', 'आवाज दो - हम एक है', अशा कार्यकर्त्यांनी घोषणा दिल्या. गीतांद्वारे अभिवादन करून, मेणबत्ती पेटून विवेक जागर केला. यावेळी महाराष्ट्र अंनिसचे कार्याध्यक्ष अविनाश पाटील, उपाध्यक्ष महादेवराव भुईभार, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे, प्रधान सचिव माधव बावगे, संजय बनसोडे, नंदकिशोर तळाशीलकर, सरचिटणीस विनायक सावळे, सुरेखा भापकर, बबन कानकिरड, डॉ. गोराणे, निधी व्यवस्थापन विभागाचे राज्य कार्यवाह परेश शहा, सांस्कृतिक अभिव्यक्ती विभागाचे कार्यवाह योगेश कुदळे, प्रकाशन विभागाचे विशाल विमल, सांगली जिल्हा कार्याध्यक्ष अजय भालकर, शिवाजीनगर पुणे शाखेच्या अध्यक्षा वनिता फाळके, कार्याध्यक्ष संदीप कांबळे, सचिव विनोद खरटमोल आणि विविध संस्था संघटनांचे कार्यकर्ते उपस्थित होते. अविनाश पाटील, मानव कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले. विशाल विमल यांनी प्रास्ताविक, सूत्रसंचालन केले. माधव बावगे यांनी डॉ. दाभोलकर यांच्या खूनातील दिरंगाईबद्दल माहिती दिली. ॲड. परिक्रमा खोत, क्रांती दांडेकर, संदीप कांबळे यांनी निर्धार व्यक्त केला.

**मॉर्निंग वॉक :** स्मृतिदिनी मॉर्निंग वॉकद्वारे डॉ. नरेंद्र दाभोलकर यांना अभिवादन करण्यात आले. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुल येथून ते महानगरपालिकेच्या आवारातील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यापर्यन्त हा वॉक झाला. या मॉर्निंग वॉकमध्ये सुमारे १०० समविचारी कार्यकर्ते, नेते, हितचिंतक, नागरिक सहभागी झाले होते. 'विवेकाचा आवाज - बुलंद करूया' आदी घोषणा देत 'मारेकरी माहित हाय, कारवाईचे काय ?' असा

संतप्त सवाल कार्यकर्त्यांनी उपस्थित केला. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रा. सुभाष वारे, महाराष्ट्र अंनिसचे सरचिटणीस डॉ. ठकसेन गोराणे, प्रकाशन विभागाचे विशाल विमल, सामाजिक कार्यकर्ते मुकुंद किर्दत, मिलिंद चव्हाण, संकेत मुनोत, शिवाजीनगर पुणे शाखेचे अध्यक्ष वनिता फाळके, कार्याध्यक्ष संदीप कांबळे, सचिव विनोद खरटमोल आणि विविध संस्था संघटनांचे कार्यकर्ते उपस्थित होते. प्रणिता वारे, मयूर पठारे, घनश्याम येणगे, अविनाश इंगळे यांनी गाणी सादर केली. प्रा. सुभाष वारे, डॉ. ठकसेन गोराणे, विशाल विमल यांनी मनोगत व्यक्त केले.

**निवेदन :** डॉ. नरेंद्र दाभोलकर खून तपासला गती देण्यात यावी या मागणीची ११० निवेदने मुख्यमंत्र्यांना देण्यात आली. महाराष्ट्र अंनिसच्या शिवाजीनगर पुणे शाखेने पुढाकार घेऊन समविचारी कार्यकर्ते, नागरिक, हितचिंतक यांच्या सह्यांची ही निवेदने तयार केली. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या खुनाची तपास प्रक्रिया गतिमान आणि लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी राज्य सरकारने पंतप्रधानांकडे आग्रह धरून पाठपुरावा करावा, असे ह्या निवेदनात म्हटले आहे. हे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी जयश्री कटारे यांनी स्वीकारले आहे. महाराष्ट्र अंनिसच्या प्रकाशन विभागाचे पदाधिकारी विशाल विमल, अंनिसच्या शिवाजीनगर पुणे शाखेच्या अध्यक्षा वनिता फाळके, महिला विभागाच्या कार्यवाह ॲड. परिक्रमा खोत, ज्येष्ठ कार्यकर्ते सदाशिव फाळके, ॲड. रोहित पाटील या प्रतिनिधींनी हे निवेदन दिले. आठ वर्षात खुनाचा कुठवर तपास झाला आणि कशी दिरंगाई होत आली आहे, हे या निवेदनात नमूद करून ते मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले आहे.  खूनाचा तपास केंद्रीय अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) असून आजवर दाभोलकर खुन प्रकरणी काही जणांना अटक झाली आहे. डॉ. दाभोलकर, गोविंद पानसरे, प्रा. एम. एम. कलबुर्गी व गौरी लंकेश या चारही खूनांमध्ये समान धागा असून परस्पर संबंध आहे. या खूनाशी संबंधीत असलेल्या धार्मिक मूलतत्त्ववादी सूत्रधारांना पकडण्यामध्ये ऊशीर होत आहे. केंद्रीय तपास यंत्रणांच्या मदतीने सुत्रधारांना अटक करणे आवश्यक आहे. तपासला गती देण्यासाठी विशेष तपास टीम गठित करावी. खूनात सहभागी असलेल्या संघटना आणि सर्व सूत्रधारांची संपत्ती जप्त करण्यात यावी. सरकारने निष्णात वकिलांची नियुक्ती करावी. धार्मिक मुलतत्ववादी लोक आणि संघटनांच्यावर बंदी आणावी. तसेच, सामाजिक कार्यकर्त्यांचे होणारे खून थांबवण्यासाठी कायद्याची गरज आहे. यातील शक्य त्या गोष्टी राज्य सरकारने त्यांच्या पातळीवर कराव्यात आणि अन्य गोष्टींसाठी पंतप्रधानांकडे पाठपुरावा करून त्या मार्गी लावाव्यात अशी मागणी यानिवेदनाद्वारे मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली आहे.

■

**नागपुरात दहा शाखांची भेट-बैठक**

**नागपूर :** जिल्ह्यातील खापरखेडा, कोराडी,



हिंगणा, पश्चिम नागपूर, सावनेर, नरखेड, काटोल, रामटेक, उत्तर नागपूर व मौदा या दहा शाखांच्या भेटी घेण्यात आल्या. याबैठकांना जिल्हा अध्यक्ष जगजीत सिंग, जिल्हा प्रधान सचिव गौरव आळणे, राज्य सरचिटणीस संजय शेंडे उपस्थित होते. खापरखेडा येथे दादू गणवीर यांच्या घरी शाखा

भेटीअंतर्गत बैठक झाली. बैठकीला शेखर कोलते, संचिता पाटील, शैलेंद्र गणवीर, दद्दू गणवीर, अनिकेत गणवीर उपस्थित होते. कोरडी शाखा बैठकीला शाखा कार्याध्यक्ष बबन गायकवाड, विलास भालेराव, बबन द्रवेकर, गुलाब साबळे, गणेश कांबळे, प्रकाश खिल्लारे, उमेश जनबंधू उपस्थित होते. कार्यकर्त्यांनी संघटनेसोबत एकजूट राहण्याचा निर्धार बैठकीत जाहीर केला. रामटेक शाखा भेट घेण्यात आली. शाखा कार्याध्यक्षा दीपा चव्हाण यांनी बैठकीचे आयोजन शुभा फुलकर यांचे निवासस्थानी आयोजित केले. बैठकीला शाखेमधून दीपा चव्हाण, दुर्गा लोंढे, अर्चना मेश्राम, ममता चौधरी, विनिता आष्टनकर, किरण मनोहर, शुभा थुलकर उपस्थित होते. दोन दिवसानंतर संघटनेसोबत राहण्याचे कळविले. हिंगणा शाखा अध्यक्ष दीपक रामटेके यांच्या निवासस्थानी शाखा भेटीची बैठक आयोजित करण्यात आली. हिंगणा शाखेचे जिल्हा महिला कार्यवाहक नलिनी शेरकुरे, जिल्हाध्यक्ष दीपक रामटेके, गोविंद बुधे, पुरुषोत्तम शेरकुरे आदी प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीत संघटनेच्या सोबत राहण्याचा मानस व्यक्त केला. पश्चिम नागपूर शाखा भेट बैठक इन्फिनिटी कन्सल्टंट, सत्यम अपार्टमेंट, वर्धा रोड येथे झाली. बैठकीला शाखा कार्याध्यक्ष अशोक खोरगडे, ज्येष्ठ कार्यकर्ते विजय मोकाशी, प्रदीप पवार, मुकेश शेलार, कांचन वाघ, सुरेश साखरे, संजय भलमे उपस्थित होते. चर्चेअंती संघटनेसोबत पुढील कार्य करण्याचा मानस सर्व कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. सावनेर शाखेची बैठक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या गेस्ट हाऊस येथे संपन्न झाली. बैठकीला शाखा अध्यक्ष वंदना मेश्राम, शाखा कार्याध्यक्ष आशिष माटे, मनिषा साखरे, सुजाता महंत, अक्षय मेश्राम, शकील भाई झेडिया, प्रशांत दोरखंडे, पांडुरंग भोंगाळे, अमोल डहाट, वृषभ तागडे उपस्थित होते. या सर्वांनी राज्य संघटनेसोबतच राहण्याचा मानस व्यक्त केला. नरखेड येथे शाखा कार्याध्यक्ष संजय बारमासे यांच्या ग्राम सहकारी संस्थेच्या कार्यालयात बैठक झाली. यावेळी दीपक नारनवरे, ओम प्रकाश कुकडे, गणेश खेमकर, रवींद्र बागडे, शाकीर शेख, बाबुराव गजबे उपस्थित होते. काटोल शाखा भेट बैठक झाली. यावेळी शाखा अध्यक्ष संजय डांगोरे, प्रमोद पवार, दिगंबर टूले, प्रशांत पवार, विवेक गायकवाड, रुपेश टेकाडे, भूषण मुसळे, योगेश भोसले उपस्थित होते. मौदा शाखेच्या बैठकीचे आयोजन शाखा अध्यक्ष राम मस्के यांचे निवासस्थानी करण्यात आले. यावेळी बैठकीला शाखा प्रधान सचिव मनोहर कापसे, ताराचंद इंगळे, रेखा कोहाड, प्रकाश फंधी, यशोदा पिसे, सावित्री काटकर, राजकन्या रामटेके, नीलिमा घाटोळे, डॉ. अनिल बोरकर उपस्थित होते. चर्चेअंती सर्व कार्यकर्त्यांनी संघटने सोबत राहण्याचा ठराव पारित केला. उत्तर नागपूर शाखेची बैठक झाली. शहीद नामांतर स्मारकाजवळ पी.एम वासनिक यांच्या "तुळसा" निवासस्थानी बैठक झाली. बैठकीला जिल्हा सांस्कृतिक कार्यवाहक रवी सहारे, जिल्हा बुवाबाजी संघर्ष कार्यवाहक मंजुश्री फोफरे, जयश्री फोपरे, चैताली रामटेके, अविनाश डोंगरे, कमलेश हुमणे, राजेश हेडाऊ, नरेश कुरीन, शशांक चनकापुरे उपस्थित होते.

■

### लैंगिकतेवर बोलू काही : व्याख्यानमाला

**पालघर :** समाजामध्ये संततिनियमन होणे आवश्यक आहे आणि त्यासंबंधी कायदा करून त्याचा उपयोग केला जावा, तसेच सर्वच लैंगिक प्रश्नांच्या बाबतीत बुद्धीप्रामाण्यवादी भूमिकेतून निकोप व निर्भय चर्चा व्हावी अशा प्रकारचे मत मांडून र.धों. कर्वे यांनी १५ जुलै १९२७ ला 'समाजस्वास्थ्य' या मासिकाची सुरुवात केली. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या विविध उपक्रम विभागातर्फे सन २०१८ पासून दरवर्षी १५

जुलै ते २१ जुलै या दरम्यान "लैंगिकता प्रबोधन सप्ताह" आयोजित केला जातो. यंदा 'लैंगिकतेवर बोलू काही...' या तीन दिवसीय ऑनलाईन राज्यस्तरीय व्याख्यानमालेचे आयोजन केले होते. १५ जुलै रोजी सातारा येथील प्रसिध्द स्त्रीआरोग्य तज्ञ डॉ. शंतनु अभ्यंकर यांचे 'अग्गंबाई अरेच्चा!' (मानवी लैंगिकता) या विषयावर व्याख्यान झाले. "सेक्स" या विषयाकडे समाज ' हे काहीतरी घाणेरडे आहे, काहीतरी वाईट आहे' अशा दृष्टीने पाहत असतो, पण मात्र ही एक नैसर्गिक आणि जैविक प्रेरणा आहे आणि उत्क्रांतीचा सगळा खेळ हा सेक्स भोवती गुंतला आहे. लैंगिकतेविषयी योग्य व शास्त्रीय माहिती जनसामान्यापर्यंत पोहचली पाहिजे, स्त्री आणि पुरुषाच्या शरीरशास्त्राविषयी त्यांनी विस्तृत मांडणी केली. या कार्यक्रमाचे स्वागत नांदेड येथील कार्यकर्ता तुळशीदास शिंदे यांनी केले, प्रास्ताविक नाशिकची कार्यकर्ती नम्रता जगताप , वक्त्याचा परिचय नवी मुंबई येथील कार्यकर्ता किरण वाळूंज यांनी करून दिला. प्रेक्षकांच्यावतीने प्रश्न पुणे येथील रविराज थोरात या साथीने विचारले. नागपूर येथील कार्यकर्ता गौरव आळणे यांनी सर्वांचे आभार मानले. १७ जुलै रोजी पुणे येथील सामाजिक कार्यकर्ते, सम्यक संस्थेचे संचालक आनंद पवार यांचे "ती, तो आणि ते !" (लैंगिकता आणि लिंगभाव) या विषयावर व्याख्यान झाले. लिंगभाव (Gender) किंवा लैंगिकता (Sexuality) हे शब्द मराठीमध्ये स्थापित करायचे असतील तर त्यांचे अर्थ आधी स्थापित व्हायला हवे. स्त्रीकडून समाज वेगळी अपेक्षा करतो आणि पुरुषाकडून समाज वेगळी अपेक्षा करतो, याला लिंगभाव म्हणतात. लिंगभाव ही संकल्पना 'सामाजिक व सांस्कृतिक अंगाने स्थापित केली जाते,' असे आनंद पवार म्हणाले. कार्यक्रमाचे स्वागत व सूत्रसंचालन रायगड येथील कार्यकर्ती प्रियांका खेडेकर हिने केले. प्रास्ताविक ठाणे येथील कार्यकर्ता अमोल चौगुले यांनी केले. वक्त्याचा परिचय कोल्हापूर येथील कार्यकर्ता प्रमोद शिंदे यांनी करून दिला. प्रेक्षकांच्यावतीने प्रश्न औरंगाबाद येथील दीपक खंडागळे या साथीने विचारले. शेवटी बुलढाण्याचे साथी अरविंद शिंगाडे यांनी सर्वांचे आभार मानले. २० जुलै रोजी पुणे येथील 'मिळून साऱ्याजणी' मासिकाच्या संपादिका गीताली वि. मं. यांचे "काय हे अश्लील! इशी..." (लैंगिकता, र.धों आणि आजचा समाज) या विषयावर व्याख्यान झाले. 'प्रत्येकाला लैंगिक स्वातंत्र्य असायला हवे पण त्याला विवेकाची जोड असायला हवी, नाहीतर अनागोंदी माजू शकते. नैतिकतेच्या संकल्पना एक तर धार्मिकतेतून येतात किंवा पुरुषप्रधान संस्कृतीतून येतात. खरे तर नैतिकता म्हणजे सत्याचा शोध असला पाहिजे, ज्यात विषमता व शोषण असता कामा नये,' असे गिताली यांनी सांगितले. कार्यक्रमाचे स्वागत व सूत्रसंचालन कोल्हापूर येथील कार्यकर्ती रेश्मा खाडे, प्रास्ताविक धुळे येथील कार्यकर्ती प्रज्ञा तायडे, वक्त्याचा परिचय लातूर येथील ऋषिकेश दरेकर यांनी करून दिला, प्रेक्षकांच्यावतीने प्रश्न अमरावती येथील प्रवीण गुल्हाणे यांनी विचारले. सचिन थिटे यांनी सर्व कार्यकर्त्यांचे आभार मानले. व्याख्यानमालेला झूमवर व फेसबुक लाईव्ह वर प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. ही व्याख्यानमाला यशस्वी करण्यासाठी महा-अंनिस राज्य सरचिटणीस विनायक सावळे, कृष्णात स्वाती, 'जोडीदाराची विवेकी निवड' विभागाचे सहकार्यवाह सचिन थिटे, पनवेलच्या साथी आरती अजिता अनंत यांचे सर्वोतोपरी सहकार्य लाभले. सोशल मीडिया विभागाचे राज्य कार्यवाह अवधूत कांबळे यांनी तांत्रिक बाजू यशस्वीपणे सांभाळली. तसेच राज्य सरचिटणीस नितीन राउत यांचे बहुमोल मार्गदर्शन मिळाले, अशी माहिती विविध उपक्रम विभागाचे कार्यवाह अनिल शोभना वसंत यांनी दिली.

■

### हळदी समारंभात शून्य सर्पदंश कार्यक्रम

**नांदगाव :** 'शुन्य सर्पदंश मृत्यू अभियान' या कार्यक्रमाचे कोंढार गावातील ग्रामस्थ जिभाऊ गोटे यांनी आपल्या मुलीच्या हळदीच्या कार्यक्रमात आयोजन केले. असा अनोखा कार्यक्रम हळदीप्रसंगी नागरिकांना पाहता आला. जिभाऊ गोटे या वधुपित्याने लाडक्या लेकीच्या विवाह सोहळ्याच्या हळदी समारंभप्रसंगी वरातीत ध्वनी प्रद्रुषन न करता समाज प्रबोधन करुन वेगळा जीवसृष्टीच्या, वसुंधरेचेच्या, निसर्गाच्या संगोपनाचा संदेश दिला. या कार्यक्रमाचे संयोजन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, वन्यजीव संरक्षण बहुउद्देशीय संस्था, ग्रामीण रुग्णालय नांदगाव आणि मनोधैर्य फाउंडेशन जळगाव यांनी केले होते. वधुपिता जिभाऊ रामभाऊ गोटे, वधुमाता संगिता जिभाऊ गोटे, नववधू अर्चना जिभाऊ गोटे, वधूचे बंधु योगेश जिभाऊ गोटे यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम झाला. सर्प दंश व अंधश्रध्दा हे पथनाट्य सादर केले गेले. प्रगत विज्ञान, अंधश्रध्दा, सुजान नागरीक, मांत्रीकाचा जनतेवरील पगडा या विषयांवर प्रबोधन घडले. प्रभाकर निकुंभ (तालुका अध्यक्ष, वन्यजीव संरक्षण बहुउद्देशीय संस्था), महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष भगीरथ जेजुरकर (नांदगाव), मंगेश आहेर (उपाध्यक्ष, वन्यजीव संरक्षण संस्था), अजय भदाणे (ग्रामीण रुग्णालय नांदगाव ), स्वप्निल मोहरीर, सर्पमित्र संदीप जाधव, सचिन आहेर यावेळी उपस्थित होते.

■

### नागपंचमीनिमित्त प्रबोधन कार्यक्रम

**धुळे :** निमगुळ (तालुका जिल्हा धुळे) येथे नागपंचमीचे औचित्य साधून सापांबद्दल समज, गैरसमज, अंधश्रद्धा, विषारी साप, बिनविषारी साप, सौम्य विषारी सापाच्या पोस्टरचे चौकात प्रदर्शन लावण्यात आले. महाराष्ट्र अंनिसचे जिल्हा पदाधिकारी दिलीप खिवसरा यांनी सविस्तर माहिती दिली. या उपक्रमास भिकुबाई चव्हाण, सिंधुबाई मोरे, आशा सोनवणे, तारा पाटील, अलका बोरसे, मिना मोरे, विद्या मोरे, मिरा मोरे, अलका



मोरे, इंदुबाई बोरसे, खटाबाई पाटील, सुशिला मोरे, वन्सबाई पाटील सहभागी झाल्या.

■

### मुलांना पुस्तके, डायरी, पेन वाटप

**धूळे :** न्यू इंग्लिश स्कूल निमगुळ (तालुका जिल्हा धुळे) येथील शाळेत जागतिक आदिवासी दिन तसेच महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. त्यावेळी शाळेत शिकणाऱ्या मोजक्या आदिवासी



बांधवांना अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे पुस्तक, डायरी व पेन वाटप करण्यात आले. 'मुलांनी नियमित शाळेत येऊन आपली प्रगती करावी तसेच आपल्या समाजबांधवांनी सरकारी आरक्षणाचा तसेच आरोग्य, शिक्षणाचा लाभ घेऊन मुख्य

प्रवाहात सामील व्हावे,' असे दिलीप खिवसरा यांनी सांगितले. त्यावेळी कार्यक्रमाला प्राचार्य पी. पी. पाटील, पर्यवेक्षक बी. जी. देसले, एस. व्ही. भदाने, शांताराम सूर्यवंशी, सी. एम. नगराळे व विद्यार्थी उपस्थित होते. दुसऱ्यांच्या शेतात काम करून उदरनिर्वाह करणाऱ्या आदिवासी बांधवांचे दिलीप खिवसरा यांनी प्रबोधन केले. 'डाकीण प्रथा, भूत प्रेत, अंगात येणे याबद्दल गैरसमजुती काढून टाकणे, तसेच लवकरात लवकर लस घेऊन प्रतिकारशक्ती कायम ठेवा. आपल्या मुलांना शिक्षणाचा लाभ द्या,' असेही त्यांनी सांगितले.

■

**वर्धापनदिनानिमित्त ग्रंथालयाला पुस्तके भेट**

**जळगाव :** महाराष्ट्र अंनिसचे जळगाव कार्याध्यक्ष प्रा. दिगंबर कट्यारे यांनी नूतन मराठा महाविद्यालयातील ग्रंथालयास अंधश्रद्धा निर्मूलन विषयाची पुस्तके भेट दिली. ९ ऑगस्ट क्रांती दिन आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन दिनाच्या ३२ व्या वर्धापन दिनानिमित्त पुस्तके भेट देण्यात आली. यावेळी उपप्राचार्य डॉ. एस. ए. गायकवाड, उपप्राचार्य प्रा. आर. बी. देशमुख, उपप्राचार्य डॉ.



एन. जे. पाटील, डॉ. अशपाक शेख, ग्रंथालय विभागातील मधुकर जगदाळे, मोहन पाटील, अरविंद भोईटे उपस्थित होते.

■

**अंधश्रद्धेची कात टाकून विज्ञानाची कास धरुया**

**जळगाव :** 'साप वाचवा - माणूस वाचवा', या विषयावर सर्प विज्ञान सप्ताह अभियानानिमित्त महाराष्ट्र अंनिसचे जळगाव जिल्हाकार्याध्यक्ष प्रा.दिगंबर कट्यारे यांचे व्याख्यान झाले. प्रा. कट्यारे यांनी सापांविषयी पी. पी. टी. द्वारे संपूर्ण माहिती दिली. सर्पदंश कसा टाळावा, सर्पदंशानंतर काय काळजी घ्यावी, विषारी, बिनविषारी साप कसे ओळखावे ? सापांविषयी गैरसमज, अंधश्रद्धा आदी विषयांवर प्रबोधन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रस्तावना डॉ. दीपक मराठे यांनी केले. रविंद्र चौधरी (जळगाव जिल्हा प्रधान सचिव) यांनी गीत सादर करुन आभार मानले. डॉ. अतुल सूर्यवंशी (अध्यक्ष पाचोरा शाखा) यांनी अध्यक्षीय समारोप केला.

■

**वृक्षारोपण व जिल्हा मेळावा**

**ठाणे :** महाराष्ट्र अंनिसच्या वर्धापन दिनानिमित्त ठाणे जिल्ह्यामध्ये (ता. कल्याण) दहिवली येथे वृक्षारोपण व जिल्हा मेळावा झाले. महाराष्ट्र



अंधश्रद्धा निर्मूलन समिती ठाणे जिल्हा, युवा संस्कार बहुउद्देशीय संस्था आणि अंघोळीची गोळी या संस्थांनी एकत्र येत वृक्षारोपण केले. या उपक्रमास महाराष्ट्र शासन वन विभाग, गुंज संस्था, वॉर रेस्क्यू फाउंडेशन यांची मोलाची साथ मिळाली. महाराष्ट्र शासनाच्या वनविभागामार्फत एक हजार

रोपे पुरविण्यात आली. अंघोळीची गोळी संस्थेचे सचिव अविनाश पाटील, महाराष्ट्र अंनिसच्या सरचिटणीस सुरेखा भापकर, उत्तम जोगदंड, ॲड. तृप्ती पाटील, जिल्हा कार्याध्यक्ष राजेश देवरुखकर, प्रधान सचिव निशिकांत विचारे, वनविभागाचे परिमंडळ अधिकारी आर. एन. गोरले, वनरक्षक एम. जी. होलगीर, वनरक्षक एम. व्ही. सावंत, दहिवली गावाच्या सरपंच निर्मला सावंत, कमलाकर राऊत, जयवंत मिरकुटे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किशोर पाटील यांनी केले. सोमनाथ राऊत यांनी उपस्थितांचे आभार मानले. वृक्षारोपणाच्या उपक्रमात गावकरी आणि लहान मुलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. जिल्हा मेळाव्यात ठाणे जिल्ह्याचे कार्याध्यक्ष राजेश देवरुखकर, प्रधान सचिव निशिकांत विचारे यांनी मनोगत व्यक्त केले. महाराष्ट्र अंनिस कायदा विभागाच्या ॲड. तृप्ती पाटील यांनी ठाणे जिल्ह्यातील २ बालविवाह रोखल्याचे, जादूटोणा विरोधी कायदयांतर्गत एका आरोपीला ७ वर्षांची सजा झाल्याचे सांगितले. महाराष्ट्र अंनिसच्या सरचिटणीस सुरेखा भापकर यांनी निर्धार मेळाव्याची माहिती दिली. अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका मासिकाचे कार्यकारी संपादक उत्तम जोगदंड यांनी 'सर्वांनी मुखपत्राचा प्रसार सर्वत्र करावा,' असे मत मांडले. यावेळी ठाणे जिल्ह्यातील सर्व कार्यकर्ते, शाखांचे पदाधिकारी, जिल्हा कार्यकारिणीचे पदाधिकारी उपस्थित होते.

■



**वर्धापनदिनानिमित्त वृक्षारोपण**

**लातूर :** महाराष्ट्र अंनिस लातूर जिल्हा व निसर्ग प्रतिष्ठान यांच्यावतीने वृक्षारोपण करून महाराष्ट्र अंनिसचा ३२ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी अंनिसचे राज्य प्रधान सचिव माधव बावगे, राज्य सहकार्यवाह रुकसना मुल्ला, जिल्हा उपाध्यक्ष अजित निंबाळकर, जिल्हा कार्याध्यक्ष अनिल दरेकर, मिश्र विवाह जिल्हा कार्यवाह रणजित आचार्य, महिला जिल्हा कार्यवाह ज्योती ढगे, अरमान सय्यद, निसर्ग प्रतिष्ठान लातूरचे गंगणे काका, ॲड. मुस्तफा पठाण, सुरज पाटील, ॲड. सर्फराज पठाण, ऋषिकेश दरेकर, शिवशंकर सुफळकर, भूषण पाटील, मंगेश शिंदे, गोविंद शिंदे, प्रमोद वरपे उपस्थित होते.

■

**आकुर्डी पुणे येथे नव्याने शाखा सुरू**

**पुणे :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची आकुर्डी पुणे या नव्याने सुरू झालेल्या शाखेची कार्यकारिणी ८ ऑगस्ट रोजी करण्यात आली. ही



कार्यकारिणी २०२१-२२ या वर्षासाठी असणार आहे. अध्यक्ष : डॉ. योगेश गाडेकर, कार्याध्यक्ष : क्रांती दांडेकर, सचिव : स्वप्नील वाळुंज यांची निवड करण्यात आली. विविध उपक्रम विभाग कार्यवाह : नितीन खलाणे, बुवाबाजी संघर्ष विभाग कार्यवाह : महेंद्र गायकवाड, वैज्ञानिक जाणिवा विभाग कार्यवाह : विकास सूर्यवंशी, महिला व युवा विभाग कार्यवाह : सुधीर सोनवणे, सहकार्यवाह : नेहा

सोनवणे, सोशल मीडिया विभाग कार्यवाह : अमोल जायभाये, कायदे विभाग सल्लागार : ॲड. भूषण महाजन यांची निवड झाली. पदांसाठी इच्छुक, सूचक, अनुमोदक यांची मते विचारात घेऊन लोकशाही पद्धतीने आणि सर्वसहमतीने निवड प्रक्रिया करण्यात आली. निवड प्रक्रियेचे काम संजय बारी यांनी पाहिले. यावेळी निरीक्षक म्हणून महाराष्ट्र अंनिसच्या प्रकाशन विभागाचे विशाल विमल, कायदे विभागाच्या ॲड. मनिषा महाजन यांनी काम पाहिले. महाराष्ट्र अंनिसचे प्रधान सचिव संजय बनसोडे यांनी उपस्थितांशी दूरध्वनीद्वारे संवाद साधला. ॲड. मनिषा महाजन यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांना सदीच्छा दिल्या. विशाल विमल यांनी संघटितपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. डॉ. योगेश गाडेकर यांनी मनोगत व्यक्त करून शाखेला पाच हजार रुपयांची रोख देणगी दिली. सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी संघटनेच्या कामाला पुन्हा नविन उभारी कशी येईल यासाठी जोरदार प्रयत्न करणार असल्याचा विश्वास व्यक्त केला. यावेळी एकनाथ पाठक, अरुणा यशवंते, दर्शन देवकांत, ॲड. मोहन अडसूळ, कॉ. बाळासाहेब घस्ते, राजकुमार माळी आदी कार्यकर्ते उपस्थित होते. क्रांती दांडेकर, स्वप्नील वाळुंज यांनी मनोगत व्यक्त केले अरुणा यशवंते यांनी उपस्थितांचे आभार मानले.

■

**विद्यार्थ्यांना सापांविषयी दिली माहिती**

**नंदुरबार :** महाराष्ट्र अंनिस राबवत असलेल्या सर्प प्रबोधन मोहीमेंतर्गत नंदुरबार शाखेने नागपंचमीचे औचित्य साधून नंदुरबार तालुक्यातील माध्यमिक विद्यालय कोकणीपाडा येथे इयत्ता ८ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांना सर्प विज्ञान, सापांविषयीचे अज्ञान,अंधश्रद्धा यावर पीपीटी प्रोजेक्टरच्या साहाय्याने माहिती दिली. यावेळी नंदुरबार शाखेचे प्रधान सचिव वसंत वळवी, जेष्ठ कार्यकर्ते चंद्रमणी बरडे, शाळेचे मुख्याध्यापक कुंदन पाटील, सर्व उपशिक्षकांनी आणि शिक्षकेतर कर्मचारी सहभागी होते.

■

**पालकमंत्र्यांच्या हस्ते मानस मैत्रीचा सत्कार**

**रायगड :** महाराष्ट्र अंनिसच्या रायगड जिल्हा शाखेच्या मानस मैत्र उपक्रमाच्या कामाबद्दल १५ ऑगस्ट रोजी पालकमंत्री अदिती तटकरे यांनी



कार्यकर्त्यांचा सत्कार केला. मानस मैत्र म्हणजे मानसिक दृष्ट्या आजारी असणाऱ्या पेशंट यांचा मित्र. जे पेशंट कोरोनाबाधित आहेत अश्या पेशंटचे संपर्क नंबर व त्यांच्या परिवाराचे नंबर मिळवून त्यांना मानसिक आधार देण्याचे काम करण्याचा महाराष्ट्र अंनिसने निर्धार केला. रायगड जिल्ह्याचे साथी प्रभाकर नाईक यांनी याची माहिती रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिली. त्यांना हा उपक्रम खूप आवडला. कार्यकर्त्यांनी जिल्ह्यातील पेशंटची यादी मिळण्यास सुरुवात झाली. त्या यादीचे व्यवस्थित वर्गीकरण करून जिल्ह्यात ३० ते ३५ मानस मैत्र टीम म्हणून काम सुरू केले. कॉलमुळे पेशंट व त्यांचे नातेवाईक यांना खूप धीर मिळाला. औषध व उपचार याबरोबरच मानसिक आधार ही सुद्धा कोरोना पेशंटची गरज होती. प्रत्येक पेशंट व त्याचे नातेवाईक खूप घाबरलेल्या अवस्थेत होते. यंदाही जिल्हाधिकाऱ्यांनी स्वत: सांगितले की, मागील वर्षी जो मानस मैत्र उपक्रम सुरू केला होता तो यावर्षी सुद्धा सुरू करावा.

त्यानुसार प्रभाकर नाईक हे पुन्हा कामाला लागले. जिल्ह्यातील सर्व स्वयंसेवी संस्थांना याबद्दल विचारून मोठ्या प्रमाणात हा उपक्रम राबविला. या सर्व कामाची दखल घेऊन पालकमंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला.

■

**खालापूर - खोपोली शाखेचा स्नेह मेळावा**

**खालापूर :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या खोपोली खालापूर शाखेचा स्नेह मेळावा विविध समविचारी, हितचिंतक संस्था संघटनांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यंदा शासन निर्णयाचा आदर राखत मोजक्या वीस सदस्यांच्या उपस्थितीत खोपोली खालापूर शाखेचा स्नेह मेळावा झाला. खूप छान पद्धतीने निसर्गरम्य वातावरणात डॉ.



कटकदौंड व पोळ फार्म हाऊस येथे संपन्न झाला. सुरुवातीस शाखेच्या प्रधान सचिव प्रिया कदम यांनी अभिवादन गीत सादर करून प्रास्ताविक केले. समितीच्या ३२ व्या वर्धापनदिनानिमित्त वाटचालीचा आढावा पीपीटीच्या माध्यमातून जिल्हा प्रधान सचिव संदीप गायकवाड यांनी उलगडला. शाखेचा वर्षभरातील उपक्रम कार्याचा आढावा पीपीटीद्वारे जिल्हा सोशल मीडिया कार्यवाह महेंद्र ओव्हाळ यांनी सादर केला. यावेळी समितीचे पनवेल शाखेचे आरती नाईक व महेंद्र नाईक यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. शाखेचे अध्यक्ष डॉ. सुभाष कटकदौंड यांनी वैज्ञानिक दृष्टीकोन, कार्यकारणभाव याचे महत्व अधोरेखित करून भविष्यात समविचारी संघटनांना सोबत घेऊन विविध उपक्रम खोपोली खालापूर भागात राबविण्यासाठी शाखेला प्रोत्साहन दिले. मेळाव्याचे सूत्रसंचालन जोवीनी कार्यवाह प्रमिला भिल्लारे व निधी संकलन प्रमुख सुविधा गायकवाड यांनी केले. मेळाव्याचा समारोप 'हम होंगे कामयाब' या सामूहिक गीताने झाला. याप्रसंगी इनर्व्हील क्लबच्या मधुमीता पाटील, सारिका धोत्रे, रोटरी क्लबचे अध्यक्ष खेडेकर, कोमसपचे अध्यक्ष डॉ. चव्हाण, सदस्य जनार्दन सताणे, नारंगिचे पोलीस पाटील, स्वामीनी महिला ग्रुपच्या कांचन जाधव उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाखेचे विविध उपक्रम प्रमुख दयानंद पोळ, महिला सहभाग कार्यवाह जयश्री पोळ, सांस्कृतिक विभाग कार्यवाह वैशाली कळसाईत, बुवाबाजी संघर्ष प्रमुख सुनील जगताप, युवा सहभाग कार्यवाह रोहन दळवी यांसह सर्व सभासदांनी खूप मेहनत घेतली.

■

**अभिवादन विशेषांकाचे पुन:प्रकाशन**

**वर्धा :** ऑगस्ट महिन्यात प्रकाशित झालेल्या शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर अभिवादन विशेषकांचे पुनर्प्रकाशन वर्धा येथील महाराष्ट्र अंनिस शाखेच्यावतीने करण्यात आले. महाराष्ट्र अंनिसच्या ३२ व्या वर्धापनदिनी सारिका देहनकर यांच्या निवासस्थानी कार्यक्रम झाला. आयटकचे राज्य कार्याध्यक्ष तथा महाराष्ट्र अंनिसच्या देवळी



शाखेचे अध्यक्ष कॉ. दिलीप उटाणे, राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार, म्हसळाच्या ग्रा.पं.सदस्या शारदा बावणे, महाराष्ट्र अंनिसच्या राज्य महिला सहकार्यवाह सारिका देहनकर, जिल्हा प्रधान सचिव डॉ. माधुरी झाडे, तालुका कार्याध्यक्ष सुनील ढाले, अंनिसच्या सदस्या कविता लोहट यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी जिल्हा कार्याध्यक्ष प्रकाश कांबळे यांनी अभिवादन गीत सादर केले. सुनील ढाले यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने त्यांचा सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक सारिका देहनकर यांनी केले. उटाणे यांनी जुन्या प्रथा, परंपरा, चालीरीती यांची चिकित्सा करून वैज्ञानिक दृष्टिकोनातून पर्याय स्वीकारण्याची गरज असल्याचे सांगितले. तसेच बावणे यांनी महिलांनी श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील फरक ओळखुन कार्य करण्याचे आवाहन केले. गजेंद्र सुरकार यांनीही मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा प्रितेश म्हैसकर यांनी, तर आभार राजेश देहनकर यांनी मानले. भरत कोकावार, विद्या शंभरकर, स्मिता तळवेकर, माया भाकरे, वैशाली भगत, रजनी सुरकार, सीमा पाटील, सारिका वानखेडे, भूपणा वानोडे, सरला तळवेकर यांनी सहकार्य केले.

■

## पुरग्रस्तांना साहित्य वाटप

**कोल्हापूर :** २०१९ साली कोल्हापूर जिल्ह्यात आलेल्या महापुरात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती कोल्हापुरच्या कार्यकर्त्यांनी १४ गावांमध्ये काम केले आहे. तो अनुभव पाठीशी असल्याने यंदाही आलेला पूर ओसरायला सुरुवात झाल्याझाल्या वेगवेगळ्या ठिकाणी पूरग्रस्त लोकांच्या घरात जाऊन सर्वेक्षण केले. पूरग्रस्तांशी बोलून त्यांना मानसिक आधार दिला. यामध्ये कोल्हापूर शहरातील शाहूपुरी, कुंभार गल्ली, सिद्धार्थनगर, सुतारवाडा याचबरोबर शाहूवाडी तालुक्यातील सावर्डी, शिरोळ तालुक्यातील बस्तवाड आणि कागल तालुक्यातील या गावांचा समावेश होता. येथील नुकसानाचा आढावा घेऊन समाज माध्यमातून मदतीसाठी आवाहन केले. या कामात नंदकिशोर घोगरे, कृष्णा कांबळे, भीमराव कांबळे, आशिष शिंदे, ऐश्वर्या कावेरी संजय, संकेत जाधव, सागर भोंडे, रामचंद्र सोरेकर, मनोज बंडगर, स्वप्निल कोठावळे, मनीष देशमुख, स्वप्निल बोणे सचिन कणखर, नियाज अत्तार, राजवैभव शोभा रामचंद्र, संघसेन जगतकर, यश आंबोळे, कृष्णात स्वाती, निशांत सुनंदा विश्वास, गौतम कांबळे यांनी सहभाग घेतला. सावर्डी ता. शाहूवाडी येथील ८ घरे पूर्ण उध्वस्त झाली होती तर ४ घरे अंशतः उद्ध्वस्त झाली होती. समाज माध्यमांत केलेल्या या



आवाहनामुळे मिळालेल्या मदतीतून या १२ कुटुंबांना जीवनोपयोगी वस्तूंची मदत दिली. ताटे, वाट्या, तांबे, साड्या, इंनरवेअर्स, टॉवेल्स, चादरी, दप्तर, वह्या, कंपास बॉक्स दिली. यावेळी तुषार चोपडे, रवींद्र वाळवेकर, मेघना वाळवेकर, नियाज अत्तार आणि कृष्णात स्वाती उपस्थित होते. शिरोळ शाखेच्यावतीने प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा तेरवाड (ता. शिरोळ जि. कोल्हापूर) येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी शिरोळ तालुक्याचे कार्याध्यक्ष, कार्यकर्ते ग्रामपंचायत सदस्य कृष्णा कांबळे, निलेश खांडेकर, संदिप शिरढोणे, रितेश कांबळे, सामाजिक कार्यकर्ते रमेश माळगे, पत्रकार शाहिर आवळे, शाळेचे मुख्याध्यापक दरिकांत कोळेकर, सहदेव डंबाळ बाबासाहेब तिबिले, संतोष

भुयेकर, विनोद चव्हाण, इरगोंडा बंडगर, सुनिता शिंदे, शैलजा सावगावे, रुपाली सिदनाळे व विद्यार्थी- विद्यार्थिनी उपस्थित होते.

■

**करणी-बाहिरवसाचा लावला छडा**

**लातूर :** ‘करणी-बाहिरवसाचा वाढला जोर, एम. डी. डॉक्टर निघाला समर्थनखोर, नवसुनेचा वाढला घोर, दोन महिन्यात जाणत्याला  दोन लाख देऊन झाले दिवाळखोर,‘ अशी घटना लातूर जिल्ह्यात घडली आहे. समाज एकविसाव्या शतकात गेला, विज्ञान- तंत्रज्ञानाचे युग आले अशा नुसत्या गप्पा मारणे ठीक आहे, पण वैज्ञानिक दृष्टिकोनाची किती गरज आहे? हे या घटनेवरून समजून येईल. अंनिसचे जुने कार्यकर्ते तथा हितचिंतक यांच्या नात्यातील एका मुलीला गेल्या दोन महिन्यापासून करिणी-बाहीरवसा होत आहे. त्यांनी अंनिस लातूरचे जिल्हा प्रधान सचिव सुधीर भोसले यांच्याशी संपर्क साधला आणि कार्यकर्ते लगेच लातूर जिल्ह्यातील पिडीतेच्या गावी गेले. टुमदार घर, त्याला श्रीमंतीची छटा दिसत होती. दोन मुलांची मे २०२१ मध्ये ऐन लॉकडाऊन काळात लग्न झाली. सर्व आनंदात सुरु होते. जुलैमध्ये एके दिवशी मध्यरात्री अचानक एक सुन मोठमोठ्याने ओरडून रडू लागली. घरातील सगळे भाबावून गेले. त्यापरिसरातील नामवंत  एम. डी. डॉक्टरने थोडासा उपचार करून घरी पाठवले. एक तासानंतर दुसरी सुन मोठमोठ्याने ओरडू व रडू लागली. ते पाहून कांही वेळातच पुन्हा पहिली सून तशीच करू लागली. घरातील सारे पुन्हा त्याच डॉक्टरकडे गेले. दोघींना एक-एक इंजक्शन दिले. नंतर डा ॅक्टर असे म्हणाले की, " हा आजार वैद्यकीय नाही, तर हे बाहेरचे आहे. हे आमच्याकडून बरे होणार नाही. बाहेरचेच बघा." एम.डी. डॉक्टर जर असे सांगत असेल तर त्यावर लोकांचा विश्वास असतो आणि झालेही तसेच. त्या दोन सुनांना घेऊन घरचे लोक अपरात्री थेट जाणत्याकडे गेले. 'हे केलेले असून खूप गब्बर केलेले आहे' असे सांगून जाणत्याने लिंबे, तावीज, पाणी मंत्रून दिले. लिबे चिरून पाण्यात पिळून त्याने आंघोळ करण्यास सांगितले. दोघींच्या डोळ्यात लिंबू पिळला. डोळ्यात खूप आग झाली, पण ही आग करणाऱ्याची आहे, असे नातेवाईकांचा समज बनला. कुटुंबीय गाणगापूरला तीन वेळेस चार-चार दिवसाच्या मुक्कामाने गेले. एक वेळेस आंघोळ करायला गेले असताना काढून ठेवलेले सारे कपडे आणि गाडीची चावी गायब झाली. घरी आल्यानंतर दुसऱ्या जाणत्याला दाखवले. त्याने बंदोबस्त करतो म्हणून घराच्या चार कोपऱ्यात व दारात पुरण्यासाठी तोडगा दिला होता. त्याचे चार हजार रुपये घेतले होते. घरातील कुटुंबकर्त्यांनी फरशी, पायरी फोडून तोडगा पुरला. हा तोडगा म्हणजे सोलले नारळ त्यावर रद्दी कागद, काळ्या मेणकापडात सात गुंज, राळचे तुकडे, दुसऱ्या मेणकापडात बदाम आकाराचे काळे फळ, छोटेसे मऊ फळ हे सारे एका काळ्या मेणकापडाच्या पिशवीत ठेऊन गाठ बांधलेली असते. कॉटला काळ्या मेणकापडात दोन लिंबू बांधलेले. घडी घातलेले पांढरे कागदाचे पाच तुकडे पेटवून त्याचा धूर नाकाला देण्यास सांगितले.  दुसऱ्या जाणत्याने घराबाहेर असाच चारीबाजूने तोडगा करून दिला. अंगावरील तावीज, दोरे, कडे काढण्यास सांगितले. याचे दहा हजार घेतले. दोघींच्या नाकाना झटका देणारे असह्य केमिकल लावले. त्यामुळे नाकाखाली गर्द काळा डाग पडला होता. पहाटे साडेपाचपासून दोघींचे ओरडणे सुरु झाले. ते आपल्या नवऱ्यांना आता आम्ही वर जातो तुम्ही दुसरे लग्न करा म्हणत होत्या. वर जाण्यासाठी एक सून गच्चीवर जात होती तर दुसरी हातात चाकू घेऊन स्वत:ला संपवण्याचा प्रयत्न करीत होती. परिवारातील इतर त्यांना रोखत होते. मग जवळच्या जाणत्याकडे गेले असता तो त्यादोघींना बेमुर्वतखोरासारखे मारत

होता. 'करणाऱ्याचे' नाव विचारत होता. असाह्य वेदनेमुळे त्यांनी कर्नाटकातील एका वयोवृध्द विठ्ठल या व्यक्तीचे नाव घेऊन सुटका करून घेतली. सासरे पंचावन्न वर्षाचे आहेत. त्यांना 'करणारा' ड्रायव्हींग करु देत नाही. पहाटे पाचपासून बाहेर बोलवत असतो. प्यायला चल म्हणतो, असे त्यांचे म्हणणे होते. सासू एके दिवशी असेच रडत होत्या. पोट दुखून खूप रडत होत्या, असा एकंदरीत प्रकार घडत होता. अशा प्रकरची ही करणी-बहिरवसाची ५७८ वी केस सोडविण्यासाठी जिल्हा प्रधान सचिव बाबा हलकुडे, सुधीर भोसले, मानसिक आरोग्य विभागाच्या जिल्हा कार्यवाह अनिता शिंदे-भोसले हे त्या गावी गेले. तांत्रिक बाबी पूर्ण करू तब्बल सात-आठ व्यक्तींशी चर्चा केली. दोन सुनांना सौम्य मानसिक आजार होता. सासऱ्यांना वीस वर्षापासून मानसिक आजार आहे. औषधोपचार चालू आहेत पण औषधे घेण्यात सातत्य नाही. सासूचा आजार अल्प असल्याने समुपदेशनाने ते कमी झाले. उपाय म्हणून लातूरला मानसोपचार डॉक्टरांना दोन सुना-सासऱ्यांना दाखवण्यास सांगितले. एका सुनेचे नव्वद टक्के कमी झाले आहे तर दुसऱ्या सुनेचा आजार थोडा जास्त आहे.

■

**जळगाव :** महात्मा गांधी उद्यान येथे निर्भय मॉर्निंग वॉक करून डॉक्टरांना अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डी एस कट्यारे, कायदा विभागाचे जिल्हा पदाधिकारी ॲड. भरत गुजर, जिल्हा समन्वयक विश्वजीत चौधरी, शहराध्यक्ष प्रा. दिलीप भारंबे, शहर कार्याध्यक्ष



जितेंद्र धनगर, शहर कार्यवाह कल्पना चौधरी, शिरीष चौधरी, आर.एस.चौधरी, मिनाक्षी चौधरी, देविदास सोनवणे आदी उपस्थित होते. यावेळी कार्यकर्त्यांनी पावसात अभिवादन केले.

■

**ऑनलाईन अभिवादन कार्यक्रम**

**रायगड :** शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त महा. अंनिस व जिल्ह्यातील समविचारी संस्था-संघटनांचे कार्यकर्ते यांनी ऑनलाईन अभिवादन कार्यक्रम घेतला. राष्ट्रसेवा दलाचे अल्लाउद्दीन शेख, स्वदेश फाउंडेशनचे तुषार इनामदार, भारतीय महिला फेडरेशनच्या मोहिनी गोरे, सुरभी स्वयंसेवी संस्थेच्या सुप्रिया जेधे, ग्राहक पंचायतचे प्रा. जोगळेकर, अखिल भारतीय बौद्ध महासंघाचे अनंतराव शिंदे, प्रा. डॉ. अनिल पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. महाराष्ट्र अंनिसचे राज्य उपाध्यक्ष डॉ. प्रदीप पाटकर, राज्य सरचिटणीस नितीन राउत, रायगड जिल्हा मानसिक आरोग्य विभागाचे कार्यवाह डॉ. डोंगरे, निलेश साळवी ( मुंबई ) यांनी देखील मनोगत व्यक्त केले. दोन सत्रात चाललेल्या या रॅलीच्या पहिल्या सत्राचे सूत्रसंचालन राज्य पदाधिकारी आरती नाईक यांनी तर दुसऱ्या सत्राचे सूत्रसंचालन जिल्हा प्रधान सचिव संदिप गायकवाड यांनी केले. यावेळी रायगड जिल्ह्यात ८ नवीन संपर्क शाखा व शाखा प्रमुख यांची निवड जाहीर करण्यात आली. प्रास्ताविक करून जिल्हा निर्धार जिल्हा कार्याध्यक्ष विनयकुमार सोनवणे यांनी व्यक्त केला. यावेळी अलिबाग, पनवेल, खोपोली, कर्जत, मानगाव, म्हसळा व तळा शाखा पदाधिकारी यांनी देखील अभिवादन व निर्धार व्यक्त केला. जिल्हा सांस्कृतिक विभाग, पनवेल शाखा व खोपोली शाखा यांनी गाणी सादर केली. सदर रॅलीसाठी युसुफ मेहेरअली सेंटर, साने गुरूजी स्मारक, कुष्ठरोग निवारण समिती शांतिवन, उल्का महाजन, सुरेखा दळवी, वैशाली पाटील, वैशाली मगदूम, चित्रलेखा पाटील यांनी सदिच्छा

कळविल्या. जिल्हा पदाधिकारी प्रभाकर नाईक, महेंद्र नाईक, निर्मला फुलगावकर, रोहिदास गायकवाड, प्रियांका, प्रधान सचिव मनोहर तांडेल, प्रा. डॉ. लोखंडे, महेंद्र ओव्हाळ , महेंद्र पाटेकर यांनी विशेष परिश्रम घेतले. जिल्हा अ. नि.प. कार्यवाह प्रा. डॉ. संजय बेंद्रे यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. महा.अंनिसचे संपर्क शाखा प्रमुख अर्जुन भगत, प्रा. डोंगरे, प्रा. इंगळे, प्रा. तुपारे, आनंद गायकवाड , शिवांगी गोडबोले, रोहिदास कवळे, यशवंत ठाकूर यांनी देखील मनोगतातून शाखा बांधणीचा निर्धार व्यक्त केला.

■

## साने गुरुजी स्मारक येथे वृक्षारोपण

**जळगाव :** महाराष्ट्र अंनिसच्या जळगाव शहर शाखेमार्फत व मराठी विज्ञान परिषद जळगाव यांच्या प्रमुख कार्यकर्त्यांनी साने गुरुजी स्मारक प्रतिष्ठान, अमळनेर येथे वृक्षारोपण केले. यावेळी जिल्हा कार्याध्यक्ष दिगंबर कट्यारे, मविपचे सचिव प्रा.दिलीप भारंबे, जिल्हा विविध उपक्रम विभागाचे कार्यवाह शिरीष चौधरी, जळगाव शहर शाखेच्या प्रधान सचिव कल्पना भारंबे उपस्थित होते. त्यांनी



स्वप्नील पवार प्रतिष्ठान सेवक यांच्या मदतीने वृक्षारोपण केले.

■

**जळगाव :** डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या खुनाच्या तपासाला गती मिळावी, यासंबंधीचे निवेदन महाराष्ट्र अंनिसच्या जळगाव जिल्हा शाखेने



उपजिल्हाधिकारी शुभांगी भारदे यांना दिले. यावेळी जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डी. एस. कट्यारे, कायदा विभागाचे जिल्हा पदाधिकारी ॲड. भरत गुजर, जिल्हा समन्वयक विश्वजीत चौधरी, जिल्हा सदस्य राजेंद्र चौधरी, शाखा सदस्य सुरेश थोरात, देविदास सोनवणे आदी उपस्थित होते.

■

## अनुभवलेले डॉ. नरेंद्र दाभोलकर

**जळगाव :** महाराष्ट्र अंनिसच्या जळगाव जिल्हा शाखेने 'मी अनुभवलेले डॉ नरेंद्र दाभोलकर' या अनुभव अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. मानसोपचार तज्ज्ञ डॉ. प्रदीप जोशी यांनी अध्यक्षीय भाषण केले. यावेळी जिल्ह्यातील सुमारे वीस कार्यकर्त्यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन जिल्हा कार्याध्यक्ष दिगंबर कट्यारे यांनी केले. 'डॉ. दाभोलकर हा एक विचार आहे. कार्यकर्त्यांची जबाबदारी, साधेपणा, करारीपणा, उत्तम वक्तृत्वशैली, विरोधकांशी देखील आक्रमकतेने न बोलता, त्यांना न दुखवता, खेळाडू प्रवृत्तीने सर्वांना खिळवून ठेवणे,' अशा डॉक्टरांबद्दल भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या. चोपडा येथून डॉ. अय्युब पिंजारी, भडगाव येथील प्रा. दीपक मराठे, रविंद्र चौधरी, ज्ञानेश्वर कोतकर (पाचोरा), अशोक तायडे (जामनेर), प्रा.सोपान बोराटे (भुसावळ), सुनील वाघमोडे, चंद्रकांत जगदाळे (अमळनेर), जळगाव येथील जितेंद्र धनगर, शिरीष चौधरी, कल्पना चौधरी, सुरेश थोरात, देविदास सोनवणे, विश्वजीत चौधरी यांनी मनोगत व्यक्त केले. राज्य

सरचिटणीस डॉ. ठकसेन गोराणे व विनायक सावळे उपस्थित होते.

■

**घाटकोपर :** महाराष्ट्र अंनिस घाटकोपर शाखा आणि समविचारी संघटनांनी निर्भय मॉर्निंग वॉक आयोजित केला.छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करुन वॉकला सुरवात झाली. भटवाडी, वागडवाला, मेट्रो ब्रीज, सर्वोदय



हॉस्पिटल ते घाटकोपर स्टेशन असा हा वॉक झाला. यामध्ये इरावती, निहारिका,  अनुजा, नकुल आणि साहिल ही बच्चेकंपनी सहभागी होती. राष्ट्रसेवा दलाचे शरद कदम, शाखा घाटकोपर महा.अंनिसचे शहाजी पाटोदेकर, शहाजी सोनवणे, संदेश बालगुडे, राजू सोनवणे, डॉ. ओमप्रकाश गाजरे, डॉ. कुमार नेर्लेकर, केतन शहा पाठक, बाळू साळवे उपस्थित होते. शहाजी पाटोदेकर, शरद कदम, केतन शहा यांनी मनोगत व्यक्त केले.

■

**शिंदखेडा :** डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या खुनाच्या तपासात गती मिळावी, यासंबंधीचे निवेदन महाराष्ट्र



अंनिसच्या शिंदखेडा शाखेने नायब तहसीलदार पिंगळे यांना निवेदन दिले. यावेळी प्रा. दीपक माळी, प्रा. भीमराव कढरे, प्रा.परेश शहा, संदीप गिरासे, भिका पाटील, योगेश गिरासे, प्रा. मनोहर, जयपाल गिरासे, देवेंद्र नाईक, प्रा. गोपाल परमार उपस्थित होते.

■

**नांदेड :** महाराष्ट्र अंनिसच्या नांदेड जिल्हा शाखेने महात्मा गांधीजींच्या पुतळ्यासमोर अभिवादन सभा घेऊन डॉ. नरेंद्र दाभोलकर यांना अभिवादन केले. जिल्हा उपाध्यक्ष डॉ. किरण चीद्रावर, कार्याध्यक्ष श्रीनिवास शिंदे, अमृत कऱ्हाळे (कार्याध्यक्ष, अंनिस शाखा पुर्णा), गणेश पाटील, कॉ. सदाशिव भुयारे ( जनरल सेक्रेटरी, कम्युनिस्ट पार्टी- युनायटेड), कॉ.प्रा.राज सुर्यवंशी (जिल्हाध्यक्ष, शिक्षक - प्राध्यापक संघटना), प्रा.



अविनाश कळकेकर, प्रा. मुरलीधर हंबर्डे, गजानन जाधव, ॲड. राणीपद्मावती बंडेवार, अभिलाष इंगोले, शंकर जाधव, बाळासाहेब भुरे, तुळशीदास शिंदे यावेळी उपस्थित होते.

■

### वैज्ञानिक दृष्टिकोन जागर मेळावा

**नांदेड :** महाराष्ट्र अंनिसच्या कुंटूर (ता. नायगाव) शाखेने डॉ. नरेंद्र दाभोळकर अभिवादन व वैज्ञानिक दृष्टीकोन जागर मेळावा आयोजित केला होता. कँडल मार्च काढला. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कार्यकर्ते बाबुराव पाटील आडकिने होते.

प्रमुख मार्गदर्शक म्हणून अंनिस नांदेडचे वैज्ञानिक जाणिवा प्रकल्प प्रमुख संजय ठिकाणे, शाखेचे अध्यक्ष मारोतराव पा. कदम, मोहनराव होळकर,



जिल्हा प्रधान सचिव डॉ. बाळू दुगडूमवार हे उपस्थित होते. यावेळी राजेश आडकिने, बालाजी तेजेराव कदम, गजानन आडकिने, युसुफ शेख, राम इळतगावे, दत्ता शिवनकर, सूर्यकांत बिसमिले, राजेश वाघमारे, गोविंद महादाळे, माणिक माठकर, विनोद जाधव, बालाजी आडकिने, विहाण कदम यांच्यासह समविचारी नागरीक कार्यकर्ते उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रधान सचिव विनोद झुंजारे यांनी तर आभार कार्याध्यक्ष शिवाजी आडकिने यांनी व्यक्त केले.

■

**स्मृतिदिनामित्त वृक्षारोपण**

**चंद्रपूर :** महाराष्ट्र अंनिसच्या उर्जानगर शाखेने डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या स्मृतिदिनानिमित वृक्षारोपण केले. तसेच, खुन्यांचा तपास लवकरात लवकर यंत्रणेने लावावा, असा ईमेल पंतप्रधान कार्यालय व मुख्यमंत्री कार्यालयाला केला आहे. वसाहतीतील आंभोरा चौकात गणपती विसर्जन परिसरात वृक्षारोपणाचा कार्यक्रम झाला. महाराष्ट्र अंनिसचे चंद्रपूर शाखा जिल्हा कार्याध्यक्ष पी.एम.जाधव, जिल्हा प्रधान सचिव नारायण चव्हाण, नरेंद्र रहाटे, ऊर्जानगर शाखेचे कार्याध्यक्ष देवराव कोंडेकर, उपाध्यक्ष मुरलीधर राठोड, महिला प्रतिनिधी जाधव, लीना चिमुरकर, किशोर



मुगल, राजा वेमुला, बालकुमार सोमलकर, विजय राठोड , सिद्धार्थ चिमुरकर, तुषार चव्हाण उपस्थिती होते.

■

**खोपोली :** महाराष्ट्र अंनिसच्या खोपोली खालापूर शाखेने खोपोली पोलीस स्टेशनला डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या खुनाच्या तपासाबाबत झालेल्या



दिरंगाई बाबत पत्र दिले. यावेळी समितीचे रायगड जिल्हाध्यक्ष यशवंत गायकवाड, खोपोली खालापूर शाखेचे अध्यक्ष डॉ. सुभाष कटकदौंड, जिल्हा सोशल मीडिया कार्यवाह महेंद्र ओव्हाळ, विविध उपक्रम प्रमुख दयानंद पोळ, सांस्कृतिक विभाग कार्यवाह वैशाली कळसाईत, पत्रकार हनुमंत ओव्हाळ, पत्रकार गोपीनाथ सोनावणे, निवृत्त शासकीय आधिकरी अनंत शिंदे, महात्मा फुले भाजी मार्केटचे अध्यक्ष निखिल पोल, मंगेश ओव्हाळ, यांसह समविचारी संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

■

**पनवेल :** महाराष्ट्र अंनिसच्या पनवेल शाखेने मॉर्निंग वॉक काढला. तपासाला गतीदेण्यासाठी कार्यकर्त्यांचे सहीचे निवेदन तहसीलदार मार्फत मुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आले. यावेळी राज्यकार्यवाह आरती नाईक, राष्ट्रसेवा दल रायगड



जिल्हा संघटक संतोष ठाकूर, राज्य निमंत्रित उल्हास ठाकूर, रायगड जिल्हा प्रशिक्षण विभाग कार्यवाह महेंद्र नाईक, रायगड जिल्हा विविध उपक्रम कार्यवाह प्रभाकर नाईक, रायगड जिल्हा सांस्कृतिक विभाग कार्यवाह महेंद्र पाटेकर, पनवेल शाखा प्रधान सचिव सिद्धेश गोसावी, वैभव शिंदे, सुहास वायंगणकर, धनाजी फडके आदी यावेळी उपस्थित होते.

■

**अलिबाग :** डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या खून तपासाला गती मिळावा या मागणीसाठी महाराष्ट्र अंनिसच्या अलिबाग शाखेने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले. यावेळी राज्य प्रधान सचिव नितीनकुमार राऊत, रायगड जिल्हा उपाध्यक्ष निर्मला फुलगावकर,



जिल्हा महिला विभाग प्रमुख सुप्रिया जेधे, अलिबाग शाखा कार्याध्यक्ष सुभाष पानस्कर, प्रधान सचिव शांताराम राऊत, अंकिता घरत आदी उपस्थित होते.

■

**म्हसळा :** डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या खून तपासाला गती मिळावी, यासाठी महाराष्ट्र अंनिसच्या म्हसळा शाखेने पोलीस निरीक्षक यांच्या



मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले. यावेळी रायगड जिल्हा कार्याध्यक्ष विनय कुमार सोनवणे, जिल्हा अ. नि. प. कार्यवाह संजय बेंद्रे, म्हसळा शाखा प्रधान सचिव रुपेश गमरे, वैज्ञानिक जाणिवा प्रकल्प कार्यवाह प्रमोद भाजी, प्रशिक्षण कार्यवाह संभाजी शिंदे, बुवाबाजी संघर्ष विभागाचे अश्पाक तडवी आदी उपस्थित होते.

■

**नरबळी प्रकरणी एस.आय.टी नेमण्याची मागणी**

**कोल्हापूर :** कागल तालुक्यातील सावर्डे बुद्रुक गावी एका अल्पवयीन मुलाचा खून झाल्याची घटना समोर आली आहे. मुल व्हावे म्हणून संबंधित आरोपीने आपल्या मित्राच्या मुलाचा नरबळी दिला असल्याची अशी माहिती प्रथमदर्शनी मिळत आहे. त्यामुळे सदर घटनेतील मुलाचा खून झालेला नसून तो नरबळी आहे. यासंबंधी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी गृह उपअधीक्षक पद्मा कदम यांना भेटून निवेदन दिले.



यावेळी राजवैभव शोभा रामचंद्र, निशांत सुनंदा विश्वास, स्वाती कृष्णात उपस्थित होते. सदर प्रकरणी पुढील तपास करण्यासाठी स्वतंत्र एस.आय.टी. नेमण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने करण्यात आली.राज्य सरचिटणीस कृष्णात स्वाती, जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. अरुण शिंदे, जिल्हा प्रधान सचिव हर्षल जाधव यांनी केली आहे.

■

**कळंब :** महाराष्ट्र अंनिसच्या कळंब (उस्मानाबाद) शाखेने डॉ. नरेंद्र दाभोलकर यांना अभिवादन करण्यासाठी मॉर्निंग वॉक आयोजित केला होता. तसेच खुनाच्या तपासाला गती देण्यासंबंधीचे निवेदन पोलिसांमार्फत मुख्यमंत्र्यांना पाठविले आहे. कार्यकर्त्यांनी कळंब येथील शिवाजी चौक ते पोलीस ठाणे असा मॉर्निंग वॉक करून पोलिसांना निवेदन दिले आहे. महाराष्ट्र अंनिसच्या कळंब शाखेचे प्रधान सचिव अरविंद शिंदे, अध्यक्ष सुरेश धावारे, किशन लोंढे, उपाध्यक्ष प्रा. ईश्वर राठोड, प्राचार्य जगदीश गवळी, सुधिर भवर, ॲड. शकुंतला फाटक, ॲड. तानाजी चौधरी, सनी कांबळे, सोनू गायकवाड, धनराज खापे, डॉ. साजेद चाऊस, संदीप सूर्यवंशी, रुपेश मानेकर, सिद्धार्थ कांबळे, संतोष लीमकर, डॉ. दादाराव गुंडरे, डॉ. दीपक सूर्यवंशी, प्रा. अनिल जगताप, अमोल सुरवसे, डॉ. दत्ता साकोळे, अशोक अप्पा चोंदे, धनंजय डोळस, संतोष यादव, प्रताप शिंदे आदी यावेळी उपस्थित होते.

■

## वैज्ञानिक दृष्टिकोन दिनानिमित्त परिसंवाद

**मुंबई :** भारतातील विज्ञानवादी संघटनांनी शहीद डॉ नरेंद्र दाभोलकर यांचा स्मृतिदिन हा 'वैज्ञानिक दृष्टिकोन दिन' जाहीर केला आहे. त्यानिमित्त महाराष्ट्र अंनिसने वैज्ञानिक दृष्टिकोन दिनाच्या निमित्ताने ऑनलाईन परिसंवाद आयोजित केला होता. ज्येष्ठ पत्रकार, जागतिक घडामोडीचे अभ्यासक जतीन देसाई, विज्ञान परिषदेचे प्रा. विनय र. र., ज्येष्ठ कार्यकर्त्या, लेखिका विनया मालती हरी यांनी भूमिका मांडल्या. प्रास्ताविक



राज्य कार्याध्यक्ष अविनाश पाटील यांनी केले. परेश काठे यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. अमोल चौगुले यांनी सूत्रसंचालन केले. विजय परब यांनी आभार मानले. यावेळी राज्य पदाधिकारी संजय बनसोडे, नितीन राऊत, सुशीला मुंडे, सुरेखा भापकर, नंदकिशोर तळाशिलकर, ठकसेन गोराणे उपस्थित होते. 'विज्ञानविरोधी विचार माणसाला मागे नेतो, आधुनिक काळात वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगण्याला अन्य कोणताही पर्याय नाही', असे जतीन देसाई यांनी सांगितले. ' विज्ञान विरोधी सरकार सत्तेत असताना वैज्ञानिक विचार रुजणे अवघड होते. देशाच्या विकासासाठी वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार झाला पाहिजे. महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीने राज्यात याबाबत

मोठे काम केले आहे,' असेही देसाई म्हणाले. प्रा. विनय र. र. म्हणाले की, 'शास्त्रज्ञांनी एकमेकाच्या संशोधनाला आव्हान दिले म्हणूनच नवीन शोध लागले, विज्ञानाच्या वाटचालीचा इतिहास सातत्याने सांगितला पाहिजे. वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणे ही आपली जीवनधारा बनली पाहिजे.' विनया मालती हरी म्हणाल्या की, 'भांडवलशाही अर्थव्यवस्था ही छद्म विज्ञानाला पूरक ठरत आहे. शेती, पर्यावरण क्षेत्रात वैज्ञानिक दृष्टिकोनाचा वापर केला पाहिजे. विज्ञान आणि समाजशास्त्राचा एकत्रित अभ्यास करायला हवा. सांस्कृतिक अंगाने वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवला पाहिजे.'

■

### डॉक्टरांना स्मृतिदिनी अभिवादन

**मुंबई :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या आठव्या स्मृतिदिनी ऑनलाईन अभिवादन सभेचे आयोजन केले होते. ज्येष्ठ पत्रकार आणि हिंदीतील नामवंत साहित्यिक विश्वनाथ सचदेव हे प्रमुख पाहुणे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक व महा अंनिस राज्य उपाध्यक्ष उत्तम कांबळे होते. राज्य प्रधान सचिव माधव बावगे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राज्य प्रधान सचिव संजय बनसोडे यांनी केले. यावेळी राज्य कार्याध्यक्ष अविनाश पाटील, सुशीला मुंडे, नंदकिशोर तलाशीलकर, सुधाकर काशीद, संजय शेंडे उपस्थित होते. नितीन राऊत यांनी आभार मानले. डॉ नरेंद्र दाभोलकर हे विवेकाची बीजे पेरणारे प्रकाशयात्री होते. माणूस घडवण्याचे अभियान त्यांनी चालवले होते. सुंदर आणि आनंदी समाज निर्माण व्हावा यासाठी ते धडपडत होते," असे विश्वनाथ सचदेव म्हणाले. ते पुढे असेही म्हणाले की,'व्यवस्था परिवर्तनासाठी सतत प्रश्न विचारत राहिले पाहिजे. डॉ. दाभोलकरांनी प्रश्न विचारायची परंपरा चालू ठेवली, त्यांनी इथल्या अंधश्रद्धा, शोषणाबद्दल प्रश्न विचारले, व्यापक जनचळवळ उभी केली, हीच बाब धर्मांध सनातनी लोकांना खटकली. जे संविधानाचा अपमान करतात, त्यानुसार वागत नाहीत, त्यांना देशद्रोही



ठरवले पाहिजे. संविधानिक मूल्यांचा आग्रह धरणाऱ्या डॉक्टर दाभोलकरांचे खूनी पकडले जात नाहीत, ही बाब देशातील लोकांना चिंतेची वाटली पाहिजे '. यावेळी उत्तम कांबळे म्हणाले, 'शस्त्रापेक्षा शब्दाची भीती वाटणाऱ्या, निरर्थक मूलतत्ववादी मानसिकतेतून डॉ. दाभोलकर यांचा खून झाला. मात्र त्यांचे सर्व कार्यकर्ते न डगमगता अधिक खंबीरपणे त्यांनी विवेकाचा जागर सुरू ठेवला आहे.'

'डॉ दाभोलकर ही एक व्यक्ती नव्हते, तो विचार होता, एक आंदोलन होते, त्यास संपवल्यावर तो विचार संपेल, असे मारेकऱ्यांना वाटले असेल. पण आज दाभोलकरांनी सुरू केलेली चळवळ अधिक वाढत आहे. इथल्या व्यवस्थेला डॉ दाभोलकरांचे खूनी पकडायचेच नाही, राजकीय इच्छाशक्ती नाही, त्याचा आपण सतत निषेध करत राहिले पाहिजे, असेही म्हणाले.

■

### संघटनाबांधणी महोत्सव व निर्धार मेळावा

**धुळे :** ९ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र अंनिसचा ३२ वा वर्धापनदिन साजरा झाला. संघटना बांधणी महोत्सव हा ९ जुलै २०२१ ते ९ ऑगस्ट २०२१ या दरम्यान राबविण्यात आला. राज्यातील जिल्हा

कार्यकारिणी पदाधिकारी निवड, शाखा कार्यकारिणी पदाधिकारी निवड नव्याने करण्यात आली. जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्त्यांनी जिल्ह्यातील शाखांना भेटी दिल्या. जिल्ह्यांचा ऑनलाइन संघटना महोत्सव झाला. इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठाने मान्यता दिलेल्या फलज्योतिष विषयाबद्दलची सत्य माहिती लोकांसमोर आणण्यासाठी फलज्योतिष फोलपणा दर्शवणारे अभियान राबविण्यात आले. त्या अंतर्गत शाखांनी, जिल्ह्याने व्याख्याने घेतली. तसेच फलज्योतिष हा विषय अभ्यासक्रमात ठेवू नये, यासाठी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपतींना शाखांनी निवेदने पाठविली. राज्य कार्याध्यक्ष अविनाश पाटील यांनी संघटनेच्या वर्धापनदिनाच्या पूर्वसंध्येला राज्यभरातील कार्यकर्त्यांशी ऑनलाईन संवाद साधला. मागील वर्षभरातील संघटनेच्या ठळक कामाचा आढावा घेऊन त्यांनी या संकट काळातही कार्यकर्त्यांनी जोमाने काम केले, त्याबद्दल विशेष कौतुक केले. राज्य कार्यकारी समितीने जिल्हा शाखा आणि संघटनेच्या विविध कामाच्या विभागाचे राज्य कार्यवाह, सहकार्यवाह यांच्याशी जो सातत्याने संवाद केला, त्यामुळे संघटनात्मक आणि उपक्रमात्मक कामांना प्रेरणा आणि आश्वासकता मिळाली, त्याचेही त्यांनी कौतुक केले. सध्याचे वर्ष हे भारतीय स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष आहे. संघटनेने महाराष्ट्रात सुरू केलेले काम आता आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत गेले आहे. मात्र अजूनही काही महत्त्वाची कामं करावी लागणार आहेत. पुढच्या पिढीतील कार्यकर्त्यांना प्रेरणा आणि मार्गदर्शक ठरेल असा दस्तऐवज संकलन करणे आणि पुढील आव्हानांना संघटनेच्या शिस्तीने आणि कार्यपद्धतीने पेलता येईल, अशी व्यूहरचना, संघटना बांधणी करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. सन २०३५ पर्यंत संघटना म्हणून काय करावे लागेल? याचा भविष्यवेध घेऊन, त्याचा सर्वसंमत आराखडा नव्या पिढीला तयार करून देणे, हे आतापासूनच आपण सुरू केले पाहिजे, असे त्यांनी सुचवले. संघटनेचा वर्धापन दिन हा 'संघटना निर्धार मेळावा' म्हणून साजरा केला. अनेक शाखांनी अभिनव कार्यक्रम, उपक्रम घेऊन संघटना महोत्सव साजरा केला. महाराष्ट्रातील जवळपास प्रत्येक जिल्ह्यातील प्रतिनिधींनी शाखा, जिल्हा पातळीवर झालेल्या कामांचे स्वरूप, सहभागी कार्यकर्त्यांचे धाडस, उत्साह, कामाची व्यापकता, तळमळ व्यक्त केली. संघटितपणे संकट काळातही डोंगराएवढे काम केल्याचे स्पष्ट झाले. वैयक्तिकपणेही काही कार्यकर्त्यांनी शक्य ती मदत पूरग्रस्तांना केली. कार्यकर्त्यांनी अतिशय जिगरबाजपणे काम केले. या कामाचे कौतुक कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि संघटनेचे उपाध्यक्ष प्रख्यात मानसोपचारतज्ज्ञ डॉ. प्रदीप पाटकर यांनी केले. अतिशय छोटेखानी केलेल्या भाषणात त्यांनी संघटनेच्या कामाचे नेमकेपणाने विश्लेषण केले. अतिशय बिकट परिस्थितीतही कार्याध्यक्ष अविनाश पाटील यांनी संयमाने नेतृत्व केले, याबद्दल कौतुक केले. कार्यकर्त्यांच्या मनाचा ठाव घेणारे भाषणे त्यांनी केले. एकूणच संघटना महोत्सव आणि निर्धार मेळावा खऱ्या अर्थाने खूप प्रेरणादायी आणि उत्साहात संपन्न झाला.

■

**सोशल मीडियातून प्रबोधन अभियान**


**कोल्हापूर :** महाराष्ट्र अंनिसच्या वर्धापन दिनानिमित्ताने व शहीद डॉक्टर नरेंद्र दाभोलकर यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने अंनिसच्या युवा कार्यकर्त्यांनी सोशल मिडीयाच्या माध्यमातून अभियान राबविले. ४ ऑगस्ट ते ९ ऑगस्ट दरम्यान "बत्तीस वर्षे कृतीशील संवादाची, दिशा विज्ञान, निर्भयता, नीतीची" हे अभियान राबवले गेले. यामध्ये महाराष्ट्र अंनिसच्या कार्याचा आढावा घेणारा दररोज एक व्हिडीओ आणि एक इमेज पोस्टर शेअर केले जात होते. तसेच, ११ ऑगस्ट ते

२० ऑगस्ट दरम्यान “वर्षे झाली आठ - कुठवर पाहायची वाट” हे डॉ. दाभोलकर यांच्या खुनाच्या तपासातील दिरंगाईबद्दल जाब विचारणारे अभियान राबविले. 'आम्ही वारस विवेकाचे' हे डॉक्टर दाभोलकरांच्या विचारांचा वारसा पुढे चालवण्याचा संकल्प करणारे युवांचे व्हिडीओ आणि डॉक्टर 'दाभोलकरांना आठवताना' हे डॉक्टरांच्या आठवणींचा जागर करणाऱ्या प्रतिमांचे अभियान चालवले गेले. या अभियानाला महाराष्ट्र अंनिसचे कार्यकर्ते, हितचिंतक व समविचारी कार्यकर्ते आणि सजग नागरिकांकडून भरघोस प्रतिसाद मिळाला. जवळपास दोन आठवडे व्हाट्सअप्प स्टेटस, फेसबुक स्टोरी, व्हाट्सअप्प ग्रुप व फेसबुक आदी माध्यमातून सगळीकडे हे व्हिडिओ व पोस्टर व्हायरल होत होते. या माध्यमातून समाजमन ढवळून काढणे, प्रबोधन करणे, डॉक्टरांचे विचार नव्या पद्धतीने अनेकांपर्यंत पोचवणे आणि डॉक्टरांच्या खुनाच्या तपासातील दिरंगाईबाबत विधायक मार्गाने शासन यंत्रणांना व सरकारला प्रश्न विचारणे, 'विचारवंतांचे हे खून आम्ही विसरलो नाहीत आणि विसरणार ही नाही; उलट त्यांच्या विचारांचा कृतीशील वारसा आता आम्ही पुढे चालू ठेवू असा निर्धार तरुणाईकडून व्यक्त होताना दिसला. या अभियानात ऑडिओ, व्हिडिओ संदेश बनविण्यामध्ये नांदेडची दिपाली हाडोळे, विशाखा साळी व तुळशीदास शिंदे, ठाण्याचा अक्षय भोईर व निशिकांत विचारे, रायगडची तनुश्री खातू, रत्नागिरीची संजना कानागल, वर्ध्याचा प्रितेश म्हैसकर, यवतमाळचा रूपेश वानखेडे, नागपूरची तनया शेंडे, अहमदनगरची प्राची गवांदे, जळगावचा गुरुप्रसाद पाटील, नंदुरबारचा प्रबोध शाह, कोल्हापूरचा परसू गावडे आणि माधुरी जयश्री बाळासो, सांगलीचा विश्वजित या तरूण-तरूणींनी सहभाग घेतला. तसेच प्रतिमा बनवण्याची जबाबदारी नंदुरबारचे किर्तीवर्धन तायडे, सांगलीचा अंनिस कांबळे आणि कोल्हापूरचा राजवैभव शोभा रामचंद्र यांनी घेतली. व्हिडिओ बनवण्याची व एडिट करण्याची जबाबदारी रायगडचा सिद्धेश गोसावी याने सांभाळली व या सर्वांसाठी कंटेंट देण्याची जबाबदारी संदेश बालगुडे (मुंबई), अमोल चौगुले (ठाणे) व कंटेंट सहित संपूर्ण अभियानाची जबाबदारी कृष्णात स्वाती, सचिन थिटे व विनायक सावळे यांनी सांभाळली.

■

■ ■ ■





महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे
विवेक जागर प्रकाशन
आम्ही वारस विवेकाचे
प्रकाशनपूर्व सवलत
2 पुस्तके
फक्त 240 रु.
घरपोच
फलज्योतिष
भ्रमातून वास्तवाकडे
लेखक : डॉ. नितीन शिंदे
किंमत : २०० रुपये
ओळखा
नवरत्नाचा विळखा
लेखक : डॉ. नितीन शिंदे
किंमत : ८० रुपये
• मुदत : १५ सप्टेंबरपर्यंत
• पुस्तके घरपोच मिळतील.
• पोस्टेज खर्च वेगळा द्यावा लागणार नाही.
• गुगल पे, बँक खात्यावर ऑनलाईन पैसे पाठविण्याची सुविधा.
◆ बुकिंग करा 7276559318 / 9969473702 ◆

- सदरचा अंक महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीसाठी विवेक जागर ट्रस्टच्या वतीने प्रकाशित करण्यात आला आहे.
- अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिकेसाठी लेखन साहित्य युनिकोड फाँटमध्ये टाईप केलेले किंवा सुवाच्च अक्षरात कागदाच्या एकाच बाजूस लिहिलेले असावे.
- लेखकाने स्वतःचे नाव, मोबाईल नंबर व इमेल बिनचूक नमूद करावा.
- लेखन साहित्यासोबत लेखातील आशयाला समर्पक दोन फोटो आणि स्वतःचा फोटो पाठवावा.
- समताधिष्ठित समाजरचनेला पोषक भूमिका मांडणाऱ्या दर्जेदार साहित्याचे स्वागत आहे.
- लेखकांनी आपले लेखन शक्यतो प्रत्येक महिन्याच्या २० तारखेपर्यंत पाठवावे.
- अंकासाठी साहित्य ९९२०१ २८६२८ या व्हाट्सअॅप नंबरवर अथवा manspatrika@gmail.com या इमेलवर पाठवावे.
- तूर्त अंक ऑनलाईन पाठवण्यात येईल.
- ऑनलाइन अंक निशुल्क असेल. छापील अंकाच्या वर्गणीचे स्वरुप यथावकाश कळविण्यात येईल.
- छापील स्वरुपातील अंकाचे वर्गणीदार होऊ इच्छिणाऱ्यांनी ७२७६५५९३१८ या व्हाटस् अॅप नंबरवर पूर्वनोंदणी करावी.


**संपादकीय पत्ता**

संपादक
अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरु', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,
इस्लामपूर, जि. सांगली, ४१५४०९



www.mans.org.in
/pg/MaharashtraANiS /MahaANIS_MANS /t.me/mahaANIS


बुक पोस्ट

प्रति,

........................................

........................................

........................................

**प्रेषक**

कार्याध्यक्ष, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, भास्कर-६८, कालिकादेवीनगर,
संघमा चौक, गोळीबार टेकडी रस्ता, धुळे, ४२४००१